साप्ताहिक माणूस
शनिवार । २१ सप्टेंबर १९७४ । एक रुपया

# महापौर : शनवारवाड्यासमोरचे, राष्ट्रपतीसमारंभातले..

पुण्याचे महापौर भाई वैद्य यांनी राष्ट्रपतींना पुणे भेटीचे खास आमंत्रण द्यावे, पुणे महानगरपालिकेच्या वतीने त्यांचा सत्कार करावा, त्यांना मानपत्र द्यावे, सर्व विरोधी पक्षीय सदस्यांनीही महापौरांच्या या कार्यक्रमात सहभागी व्हावे, हा साराच प्रकार चमत्कारिक आहे.

हिरवा पट्टा प्रकरण उपस्थित करून ज्यांनी काही वर्षांपूर्वी उच्चपदस्थांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध पुणे महानगरपालिकेत जोरदार आवाज उठवला होता त्या भाई वैद्यांना राष्ट्रपतींच्या मिळकतीबाबत उपस्थित झालेल्या वादाचा एकदम विसर पडावा याचे आश्चर्य वाटते.

झोपडपट्टीत राहाणाऱ्या गोरगरीब जनतेविषयीची भाईंची आस्था व कळकळ सुप्रसिद्धच आहे. या भाईंनी जगातील सर्वात महागड्या भवनात राहणाऱ्या राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी पुढे सरसावावे हीही एक आश्चर्य वाटण्याजोगी गोष्ट आहे. अगोदरचे चार दिवस तर म्हणे, ते नागरिकांना कामासाठी भेटतही नव्हते. स्वागताच्या पूर्व तयारीत एवढे गढून गेले होते !


भाई म्हणजे समाजवादी साधेपणा ! महापौर झाले तरी आपला नेहमीचा पायजमा-झब्बा हा पोशाख त्यांनी बदलला नाही, काटकसर म्हणून महापौरांसाठी असलेली गाडीही कामाशिवाय त्यांनी पळवली नाही. अशा साधेपणाने राहाणाऱ्या काटकसरी भाईंनी कारण नसताना राष्ट्रपतींच्या स्वागतासाठी पुणे महानगरपालिकेचे काही हजार रुपये उधळावेत हेही एक आश्चर्यच आहे.

भाई म्हणजे कडवे सेक्युलरवादी. धर्म ही अफूची गोळी नसली तरी सामाजिक समता व प्रगतीच्या मार्गातील एक धोंड आहे असे मानणारे. तरी राष्ट्राध्यक्ष झाल्यावरही मशिदीत जाऊन प्रार्थना करणारे राष्ट्रपती त्यांनी आवर्जून आमंत्रित करावेत, त्यांना मानपत्रही द्यावे, याची कुणी कदाचित आश्चर्यात गणना करतील. परंतु ही गणना मात्र चुकीची ठरेल. कारण कडव्या सेक्युलरवाद्यांच्या परंपरेत हे शोभूनच दिसणारे कृत्य आहे. शंकराचार्यांचे पादप्रक्षालन करणारे राष्ट्रपती कडव्यांच्या सेक्युलरवादात बसत नाहीत. वैदिकांच्या शासनातर्फे होणाऱ्या सत्काराला या कडव्या मंडळींचा सक्त विरोध ! पण मशिदीत जाऊन प्रार्थना करणारी व्यक्ती राष्ट्रपतीपदावर आरूढ झालेली असेल तर तिचा सत्कार व मानपान मात्र अगत्यपूर्वक झालाच पाहिजे ! नुसता सेक्युलरवाद हा सर्व धर्मांना सारखे समजतो. नको तेथे कोणत्याच धर्माची लुडबुड चालू देत नाही. पण कडव्या सेक्युलरवादाची गोष्ट तशी नाही. तो फक्त मंदिरे आणि शंकराचार्य यांच्यावर तुटून पडतो. भाई तर आजवर कितीतरी वेळा असे तुटून पडलेले आहेत–कारण असो नसो. अशा या तुटून पडण्याच्या कडव्या सेक्युलरवादी परंपरेत, मशिदीत जाऊन प्रार्थना करणाऱ्या राष्ट्रपतींचा सन्मान करून भाई केवढी मोलाची भर टाकीत आहेत, हे नीट नीट समजावून घेतले, तर एकूणच या सत्कार कार्यक्रमाविषयी वाटणारे आश्चर्य बरेच कमी होण्याची शक्यता आहे.


टेनिसचे सामने पाहण्यासाठी वास्तविक राष्ट्रपती पुण्यात आले, असे म्हणतात. गरिबी हटावशी ना हा राजेशाही खेळ सुसंगत आहे, ना दिल्लीहून खास लवाजम्यासह तेवढ्यासाठी येणेही. भाईंसारख्यांनी तर या उधळपट्टीचा एरवी निषेधच केला असता. पण महापौरपदी विराजमान असल्याने असे निषेध आता ते करू शकत नाहीत. इंदिरा गांधींच्या आगमनप्रसंगीही त्यांना विमानतळावर मागे नव्हते का असेच जावे लागले ? माजी महापौर दिवेकर यांनी सगळीकडे काळे झेंडे नाचवून कमी केलेली पुण्याच्या महापौरपदाची प्रतिष्ठा एरवी कशी सावरली जाणार ? भाईंच्या स्वागत-सत्कार कार्यक्रमांसंबंधीच्या उत्साहामागील हा प्रामाणिक आशय आपण समजून घेतला पाहिजे, याबद्दल त्यांचे वास्तविक आभारच मानले पाहिजेत.

एक ऑगस्टला पुणेकर स्त्री-पुरुष नागरिकांनी काढलेल्या भ्रष्टाचार विरोधी मोर्चाला उद्देशून भाईंनी शनवारवाड्यासमोर केलेले जयप्रकाश गौरवाचे भाषण कुणाला याप्रसंगी उगीचच आठवेल. जयप्रकाशांनी देशात एक पवित्र यज्ञकुंड चेतवलेले आहे, या यज्ञकुंडात प्रत्येकाने समिधा अर्पण करण्यासाठी पुढे यावे, हे या भाषणातील आवाहन तर किती जळजळीत होते ! पण आता राष्ट्रपतींच्या मानपत्रातील गुळगुळीत शब्दही ऐकण्याची-वाचण्याची पुणेकर स्त्री-पुरुष नागरिकांनी तयारी ठेवली पाहिजे. कुठले भाई खरे, शनवारवाड्यासमोरचे की बालगंधर्व रंगमंदिरात राष्ट्रपतींना मानपत्र देण्यात गुंतलेले, असा शेवटी प्रश्न पडेल हे खरे आहे. पण एक तर 'खरे' प्रश्न राजकारणात विचारायचे नसतात. दुसरे, त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे आज इतके झपाट्याने होत आहे, की खरे आणि खोटे यातील फरकच या गोंधळात कळेनासा झाला आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेतर्फे महापौर भाई वैद्य यांनी योजलेला राष्ट्रपती सत्कार व विशेषतः मानपत्र समर्पण ही या गोंधळातली आणखी एक नवी भर एवढेच फार तर म्हणता येईल.


भाईंच्या पक्षातील शूर महिला लाटणी घेऊन मुंबईत मोठमोठाले मोर्चे काढीत आहेत. राज्यकर्त्यांना सळो की पळो करून सोडीत आहेत. पुण्यात मात्र झुंजार भाईंनी एक छान ललकारी पुकारून वातावरणातील ताण एकदम कसा सैल करून टाकला आहे. ...बा आदब...बा मुलाहिजा...



प्रत्येक परवान्याला दहा हजार घेतले नाहीत हो !
समजा घेतले असले, तरी निक्सनला माफी केली त्याच प्रमाणे तुम्हालाही संपूर्ण माफ केले आहे !

मुक्काट्यानी गाडी काढून घ्या. मी माझ्या नऊ नंबरवर गाडी ठेवलीय!
हा नऊ नंबर नाही साहेब ! हा माझा सहा नंबर आहे. इकडे येऊन पहा हवा तर!


खास सरकार साठी गळफास
अन्न द्या!
रॉकेल द्या!
रवा द्या!
साखर द्या!
मीठ द्या!
मंगळवाल्या प्रथम वरांची यादी द्या!
श्याम जोशी

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| --- | --- | --- | --- |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २१ सप्टेंबर | अंक : सतरावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


# भटकंती : दोन

## पाटणा शहरात सुरू असलेला समांतर कारभाराचा प्रयोग

### निळू दामले

दिल्लीहून निघताना दोन गोष्टी सतत मनात घोळत राहिल्या.

कोण्या एका फर्मला परवाना देण्याच्या शिफारसीवर काही खासदाराच्या सह्या होत्या. परवाना देण्यात गैरव्यवहार झाल्याचे सिद्ध झाले. भराभर सह्यावाल्या खासदारांनी आपल्या सह्या खोट्या असल्याचे आणि आपला परवान्याशी काही संबंध नसल्याचे जाहीर केले. काही कॉंग्रेसच्याच खासदारांनी या प्रकरणी नापसंती व्यक्त केली. संबंधित मंत्र्यांनीही फार भराभर विधाने लोकसभेत करून टाकली. इंदिरा गांधींनी जरासे डोळे वटारले आणि मामला थंड झाला. या प्रकाराची चौकशी संसदीय समितीकडून होणार नाही हा आपला हेका इंदिराजींनी चालवलाच.

इंदिराजी आता सरळ सरळ हुकूमशहा झाल्या आहेत याचे हे उदाहरण भयावह आहे. लगेच दोन दिवसात 'बिहारचे मुख्यमंत्री स्वच्छ आहेत आणि भ्रष्टाचाराविरुद्ध लढत आहेत असे इंदिरा गांधींचे मत आहे;' असे कुप्रसिद्ध लुटालूट यूथ कॉंग्रेसचे अध्यक्ष खासदार मुन्शींनी जाहीर केले आणि बिहारमधल्या युवक कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना गफूरच्या बाजूने उभे राहाण्याचे आवाहन केले. इंदिराजींच्या विरोधात जाण्याचा प्रयत्न कोणी करू नये असा इशारा दिला.

इतकी लवाडी ?

दुसरी घटना दिल्ली कौन्सिलच्या सत्तारूढ जनसंघाचे नेते बलराज खन्ना यांची आत्महत्या. जनसंघाचा दिल्ली कौन्सिलचा कारभार स्वच्छ नाही हे थिएटर प्रकरणावरून सिद्ध झाले होते. खन्नाचीही बरीच लफडी सी. बी. आय. ने हुडकून काढली होती आणि काही गैरव्यवहाराच्या संबंधात खन्नांच्या घरावर धाड घातली होती. याचा संबंध दिल्लीत त्यांच्या आत्महत्येशी लावला गेला आहे. जनसंघही भ्रष्ट आहे याचे जनसंघाला वाईट वाटणे सहाजिक आहे. पण विरोधी पक्षाची मंडळी सत्ता राबवताना कॉंग्रेस सारखीच वागतात हा अनुभव जनसामान्याला जास्त उद्वेगजनक वाटतो आहे.

आसाम मेलने पाटण्याला निघालो.

कधी कधी असे वाटते की गाडीत आणि बसमध्येच देशाची खरी नाडी कळत असते.

कारण माझ्या पलीकडे ४-५ जणांची चर्चा जोरात चालली होती. एकजण दिल्लीचा व बाकीचे 'भैय्ये' होते.

इंदिरा गांधींनी देशाचा सत्यनाश केला आहे यावर सर्वांचे एकमत होते.

त्यातला एकजण म्हणाला, 'हे जरी खरे असले तरीही इंदिराजींचा पराभव होऊच शकत नाही.'

'हां, भाई. याला कारण देशातले विरोधी पक्ष कमकुवत आहेत, आपापसात भांडत आहेत' अशी कारणमीमांसा दुसऱ्याने केली.

पहिला म्हणाला, 'तसं नाही. पांडीचरीच्या माताजींनी इंदिराजींना एक माळ दिली आहे. ती माळ जोपर्यंत इंदिराजींच्या हाती आहे, तोपर्यंत त्यांचा पराभव होणे शक्यच नाही.'

मग त्या गृहस्थाने थेट उत्तर प्रदेशी बोलीत कबिराचा एक दोहा सांगितला, कवचकुंडलाची आणि गांडीव धनुष्याची गोष्ट सांगितली. ही गोष्ट मात्र सर्वांना पटली. भक्तिभावाने सर्वांनी एकमत जाहीर केले.

एकदम आठवले.

मुंबईहून निघताना गाडीत रेल्वेतला बदली होऊन जाणारा एक उत्तर प्रदेशी डॉक्टर होता. 'एक दिल्ली-सौ पलाटफॉर्म और पचास चार चार आनेके हार' असा मामला होता. गाडी सुटल्यावर सर्वांनी घोषणा दिली, 'सियावर रामचंद्रजीकी जय. बोलो वीर हनुमान की जय.'

बदलीचा आणि वीर हनुमानचा काय संबंध ?

पहाटे ३ वाजता पाटण्यात पोचलो. मागे एकदा* पाटण्याला आलो होतो.

फरक काहीच झालेला नाही. तीच घाण. फाटक्या कपड्यातले

---

भटकंती एक : सात सप्टेंबरच्या अंकात प्रसिद्ध झाली होती.

रापलेले तेच केविलवाणे देह रिक्षा खेचताहेत. दोन दोनशे किलोचे तीन देह रिक्षात बसलेले आहेत. नशिबासारखीच रिक्षा खेचली जात आहे. चपारणच्या सत्याग्रहाची सुरुवात गांधीजीनी केली. त्याच्याही आधी १९११ च्या सुमारास बगालच्या तडाख्यातून गरीब बिहारीना सिन्हाजीनी भौगोलिक अर्थाने मोकळे केले. जयप्रकाश बाबूनी भूमिहीनांना न्याय देण्याचा प्रयत्न सन ४२ मध्ये व नतर सन ५४ मध्येही केला. स्वराज्य आले. फरक नाही. कॉंग्रेस जाऊन सविद सरकारे विराजमान झाली. रिक्षावाला रिक्षा ओढतोच आहे.

बिहारचा प्रतिनिधी आहे रिक्षावाला. त्याचे दैन्य बिहारचे दैन्य आहे.

स्टेशनाच्या आवारात डागेवादी कम्युनिस्टांनी घोषणा लिहिली होती. ' जयप्रकाश सी. आय. ए. चा दलाल, जयप्रकाश निक्सनचा दलाल ' आणि रिक्षातून डेऱ्याकडे पोचता पोचता त्यांची एक मिरवणूक पहायला मिळाली. पाच-सातशे लोक असावेत. ' काळाबाजार बद करा, व्यापाऱ्याना शासन करा ' अशा घोषणा चालल्या होत्या. पण गफूरला मात्र हात लावू नका !

कोण कोणाचे दलाल ?

मिश्रा बधूनी करोडो रुपये खाल्ले आहेत. कोसी नदीवरच्या प्रकल्पात काही कोटी हडप झाले आहेत. दारोगाप्रसाद राय या मंत्र्याचेही असे अनेक धदे आहेतच. वृक्ष तेथे छाया...या बरोबरच मत्री तेथे माया (आणि बायाही) हेही जोडले गेले पाहिजेत. अशाचे सरकार टिकून राहावे यासाठी कम्युनिस्ट मर मर मरत आहेत.

जयप्रकाशजीच चुकलच जरासं.

त्यांनीही मार्क्स-लेनीनच्या नावाचा जयघोष करायला हवा होता. स्वतःच्या नावावर एकादा मोठा प्रेस आणि दिल्लीत फ्लॅट वगैरे ठेवायला हवा होता. रशियाच्या पैशावर आपले आदोलन चालवायला हवे होते. डोळ्यावर झापडे आणि डोक्यावर कॅपिटल घेऊन दिंड्या काढायला हव्या होत्या. इदिरा गाधींचे पब्लिक रिलेशन्स ऑफीसर व्हायला हवे होते. ४२ च्या चळवळीला विरोध करून जन्मभर फूटपट्टया घेऊन देशातली आंदोलने कशी जनतेची नाहीत याची वक्तव्ये द्यायला हवी होती.

मग त्याचे आंदोलन कम्युनिस्टानी डोक्यावर घेतले असते.

होता होईल तेवढा विरोध करण्याचे काम चालूच आहे.

पाटणा तसे आता थंड आहे.

पूर आल्यामुळे सर्व प्रमुख कार्यकर्ते मदत कार्याला लागलेले आहेत.

साथ साथ आता सघटना बांधणीचे प्रयत्न चालू आहेत. मार्चमध्ये आंदोलनाला उधाणासारखी सुरुवात झाली. त्याला कोणतेही सघटित स्वरूप नव्हते. जमेल तसे विद्यार्थी वागत होते. येणारे लोक कोणत्या उद्देशाने आले आहेत, कोणत्या प्रकारे वागणार आहेत यावर कोणताच विचार झालेला नव्हता, नियत्रण नव्हते. पण आता ही त्रुटी दूर करण्याचे प्रयत्न चालू आहेत. कार्यकर्त्याची नोंदणी होते आहे. कमिट्या बनत आहेत.

कामाची पद्धती आणि दृष्टी समजून घेण्यासाठी सध्या चाललेला शिक्षण क्षेत्रातला प्रयत्न पहाण्यासारखा आहे.

विद्यार्थ्यांनी १ वर्षासाठी कॉलेजेस सोडली आहेत. ९० टक्क्यापेक्षा जास्त विद्यार्थी कॉलेजात नाहीत. काहीना काही तरी कामात अडकले आहेत. त्याचे नुकसान टळावे पण खरे शिक्षणही मिळावे यासाठी आता त्याच्या पर्यायी शिक्षणाची व्यवस्था केली जात आहे. पोस्टाद्वारे किंवा काही ठिकाणी प्रत्यक्ष वर्ग भरवून आता शिक्षण देण्यात येईल. जयप्रकाशजींनी नेमलेल्या शिक्षण कमिटीतर्फे अभ्यासक्रम तयार होणार आहे – झाला आहे. प्राध्यापक चित्र स्पष्ट होईपर्यंत विनावेतन शिकवणार आहेत. विद्यार्थ्यांचे वय, कोणत्या वर्षाला शिकतात, पत्ता वगैरे तपशील पुढल्या आठवड्यात भरून घेतले जातील आणि समांतर विद्यापीठ–जे भ्रष्ट सरकारच्या जोखडापासून मुक्त असेल–सुरू होईल. पूर्ण वेगात आणि काटेकोर तपशिलासह तयारी चालली आहे.

जास्त विवरणात आता न जाता एवढाच निर्देश करीन की पर्यायी मूल्ये आणि पर्यायी अमलबजावणीच्या जबाबदार प्रयोगाचा हा एक भाग आहे. समाजजीवनाच्या अन्य व्यवहारांबाबतही अशीच आखणी होते आहे.

पाटणा शहरात एक समांतर नगर पालिकेचा प्रयोग यशस्वीरीत्या पार पाडण्यात आला आहे. रेशन कार्डांचा गोधळ दूर करणारी समातर यत्रणाही एका ठिकाणी पाटणा शहरात यशस्वी ठरली आहे.

आम्ही भ्रष्टाचारावर टीका करून थाबणार नाही तर स्वच्छ प्रशासनही आम्ही निर्माण करून ही जबाबदार जिद्द यापाठी असलेली जाणवते आहे. त्यामुळेच गफूर, इदिरामाय, सर्वच जण चितातूर झाले आहेत. कारण केवळ शिविगाळ करून भागत नाही. लोक आता स्वतःच पर्याय निर्माण करताहेत ही जाणीव त्याना अस्वस्थ करीत आहे.

छात्र सघर्ष समितीची तरुण मुले दिवस-रात्र या प्रयोगाची आखणी करीत आहेत, टाईपरायटर्स सारखे थडथडत आहेत. चर्चा होताहेत. जबाबदाऱ्या वाटून दिल्या गेल्या आहेत.

समाजात खरोखरच नवनिर्मिती होते आहे. पाटण्यात जयप्रकाशजींची एक सभा गांधी मैदानावर झाली. सुमारे १॥ लाख लोक होते. त्यात ३० हजार महिला-मुली होत्या. छेडखानी झाली नाही. त्या महिलानाही आत्मविश्वासाने तेथे जावेसे वाटले. पाटण्याला ही गोष्ट नवीनच आहे.


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बाधून पांढऱ्या डागावरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्याप्रासून हजारो लोकानी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्याना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

काल परवा विद्यार्थ्यांचे एक निदर्शन झाले.
आसपासची दुकाने व्यवस्थित उघडी होती.
दहशत नव्हती.
हेही बोलके आहे.

एका आमदाराच्या घरी जेवायला गेलो होतो.
आमदार खूप शिकलेला.
बैठकीच्या खोलीतच जेवण आणून दिले गेले.
पाणी पाहिजे होते.
'पानी लावा हो ऽऽ' अशी बैठकीतून आरोळी.
एक मुलगा पाणी घेऊन आला.
काही पाहिजे असले तरी हीच तऱ्हा.

कारण घरातली स्त्री कायम स्वयपाक घरातच. तिला कधीही स्वयंपाक घरातला धूर सोडून काही पहायला मिळत नाही. कॉलेजात जाणाऱ्या मुलीलाही असेच पिंजऱ्यात राहावे लागते. कोणाही पुरुषाशी बोलण्याची मुभा नाही. पोरांच्या पाठीत धपाटे घालताना जो काही बडबडण्याचा आवाज ऐकायला मिळेल तेवढाच स्त्रीचा आवाज कानावर पडतो. रस्त्यातून चालतानाही लोक टक लावून पहातात. त्यातून ती खूबसूरत असली तर मग विचारूच नका. सुशिक्षित, सवर्ण, श्रीमंत, सर्वांच्या घरी हीच अवस्था.

स्त्री ७–८ वर्षांची झाल्यावर जी पडद्याआड जाते ती मरेपर्यंत तेथेच. अगदी मेल्यावरही पडदा सुटत नाही.

काल एक प्रेतयात्रा पाहिली हिंदूचीच होती. पण मुस्लिमासारखीच पेटीत ठेवल्यासारखी अवस्था. चौकशी केल्यावर समजले की पुरुषाचे प्रेत उघडे नेले जाते पण स्त्रीच्या प्रेतावर मात्र मजबूत आवरण.

केवढी गुलामी ! खूप पैसा मिळवणाऱ्या आमदारालाही घरात गॅस आणावासा वाटत नाही. स्वतः वातानुकूलीत हॉटेलात जेवतील. पण बायको मात्र ओल्या लाकडाशी आणि गोवऱ्यांची चूल फुंकून फुंकूनच मरते.

कधी होणार यांची सुटका !
सर्व बिहारभर स्त्री ही अशीच आहे !

एका माजी मन्त्र्याकडे गेलो होतो.

त्याच्या घरात किमान ७–८ तरी डॉ. लोहियांच्या तसबिरी होत्या.

हातात ४ आंगठ्या.
जयप्रकाशजीच्या आंदोलनाला मात्र कडवा विरोध.
कारण मग कळले.

या मन्त्र्यांनी संविदच्या काळात खूप पसे खाल्ले होते. आज हे गृहस्थ कुप्रसिद्ध ललित नारायण मिश्राच्या पगारावर जगतात.

लोहियाचे नाव घेतल्या शिवाय कोणतेही वाक्य हे महाराज पूर्ण करीत नाहीत.

मत्रीपद जाऊन आता ५ वर्षे होऊन गेली. मध्यतरी आमदारपदही गायब झाले होते.

तरीही बगला मात्र अजूनही सोडलेला नाही.
दारावर बदूकवाला पहारेकरी आहे.

दोन तीन वर्षांपाठी याच महोदयाना मी मुबईत भेटलो होतो. तेव्हाही याचे मत्रीपद जाऊन २ वर्षे झाली होती. तरीही आपल्याबरोबर सरकारी खर्चाने शरीर सरक्षक घेऊन हे महाशय आले होते

आमदारकी गेली तरी आमदार निवास.सोडायची बिहारमध्ये पद्धतच नाही.

आमदारकीचा राजीनामा दिल्यावर दुसऱ्याच दिवशी बंगला खाली करणारा केवळ एक आमदार निघाला. सोशॅलिस्ट पार्टीचे कपिलदेवसिंग.

चळवळीची अवस्था विचित्र आहे.
इदिराजी गफूरला हाकलायला तयार नाहीत.
भ्रष्ट सरकार बरखास्त करायला तयार नाहीत.
आदोलन थोडेसे रेंगाळले आहे.
वेगवेगळे कार्यक्रम देऊन उत्साह तेवत ठेवण्याचा प्रयत्न चालूच आहे.
२ ऑक्टोबरला मोठी लढाई सुरू होईल.
बहुधा उत्तरप्रदेशही यात सामील होईल. □ □


**CANNING MITRA PHOENIX LTD.**

*Regd. Office :* **EUCHARISTIC CONGRESS BUILDING No. III,**
**5, CONVENT STREET, BOMBAY – 400 039. Tel. No. 215868**

*Manufacturers of :*

**Electroplating Salts, Polishing Compositions,**
**Plating Plant and Equipment.**

# एथिओपिया

## अनियंत्रित राज्यसत्तेचा अस्त

वा. दा. रानडे

एथिओपियाचे सम्राट हेलेसेलासी यांना लष्कराने १२ सप्टेंबरला पदच्युत केले. पण त्यांच्या पदच्युतीने तेथील राजेशाही नष्ट झालेली नाही युवराज अस्फा वोसेन आता राजे झाले आहेत. राजेशाही नष्ट झाली नसली तरी पूर्वीची अनियंत्रित सत्ता आता राजाच्या हाती राहिली नसून त्याला केवळ नामधारी प्रमुख म्हणूनच रहावे लागणार आहे.

गेले सहा सात महिने एथिओपियाची सत्ता प्रत्यक्षात लष्कराच्याच हाती होती. सम्राट हेलेसेलासी याचे एकेक अधिकार लष्करी नेत्यानी काढून घेतले होते. हेलेसेलासीनी आपल्या सल्लागाराचे एक मडळ (क्राऊन कौन्सिल) नेमले होते. प्रत्यक्षात सरकारपेक्षा अधिक अधिकार या मडळास होते लष्कराने हे मडळ रद्द केले. सम्राटांनी नेमलेले अपील कोर्टही रद्द करण्यात आले. या अपील कोर्टाचा उपयोग आपल्याला पसत नसलेले कोर्टाचे निर्णय धुडकावून लावण्यासाठी हेलेसेलासी करीत असत. सम्राट हेलेसेलासी यांच्या वैयक्तिक नियंत्रणाखाली काही लष्करी अधिकारी असत. हे अधिकारी आता सरक्षण खात्याच्या नियत्रणाखाली देण्यात आले आहेत. हेलेसेलासी याच्या शरीररक्षक दलाच्या प्रमुखास अटक करण्यात आली. गेले काही महिने सम्राट त्याच्या राजवाड्यात जवळजवळ नजर कैदेतच होते.

एथिओपियातील लष्करी क्रांतीचे एक वैशिष्ट्य म्हणजे ती हप्त्या हप्त्याने झाली. प्रथम गेल्या फेब्रुवारीत भूदल सैनिकानी बड केले. हवाईदल, नाविक दल आणि राजे हेलेसेलासी याचे शरीररक्षक दल नतर टप्प्याटप्प्याने त्यांना सामील झाली. पण या सर्व दलांनी एकत्र येऊन आपल्या एकजुटीचे प्रदर्शन राजधानी आदिसअबाबा येथे गेल्या महिन्यात केले. लष्करी नेत्यानी पार्लमेट बरखास्त केले. घटना रद्द केली. आता नवी घटना तयार करून त्यानुसार निवडणुका घेण्यात येतील तोपर्यंत लष्कराच्याच हाती सत्ता राहील. लष्करी सेनानी सत्ता बळकवताना लोकशाही आणण्याचे आश्वासन देत असतात. पण हे आश्वासन दूर राहून लष्करी सत्ताच स्थिरावल्याचा अनुभव काही देशात आलेला आहे. काही वेळा बाह्य चौकट लोकशाहीची असते. एथिओपियातून अनियत्रित राज्यसत्ता गेली हे चागले झाले. पण अनियत्रित राजेशाहीच्या जागी तेथे लष्करशाही चिरस्थायी होणार की लोकशाही दिशेने पावले टाकली जाणार हा खरा प्रश्न आहे. लष्करी नेत्यानी नामधारी राजपद तरी कशासाठी ठेवले ? सरळ प्रजासत्ताक का जाहीर केले नाही ? लष्करी नेत्यात या प्रश्नावर एकमत नसले पाहिजे. त्यातून लष्करी नेत्यातील निरनिराळ्या गटांच्या एकमेकाविरुद्ध कारवाया चालू राहाण्याचा धोका आहे. लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी एथिओपियाच्या जनतेला लाब पल्ल्याचा प्रवास करावा लागणार आहे एवढेच सध्या म्हणता येईल.

देशाच्या परराष्ट्र धोरणात कोणताही बदल होणार नाही असे लष्करी नेत्यानी जाहीर केले आहे याचा अर्थ आफ्रिकन ऐक्य सघटनेच्या कार्यात एथिओपिया पूर्वीप्रमाणेच भाग घेत राहील. ही सघटना स्थापण्यात एथिओपियाचा महत्त्वाचा वाटा होता. सघटनेचे दहावे वार्षिक अधिवेशन आदिसअबाबा येथेच झाले होते. आफ्रिकेतील प्रमुख नेत्यात हेलेसेलासीना स्थान होते. नवे लष्करी नेते आफ्रिकन ऐक्य सघटनेत आपला प्रभाव कितपत पाडू शकतात यावर आफ्रिकेच्या राजकारणावरील त्याचा प्रभाव अवलबून राहील.

एथिओपिया म्हणजे पूर्वीचा अॅबिसिनिया. ईशान्य आफ्रिकेतील चार लाख चौरस मैल क्षेत्रफळाचा आणि १९६९ च्या गणतीप्रमाणे २,४७,००,००० वस्तीचा हा देश, त्यात बहुसख्य ख्रिस्ती असून ३५ टक्के मुस्लीम आहेत. दुसऱ्या महायुद्धापूर्वी १९३५ साली मुसोलिनीच्या फौजानी आक्रमण करून या देशावर कबजा केला होता. दुसऱ्या महायुद्धात इटलीचा पराभव झाल्यानतर एरिट्रिया ही तांबड्या समुद्रास लागून असलेली इटलीची माजी वसाहत (क्षेत्रफळ ४५,००९ चौरस मैल, लोकसख्या १९७० च्या गणतीप्रमाणे १८ लाख) आणि एथिओपिया याचे सघराज्य १९५२ साली स्थापन करण्यात आले. दहा वर्षानतर सघराज्य सपुष्टात येऊन एरिट्रिया एथिओपियाचाच अविभाज्य भाग झाला. पण तेथे असतोष असून एरिट्रिया स्वतत्र करावा या मागणीसाठी ओस्मान सलाह सेबे यांच्या नेतृत्वाखाली एरिट्रिया मुक्ती आघाडी गेली अकरा वर्षे गनिमी लढा करीत आहे. या चळवळीच्या उग्र स्वरूपामुळेच १९७० साली देशात आणीबाणी जाहीर करण्यात आली होती. या गनिमी सघटनेने आपल्या हालचाली अलीकडे वाढविल्या आहेत. एरिट्रियासंबंधी सरकारी धोरणाच्या निषेधार्थ पार्लमेंटच्या ३४ एरिट्रियन सभासदानी गेल्या महिन्यात राजीनामे दिले होते.

नव्या लष्करी सूत्रधारापैकी जनरल अॅडॉम स्वत. एरिट्रियन आहेत. देशाचे ऐक्य राखण्यासाठी एरिट्रियाच्या प्रश्नावर समाधानकारक तोड त्याना काढावी लागली. एरिट्रियन मुक्ति आघाडीत फूट पडली असून एक गट सघराज्यवादी तर दुसरा एरिट्रिया फुटून स्वतत्र व्हावे या मताचा आहे. सघराज्यवादी गटाने वाटाघाटीची तयारी दर्शविली आहे, हा गट क्रातिकारक मार्क्सवाद्याचा आहे.

लष्करी नेत्याना चर्चच्या विरोधालाही तोड द्यावे लागत आहे. लष्करी राजवटीने नव्या घटनेचा जो मसुदा तयार केला आहे त्यात धर्मसत्ता (म्हणजेच चर्चची सत्ता) आणि राजसत्ता यांची फारकत करण्यात आली आहे. चर्चच्या नेत्याना ते मान्य नाही. हे कलम गाळले नाही तर आम्ही त्याविरुद्ध आंदोलन करू—अशी धमकी त्यांनी दिली आहे. चर्चला यशस्वी विरोध करता यावा यासाठी एरिट्रियातील गमिनी सघटनेशी मिळते घेण्याचा प्रयत्न जनरल अॅडॉम करतील. एरिट्रियात ५५ टक्के लोक मुस्लीम आहेत पण त्यांचा पाठिंबा मिळवणेही सोपे नाही. धर्मसत्तेच्या प्रश्नावर त्यांच्यातील एक गट चर्चच्या नेत्यांनाही पाठिंबा देण्याची शक्यता आहे. एरिट्रियाला नव्या घटनेत अतर्गत स्वायत्तता देणे किंवा एथिओपिया व एरिट्रिया यांचे पूर्वीप्रमाणे सघराज्य स्थापणे हे दोन पर्याय हा प्रश्न सोडविण्यासाठी लष्करी नेत्यापुढे आहेत. एरिट्रियाची जनता एथिओपियाशी एकरूप होऊन एकसध राष्ट्र निर्माण होऊ शकलेले नाही ही एथिओपियाची खरी समस्या आहे. नवे लष्करी नेते त्यावर यशस्वी तोड काढू शकले नाहीत तर एथिओपियाची फाळणी अटळ आहे. □

ग्रामायनचे अध्यक्ष प्रा. वसंत देशपांडे यांनी रोजगार हमी योजनेच्या पाहणीसाठी बार्शी, उस्मानाबाद भागात नुकताच दौरा केला, या दौऱ्यावर आधारित हा लेख.......

# युवक संघटना, सामाजिक संस्थानी पुढे यावे

दारिद्र्याची लक्तरे वाढत्याप्रमाणावर दिसत असताना या देशाचा आर्थिक विकास होत आहे असे कोणत्या तोंडाने म्हणावयाचे? मोठ्या शहरात झोपडपट्ट्या द्रुतगतीने वाढताना स्पष्ट दिसतात. कोणत्याही आकडेवारीची मदत न घेता या देशातील नियोजन सामान्य जनास उपयुक्त ठरले नाही हे शहरात फेरफटका मारला तर काही तासात उमगते. आणि ग्रामीण भागात काय दिसते? ग्रामीण भागात झोपडपट्टी दिसणार नाही, कारण सगळ्याच झोपड्या! आणि आहेत त्या झोपड्याही बंद करून लोक निघून जाताना दिसताहेत.

बार्शी व उस्मानाबाद या दोन तालुक्यातून धावता दौरा नुकताच पार पाडून आलो उस्मानाबादची 'हाडे' तोपर्यंत देशभर गाजली होती. काही गावाना भेटी दिल्या व काही 'रोजगार हमी' योजनेतर्फे चालविलेली कामे पाहिली. खेडुतांशी बातचीत केली व विकासदेवतेचे ओझरते दर्शन घेऊन परत पुण्यास आलो.

'रोजगार हमी' ही क्रांतिकारक योजना महाराष्ट्रात चालू असल्याचे सरकार सांगते. मागेल त्याला काम व शक्यतो राहात्या गावाच्या आसपास; म्हणजे गाव सोडून फार दूर जावे लागणार नाही. सकाळी कामावर जायचे व सध्याकाळी घरकुलात परत यावयाचे. रु. अडीच ते तीन सहजपणे मिळणार. घरटी किमान एका प्रौढ माणसास अशा कामाची हमी. उपासमार कोणत्याही कुटुंबाचे वाटेस येऊ नये अशी यामागची कल्पना.

प्रत्यक्षात काय दिसते? फक्त काही पाझरतलावांची कामे हाती घेतली आहेत. उत्पादक कामेच घ्यावयाची अशी अट आहे. त्याप्रमाणे आज तरी हे एकच प्रकारचे महत्त्वाचे काम हाती घेतलेले दिसते. पाझर तलावास १०० ते ५०० पर्यंत मजूर वर्ग लागतो. सरासरी १७५ लोक. एका तालुक्यात किती पाझरतलाव निघू शकणार! बार्शी तालुक्यात एकूण ३१ व उस्मानाबादमध्ये २० असे प्रकल्प हाती घेतलेले आहेत. परंतु प्रत्यक्षात सर्वच तलावाचे काम चालू आहे असे नाही. अशा प्रकल्पातून जास्तीत जास्त आठ ते नऊ हजार लोकाना काम मिळू शकेल. याउलट काम मागणाऱ्यांची सख्या मात्र अनेक पटीने अधिक आहे. पण हे मान्य करण्यास अधिकारीवर्ग तयार नसतो. आमच्याकडे लोक काम मागण्यास येत नाहीत, आले तरी फार दिवस टिकत नाहीत. माणसाअभावी कामे बद करावी लागतात ही त्यांची नेहमीची उत्तरे असतात.

परिस्थितीकडे मुद्दाम डोळेझाक हा अधिकारीवर्ग करीत असतो असे जरी नसले, तरी प्रत्यक्ष जाऊन परिस्थितीचा अभ्यास करण्याची, लोकाचे जीवन जवळून, आस्थेने पाहण्याची पोटतिडिक त्याचेजवळ नसते हे निश्चित.

खेडूत लोक काम मागण्यास कोणाकडे जाणार? रोजगार हमी योजना अस्तित्वात आहे हे बहुधा मजूरवर्गाला ठाऊक नाही. दवंडी ऐकल्याचे कोणीही सागत नाही. काही लोकाजवळ कार्डे दिसतात पण त्याचे काय करावयाचे हे त्याना माहीत नसते. काम मागण्यासाठी ते शेतकऱ्यांकडे, सरपचाकडे जातात. सरपच किंवा ग्रामपंचायतीचे सभासद व ग्रामसेवक याची ही प्रमुख जबाबदारी आहे. बहुधा ते याबाबत उदासीन, निष्क्रीय असतात. काम निघते तेव्हा दवडी पिटली जाते व लोक कामावर येतात. मुकादमाला आदेश असतो फक्त अमुक गावच्या लोकानाच कामावर घ्या. सहाजिकच आसपासच्या गावचे मजूर वगळले जातात. पण याहीपेक्षा अधिक महत्त्वाची गोष्ट अशी की कामावर येणाराना स्वतःची आयुधे असावी लागतात. कामावर येणाऱ्याची 'गँग'मध्ये विभागणी होते. प्रत्येक गँगमध्ये काही पुरुष व स्त्रिया यांचा समावेश असतो. स्त्रियांची सख्या दीड ते दुप्पट असते. पुरुषांनी टिकावानी जमीन फोडावयाची, काही जणानी फावड्यानी माती-दगड घमेल्यात भरावयाचे व स्त्रियानी पाट्या दूरवर नेऊन टाकावयाच्या. बायांजवळ पाट्या, पुरुषाजवळ टिकाव-फावडी अशी आयुधे असल्याशिवाय रोजगार हमीमध्ये रोजगार नाही. सहाजिकच काम मागणारांची सख्या आपोआपच कमी होते.

आपल्या देशाचे दुर्दैव एवढ्याने थांबत नाही. आयुधे नसणाऱ्यात प्रामुख्याने भरणा दलित वर्गाचा. रोजगार हमीमध्ये दलिताना स्थान नाही हरिजन वस्तीत गेल्यास अनेकांच्या घरांना कुलपे दिसतात. चौकशीअती समजले की बहुसख्य हरिजन कुटुंबे जगण्यासाठी शहराकडे गेली आहेत. खेड्यात त्याना जगता येत नाही. पावसाअभावी शेतावर कामे नाहीत व रोजगार हमी मधील 'हमी' त्यांच्यासाठी नाही. गावात टिकाव-फावडीसुद्धा मिळू शकत नाहीत याचे आश्चर्य वाटले. उपसरपंच भेटले. त्यांच्यापाशी बातचीत केली. 'अहो प्रत्येकाजवळ ही आयुधे असतातच; हे लोक खोटे बोलतात! मुद्दाम खोटे कोण बोलेल? काम नको आहे थोडेच! नतर कळले, की दुष्काळी कामात सरकारने गावोगावी या साधनाचे वाटप केले होते. ती काय झाली? ग्रामपंचायतीचे ऑफिसात टिकाव-फावडी इत्यादी पडून आहेत. मग वापरीत का नाहीत? सरकारचा हुकूम नाही. 'आम्हाला काय, हुकूम आणा सर्वांना देऊन टाकतो' उपसरपच म्हणाले.

मामलेदारांपाशी हा विषय काढला तेव्हा ते म्हणाले,

'तसा आदेश नाही;' पण तशीच वापरायला काय हरकत आहे?

'तशीच वाटली तर परत मिळण्याची गॅरंटी काय? अहो हे लोक फावडी विकून टाकतात परस्पर.' उपसरपंचाचा अभिप्राय. रोजचे

रोज आयुध वाटणे व गोळा करणे अवघड नाही. हे त्यांना समजावून सांगितल्यावर पटल्यासारखे वाटले. पण कळणे आणि वळणे यातील अंतर कधी कमी होईल कोण जाणे !

### शेतकरीवर्गाचा रोष

काम मिळाले म्हणजे सर्व प्रश्न सुटले असे नव्हे. रोजचे रोज धान्य विकत घेऊन चूल पेटवणाराचे प्रश्न गंभीर असतात. कामाचे वेतन आठवडाअखेर मिळावे असा साधारण नियम आहे. पण तसे प्रत्यक्षात झाले तर नवलच ! इतर शेतकामावर मिळणाऱ्या मजुरीपेक्षा येथील कामावर दर बरा पडतो असा अनुभव दिसतो. पण त्यामुळेच शेतकरीवर्गाचा अशा योजनांवर राग असतो हे विसरून चालणार नाही. ही कामे वर्षभर चालू ठेवली तर शेतमजुरीचे दरही वाढवून द्यावे लागतील. त्याचे परिणाम निराळेच. शेतकरी व सरकारी अधिकारी सारख्याच उत्कंठेने पावसाची वाट पहात आहेत ते एवढ्यासाठी. पाऊस पडला व शेतीची कामे सुरू झाली की रोजगार हमीची कामे बंद ठेवली जातात. मजुरवर्ग मग शेतावर कामास जातो. तिथे रोजचे रोज काम मिळेल अशी हमी नाही; दरही कमी होतात.

रोजगार हमीची कामे चालू असतानादेखील मधेच कोठे काम मिळाले तरी एकदोन दिवसासाठी मजूर तिकडे जातात. तिथे रोजगार कमी मिळतो; परंतु रोख रक्कम त्याच दिवशी हातात पडते हा मोठा फायदा. केवळ तातडीने पैसे मिळतात म्हणून हातचे जास्त दराचे काम सोडून मजूर धावतो. रोखीची निकड किती महत्त्वाची असते हे यावरून दिसून येईल.

कामाची हमी असली तरी धान्य मिळविण्याची हमी नाही. आणि किमतीची तर नाहीच नाही ! स्वस्त धान्याच्या दुकानातून जेमतेम आठवड्यातील एक दिवस पुरेल एवढेच धान्य मिळते. बाकीच्या दिवसासाठी रोज वाढत्या किमतीला धान्य घ्यावे लागते. कार्डावर मिळणाऱ्या धान्यात एक चतुर्थांश कचरा ! तो काढावा तर पोट भरण्यात पुन्हा कमतरता ! दुकानात हल्ली धान्याऐवजी पीठ देण्याची टूम सुरू झाली आहे. हेतू हा की त्यात वाटेल ती भेसळ करता येते. फायदा उकळण्याच्या नवीन नवीन क्लृप्त्या निघत आहेत. प्रत्यक्ष भाकरीचा तुकडा खाऊन पाहिला. दुसरा तुकडा खाणे शक्यच नव्हते !

पण आहे ते धान्यही पोटभर नाही. सतरा अठरा वर्षांचा, सातवी पास झालेला हरिजन विद्यार्थी म्हणाला, आठवड्यातून दोन दिवस किमान उपवास घडतो. सर्वांनाच. कामावरची माणसे म्हणाली, निदान ४० टक्के मजूर येताना भाकरी आणू शकत नाहीत. जेवावयाची सुट्टी झाली की मजुराचे दोन गट पडतात. एक गट भाकरी आणणाराचा, दुसरा न आणणाराचा. दुसरा गट उगाचच वाईट वाटावयाला नको म्हणून लांब दूरवर जाऊन बसतो. भाकरीचे दर्शन होऊन पोट खवळायला नको !

आणि जे भाकरी आणतात तेही पोटभर आणीत नाहीत. आहे त्या धान्यात मिळेल ते मिसळावयाचे; पाला, गवत किंवा इतर कोणतेही पीठ. म्हणजे भाकरी फुगते, एका ऐवजी दोन भाकऱ्या करता येतात. खळगी कशी भरावयाची यासंबंधी या लोकांनी बरेच संशोधन केलेले दिसते !

कमीजास्त प्रमाणात हेच चित्र सर्वत्र पहावयास मिळेल. प्रत्यक्ष कल्पना पाहाणी केल्याखेरीज येणार नाही. शहरातील वर्तमानपत्रेप याबाबतीत निष्क्रीय आहेत. अशा बातम्यांना त्यांचे दृष्टीने महत्त्व नाही. योग्य दर्जाचे बातमीदार पाठवून सत्यस्थिती सतत जनतेपुढे मांडणे हे त्यांचे खरे कर्तव्य. बऱ्याच वृत्तपत्रसंस्थांजवळ यासाठी लागणारे आर्थिक पाठबळही आहे. परंतु त्यांना ही दृष्टी नाही. सरकारी यंत्रणेतील कर्मचारी वर्ग केवळ सांगण्याप्रमाणे काम करणारा. समाजोद्धाराची पोटतिडीच त्यांचे जवळ नाही. आहे त्या योजना देखील पूर्णपणे राबवून त्यांचे फायदे जनतेच्या पदरात टाकणे एवढे जरी या यंत्रणेने काम केले तरी खूप होईल ! राजकीय पक्षांचे कार्यकर्ते प्रामुख्याने शहरात राहणारे ग्रामीण भागातील कामासाठी त्यांना सवड नसते. जिथे झटपट चळवळ उभी राहील व फार श्रम न करता श्रेय मिळेल तिथे हा वर्ग हजर असतो. अशा परिस्थितीत रोजगार हमी सारख्या महत्त्वाच्या योजना कोणी राबवावयाच्या हा प्रश्न तसाच राहतो.

### सामाजिक संस्था

याला उत्तर एकच आहे. खाजगी संस्था, समाजकार्य करणाऱ्या व्यक्ती यांनी यात अधिक लक्ष घालावयास हवे स्वयस्फूर्तीने ग्रामीण भागात काम करणारे लोक मोठ्या प्रमाणावर तयार झाले पाहिजेत. तरुण विद्यार्थी वर्ग, सेवानिवृत्त अधिकारी या दोघांचाही उपयोग होऊ शकेल. सर्वोदय, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, शेतकरी व मजूर संघटना, युक्रांद, अभाविप यासारख्या तरुणांच्या संघटना अशा सर्व राजकीय सामाजिक कार्य करणाऱ्या संघटनांना या कामात लक्ष घालता येणे शक्य आहे. हे काम करणारे कोणत्याही पक्षाचे वा संघटनेचे असोत, कोणत्याही विचारप्रणालीचे असोत; त्यांना सहकार्याने हे काम करणे शक्य आहे. आर्थिक व सामाजिक दलितांचा उद्धार व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाची आवश्यकता– किमान या दोन गोष्टी ज्यांना मान्य आहेत अशा सर्व कार्यकर्त्यांनी– मग ते कट्टर हिंदुत्ववादी असोत वा साम्यवादी असोत– या कार्यक्षेत्रास वाहून घेण्यास हरकत नाही.

प्रत्येक नाडलेल्याला रोजगार मिळवून देणे हे प्राथमिक स्वरूपाचे काम झाले. मिळेल त्या कामावर व मिळेल त्या प्रकाराचे काम स्वीकारून लोकांना मार्गी लावणे हे कार्यकर्त्यांचे पहिले काम. पण यासाठीही बरीच खटपट करावी लागेल. वर वर्णन केल्याप्रमाणे सर्व तऱ्हेच्या अडचणी येतात. एकटा दुकटा माणूस काम मागू शकत नाही; त्याची दाद कोणी घेत नाही. म्हणून अशा लोकांना एकत्र आणून त्यांची संघटना बांधावयास हवी. संघटना बांधूनही काम होईलच असे नाही. अधिकारी वर्ग साधारणपणे उदासीन असतो. त्यात त्यांचा दोष असतोच असे नाही; एकूण सरकारी यंत्रणेतील वातावरण फार उदासीन व निराशाजनक असते. यासाठी कार्यकर्त्यांना नेट लावावा लागतो. कामाची निकड स्पष्ट दिसत असून देखील सरकारी दरबारात ती सिद्ध करावी लागते. संबंधित अधिकाऱ्यांना जागे करावे लागते. बऱ्याच वेळेस निरनिराळ्या खात्यांची तोंडे निरनिराळ्या दिशेला असतात. त्यामुळे कामे सुरू होण्यास अडचणी निर्माण होतात. या सर्व खात्याधिकाऱ्यांना एका कामास जुंपणे हे कार्यकर्त्यांचे महत्त्वाचे काम आहे.

याशिवाय इतर अडचणी आहेतच वर सांगितल्याप्रमाणे आयुधे गावात असूनही मिळू शकत नसतील तर सरपंचापासून ते मामलेदारपर्यंत खेटे घालावे लागतील. सरकारी मालकीची आयुधे मिळविता येतील पण त्याशिवाय खाजगी मालकीची गावात आयुधे असतातच आज ती रोजी चार आणे भाड्याने देण्याचा प्रघात पडत आहे. ही गावातील लोकांची आयुधे स्वस्तात कामापुरती मिळवणे आवश्यक आहे. संघटनेमार्फत हे शक्य आहे. संघटना बळकट असेल तर संघटनेला स्वत:च्या मालकीची आयुधे मिळविणे सुद्धा अशक्य नाही. आयुधे सुरक्षितपणे परत करणे हा जर खरोखरच प्रश्न असेल तर त्यासाठी उपाय योजना करावयास हवी. ही उपाययोजना फार कठीण नाही. कामावर काम करणाऱ्या लोकांच्या गँग्स् असतात. प्रत्येक गँगचा प्रमुख असतो. या प्रमुखाच्यावर आयुधे वाटणे व संध्याकाळी परत घेणे ही जबाबदारी टाकता येईल. अशा गँगप्रमुखांना एकत्रित आणून व आपआपसात जबाबदारी वाटून देऊन ही कामगिरी पार पाडावी लागते.

### लोकांचा सहभाग

याशिवाय अधिक जिकिरीचे काम म्हणजे कामे शोधून काढणे. आज कामांचा अधिक तुटवडा असला तरी आर्थिक–सामाजिक परिवर्तनास पोषक कामे कोणती, प्रत्येक कामाचा भोवतालच्या परिस्थितीवर काय परिणाम होईल, इत्यादी गोष्टींचा विचार आज होत नाही. ग्राम नियोजन, तालुकानियोजन व जिल्हानियोजन हे शब्द जरी परिचित असले तरी त्यात आशय ओतण्याचे काम आपल्या देशात झालेले नाही. सामान्य कार्यकर्ता याबाबत अजूनही अडाणी आहे. यासाठी आपल्या प्रदेशाचे निरीक्षण व तज्ज्ञांच्या सहाय्याने विचार सतत व्हावयास हवेत. सामान्य नागरिकालाही या विचारमंथनामध्ये ओढले पाहिजे. सामान्य नागरिक आज असहाय, आपला या गोष्टीशी संबंध नाही, मिळेल ते काम करावयाचे याच भावनेने वावरत असतो. परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये एका निर्जीव यंत्राप्रमाणे किंवा मूक जनावराप्रमाणे काम करण्याची त्याची सवय अनेक शतकाची आहे. आजपर्यंतच्या इतिहासात सामान्य नागरिकास यापेक्षा अधिक महत्त्वाचे स्थान कधीच दिले गेले नव्हते. ही सवय घालवणे व देशाचा इतिहास घडविण्यात आपलाही वाटा व जबाबदारी आहे याची जाणीव त्यास करून देणे ही एक या कार्याचाच भाग आहे.

ग्रामपंचायत अधिक कार्यक्षम व जागरुक करणे या योजनेच्या अमलबजावणीस आवश्यक वाटते. जिथे जिथे ग्रामपंचायतीचे सभासद गावचे हित जाणतात व त्यासाठी प्रयत्नशील असतात, तिथे तिथे रोजगार देण्याची कामे अधिक चांगल्याप्रकारे व मोठ्या प्रमाणावर चालू असल्याचे दिसते. गावातील मजूरवर्गाला काम देण्याची पहिली जबाबदारी ग्रामपंचायतीवर आहे. ग्रामपंचायतीच्या आर्थिक कुवतीनुसार रोजगार देणारी कामे घेता येतात. परंतु ग्रामपंचायतीजवळ फार पैसा नसतो, अशी सर्रास तक्रार आहे ती थोडी खरी आहे पण त्यात अतिशयोक्तीही आहे. पैसा अधिक प्रमाणात उभा करण्याचा विचार होत नाही. ग्रामपंचायत उत्पादक वा अनुत्पादक अशी सर्व प्रकारची कामे घेऊ शकते. शाळेची इमारत गावातील सडका, गावची विहीर इत्यादी अनेक प्रकारची कामे ग्रामपंचायत घेऊ शकते. पैसा उभा करण्याचे मार्ग मर्यादित असले तरी उपलब्ध सर्व मार्ग क्वचितच चोखाळले जातात. तुरळक ठिकाणी ग्रामपंचायती अतिशय कार्यक्षमपणे काम करीत असल्याचे दिसते, त्या ठिकाणी बेकारीचा प्रश्नही कमी झालेला दिसतो. लोकांवर गाव सोडून जाण्याची पाळी आलेली दिसत नाही. यासाठी ग्रामपंचायतींना जाग आणणे हे कार्य व्हावयास हवे. अंतिमत: विकेंद्रित विकास व लोकशाही ग्रामपंचायतीच्या कामगिरीवर अवलंबून आहे, हे विसरून चालणार नाही.


रोजगार मिळाला तरी त्या रोजगारीत पुरेसे धान्य मिळणे अत्यंत अवघड होऊन बसले आहे. रेशनकार्डावर वेळेवर, पुरेसे व योग्य भावात धान्य मिळणे व त्याचप्रमाणे तेल, तूप इत्यादी वस्तू बाजारात मिळणे ही आज एक अशक्य कोटीतली गोष्ट आहे, असे लोकांस वाटू लागले आहे. पण हा प्रश्न अधिक व्यापक स्वरुपाचा आहे; त्यासाठी आवश्यक असणारी चळवळ ही केवळ स्थानिक स्वरुपाची नाही. तरीदेखील स्थानिक पातळीवर काही किमान कार्यक्रम आवश्यक आहेत. ग्रामपरिसरात तयार होणारा माल स्थानिक लोकांच्या गरजा पूर्णपणे भागण्याआधी बाहेर जाणार नाही याची खबरदारी घ्यावयास हवी. अन्नधान्याबाबत या दृष्टीने लक्ष ठेवता येईल. उत्पादनच कमी असेल तर बाहेरून धान्य आणणे व कार्डावर देण्याची व्यवस्था करणे यासाठी वरच्या अधिकाऱ्यावर सतत दडपण आणावे लागेल. ही चळवळ अधिक व्यापक हवी. आज महागाई व टंचाईविरुद्ध प्रामुख्याने शहरातच चळवळ आहे. आणि तरीदेखील अत्यंत संकुचित दृष्टिकोनातून चालू आहे. शहरवासीयांचे व त्यातही मध्यमवर्गातील लोकांचे हित डोळ्यापुढे ठेवून ही चळवळ चालू आहे. तेल, तूप, साखर इत्यादी वस्तूंच्या किंमती खाली आणणे हे या चळवळीचे प्रमुख उद्दिष्ट दिसते. गहू स्वस्त व्हावा म्हणजे रु. २.५० ते ३.०० पर्यंत मिळावा एवढाच दृष्टिकोन आहे. सरकारही केवळ एवढीच मागणी आहे असे गृहीत धरून चालते. अलीकडचा सरकारचा निर्णय हा या वृत्तीचे द्योतक आहे. या निर्णयाने गहू इत्यादी वस्तू थोड्याफार स्वस्त होतील, पण ग्रामीण समाजास, दलित वर्गास याचा काहीही फायदा नाही. त्यांचे हित कोणाचेच दृष्टीपुढे नाही. त्यांना लागणाऱ्या वस्तू निराळ्या; त्यांचे भाव मोठ्या प्रमाणात उतरावेत अशी योजना नाही, चळवळही नाही. आपला समाज संघटित नाही, ग्रामीण भागातील दलित वर्गाची दु:खे ही आपण आपली दु:खे मानलेली नाहीत हेच खरे! शहरातून दसरा–दिवाळीसाठी तूप, साखर मिळावी एवढेच उद्देश ठेवण्याऐवजी शहरातील लोकांनी ग्रामीण व नागरी भागातील नाडलेल्या लोकांना स्वस्त बाजरी–ज्वारी मिळावी यासाठी वास्तविक आंदोलन करावयास हवे! पण केवळ आपल्यापुरते पाहण्याच्या सवयी जडलेल्या या समाजातील लोकांना हे कसे पटवून देणार?

□ □



# विवेकभ्रष्ट वॉटरगेट प्रकरणाची धावती ओळख...

● वि. स. वाळिंबे



## उत्तरार्ध : २

वॉटरगेट प्रकरणाच्या भोवऱ्यात निक्सन आता पूर्णपणे सापडले होते; आणि तरीही, राष्ट्राध्यक्ष या नात्याने आपल्याला लाभलेल्या अजस्र अधिकारांच्या आधारावर आपण या भोवऱ्यातून सुखरूप बाहेर पडू असा त्यांना विश्वास वाटत होता. इतकेच नव्हे तर त्यांच्या आत्मविश्वासाला उद्धटपणाचा दर्प येऊ लागला. एफ. बी. आय. च्या संचालकपदी पॅट्रीक ग्रे याची नेमणूक करतानाही त्यांची तीच दृष्टी होती. परंतु अमेरिकन राज्यघटनेप्रमाणे अध्यक्षांनी केलेल्या सर्व नेमणुकांना अंतिम संमती संसदेकडून घ्यावी लागते. त्याप्रमाणे पॅट्रीक ग्रेची नेमणूक निक्सन यांनी जाहीर केल्यानंतर ग्रे याला सेनेटच्या समितीसमोर उभे राहावे लागले.

वॉटरगेट प्रकरण दडपून टाकण्यासाठीच निक्सन यांनी ग्रेसारख्या होयबाची त्या जागेवर नेमणूक केलेली आहे याचा अंदाज सेनेटमधील डेमोक्रॅटिक पक्षाच्या सदस्यांना आलेला होता आणि म्हणून त्यांनी पॅट्रिक ग्रे वर त्याच एका प्रश्नाचा मारा आरंभिला. प्रारंभीच्या प्रश्नांना ग्रे याने उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतु डेमोक्रॅटिक पक्षाचे सेनेटर अशा बेजबाबदार उत्तरांनी गोंधळून जाणारे नव्हते. ग्रेच्या मुखातून सत्य वदवून घ्यायचे असा त्यांचा निर्धार झालेला होता. त्यामुळे त्यांचे नंतरचे प्रश्न अधिक धारदार होऊ लागले. या प्रश्नांची धार अशी काही विलक्षण होती की शेवटी ग्रे याला हे सांगावे लागले की, 'वॉटरगेट प्रकरणाबाबत मी श्वेतभवनातील अधिकाऱ्यांचे जबाब घेत असताना, जॉन डीन तेथे बसून असायचा. शिवाय या काळातील एफ. बी. आय. च्या साऱ्या कागदपत्रांची डीन पाहाणी करायचा.'

वॉटरगेट प्रकरणाची आपल्याला काहीच गंधवार्ता नव्हती हे सांगणाऱ्या निक्सन यांची ग्रे याच्या या कबुलीमुळे मोठीच पंचाईत होणार होती. तरीही निक्सन यात गोवले जाऊ नयेत म्हणून ग्रेची धडपड चालू होती. त्यापायीच त्याने एर्लिचमानला तातडीने बोलावून घेतले. ग्रे त्याला म्हणाला, 'माझा अगदी निरुपाय झाला. त्यामुळे डीनसंबंधी मला खरे सांगावे लागले. लवकरच सेनेटची समिती डीनलाही साक्षीसाठी पाचारण करील. त्यावेळी आपण श्वेतभवनातील हॉवर्ड हंटच्या कचेरीतून काही महत्त्वाचे कागदपत्र पळविलेले आहेत ही गोष्ट डीनने कबूल करू नये. कारण जर का डीनने स्वतःचा बचाव करण्यासाठी ती गोष्ट सांगून टाकली तर मात्र राष्ट्राध्यक्षासह आपल्या सर्वांचीच धडगत राहाणार नाही.'

'मी डीनला भेटून तुझा निरोप सांगतो. तू घाबरून जाऊ नकोस,' एर्लिचमानने भेदरलेल्या ग्रेला दिलासा दिला.

ग्रेकडून बरीच महत्त्वाची माहिती कळल्यामुळे सेनेटच्या समितीने जॉन डीनला साक्षीसाठी बोलाविले. वॉटरगेट प्रकरण दडपून टाकण्यासाठी श्वेतभवनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रयत्न केले की नाही हे एकटा जॉन डीनच सांगू शकेल हे ग्रे याच्या साक्षीवरून स्पष्ट झालेले असल्यामुळे त्याच्या जबाबाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. तसे पाहिले तर वॉटरगेट प्रकरणाबाबत एवढा गदारोळ होत असतानाही जॉन डीनचे नाव प्रसिद्धीच्या झोतात आले नव्हते. ती कामगिरी पॅट्रिक ग्रेच्या जबाबाने पार पाडली. योगायोग असा की सेनेटच्या समितीने साक्षीसाठी बोलावण्याच्या पंधरा दिवसच आधी हाल्डेमान आणि एर्लिचमान यांच्या शिफारशीवरून, निक्सननी डीनला बढती दिली होती. तसा त्याचा आणि निक्सन यांचा परिचय

अगदी अलीकडला होता. पाच महिन्यापूर्वी प्रथमच तो निक्सनना भेटला होता आणि आपण सांगू ते काम मोठ्या चातुर्याने डीन करीत आहे हे पाहून निक्सननी त्याला नुकतेच आपल्या अन्तर्वर्तुळा-मध्ये दाखल करून घेतले होते. त्यामुळे सत्तावीस फेब्रुवारी ते सोळा एप्रिल या कालावधीत तो निक्सनना एकवीस वेळा भेटला होता आणि चौदा वेळा त्या दोघाचे टेलिफोनवरून बोलणे झाले होते.

एर्लिचमान, हाल्डेमान, मिचेल, डीन आदी निक्सन परिवारातील मंडळी आपापल्या परीने गुन्हेगारी चातुर्याची झलक दाखवीत असली तरी निक्सन त्या सर्वांपेक्षा अधिक सावध होते. त्यांनी आपल्या बैठकीच्या खोलीत कोणालाही कळणार नाही अशा रीतीने टेपरेकॉर्डर बसविला होता आणि त्यामुळे आपल्याला कोणी काय सांगितले याचा सारा तपशील त्यानी गोळा करून ठेवला होता. त्यामुळे डीन आणि निक्सन याच्यात झालेली बोलणीही ध्वनिपट्टिकावर टिपण्यात आलेली होती.

## डीनची नेमणूक

सत्तावीस फेब्रुवारीला निक्सन आणि डीन यांची पहिली भेट झाली तेव्हा निक्सन त्याला म्हणाले होते, 'वॉटरगेट प्रकरण दडपून टाकण्याच्या कामात हाल्डेमान आणि एर्लिचमान याचा बराच वेळ जातो. शिवाय पहिल्यापासून त्या दोघांचा त्यात पुढाकार असल्यामुळे ते गुतले जाण्याचा सभव अधिक आहे. तू या साऱ्या प्रकाराकडे तटस्थ दृष्टीने पाहू शकशील. म्हणून या बाबतीतील माझा सल्लागार म्हणून मी आजपासून तुझी नेमणूक करण्याचे ठरविले आहे.'

स्वत. राष्ट्राध्यक्ष आपल्यावर फार मोठी जबाबदारी टाकीत आहेत हे पाहून जॉन डीनला बरे वाटले. कामाचे स्वरूप समजून घेतल्यानतर त्याने निक्सन याचा निरोप घेतला. त्याचा हात हातात घेत निक्सन म्हणाले, 'माझ्या निवडणुकीच्या वेळी तू फारच चांगली कामगिरी केल्याचे मला माहीत आहे. मॅकगव्हर्न आपल्या प्रत्येक भाषणात वॉटरगेट हाच एक विषय बोलत होते आणि त्याच्या ह्या आरोपाला तू चोख उत्तरे देत होतास. म्हणूनच मी तुला मुद्दाम बोलावून घेतले.'

दुसऱ्या दिवशी डीन पुन्हा निक्सनना भेटायला गेला. तो निक्सनना म्हणाला, 'वॉटरगेट प्रकरणातील एक साथीदार म्हणून माझा उल्लेख होत असतो त्यामुळे माझी अवस्था बरीच अवघड झालेली आहे. कारण, न्यायालयीन चौकशीच्या कामात अडथळा आणल्याचा माझ्यावर आरोप यायचा सभव आहे'

डीनने व्यक्तविलेल्या भीतीकडे निक्सननी लक्ष दिले नाही.

पण डीनची भीती खरी ठरली. पॅट्रिक ग्रेचा कबुलीजबाब हाती येताच सेनेटच्या समितीने जॉन डीनच्या नावाचा पुकारा केला. डीनचा जबाब आपल्याला त्रासदायक होईल हे ओळखून निक्सननी जाहीर केले– 'ज्या यंत्रणेला राष्ट्राध्यक्षाचा जबाब घेण्याचा अधिकार नाही त्या यत्रणेने राष्ट्राध्यक्षाच्या सल्लागारानाही साक्षीपुराव्यासाठी बोलाविता कामा नये. डीनची साक्ष घेणे सेनेटच्या अधिकारकक्षेबाहेरचे आहे.'

निक्सन याचा हा आक्षेप इतका पोकळ होता की सेनेटला त्याची वेगळी दखल घेण्याची जरूरी भासली नाही. जॉन डीनने सेनेटच्या समितीपुढे चौकशीसाठी उभे राहिलेच पाहिजे असे घोषित करण्यात आले. लागलीच डीन निक्सन यांना भेटायला गेला. पॅट्रिक ग्रे आणि जॉन डीन यांच्याकडे सेनेटची समिती कोणत्या दृष्टिकोनातून पहात आहे यासबधी त्या दोघात चर्चा झाली. नतर वॉटरगेट-प्रकरणाचा विषय निघाला. डीन सांगू लागला, 'वॉटरगेट प्रकरणामध्ये शिक्षा झालेले आरोपी गप्प बसण्यासाठी आणखी पैसे मागत आहेत, आणि आपल्याजवळची सारी रक्कम तर संपून गेली आहे.'

हे बोलणे चालू असतानाच हाल्डेमान तेथे आला त्याला डीन-लगतच्या खुर्चीवर बसायची खूण करून निक्सननी डीनला विचारले, 'किती रक्कम लागेल?'

'किमान दहा लाख डॉलर तरी हवेतच.'

हाल्डेमानकडे पहात निक्सन उद्गारले, 'एवढी रक्कम उभी करायला फारशी अडचण पडणार नाही.'

हाल्डेमानने समतीदर्शक मान हलविली.

थोडा वेळ गेल्यानतर निक्सननी विचारले, 'पैशाची मागणी कोणाकडून करण्यात येत आहे?'

'हंटकडून.', डीनने उत्तर दिले.

निक्सन म्हणाले 'हटचे तोड लवकरच बद होईल. कारण त्याला माफी देण्यासाठी काय करता येईल याबद्दल मी हाल्डेमान आणि एर्लिचमान याच्याशी सध्या विचारविनिमय करीत आहे.'

एकीकडे वॉटरगेट प्रकरणासबधीचा अधिकाधिक तपशील प्रसिद्ध होत असतानाच, चीनशी सहकार्याचे सबध प्रसिद्ध करण्याच्या कार्याला निक्सन यानी चालना दिलेली होती. परराष्ट्रीय राजकारणामध्ये आपण आश्चर्यकारक यश मिळविले तर वॉटरगेट प्रकरणामुळे निर्माण झालेला कोलाहल विरून जाईल अशी त्याची कल्पना होती. म्हणून पधरा एप्रिलला त्यानी वार्ताहरांना मुलाखतीसाठी बोलाविले. बऱ्याच दिवसांनतर निक्सन मुलाखत देत असल्यामुळे या मुलाखतीसबधी वृत्तपत्रीय जगतात बरीच उत्सुकता होती.

निक्सननी सुरुवातीला सागितले, 'अमेरिकेचे पेकिंगमधील प्रतिनिधी म्हणून डेव्हिड ब्रुस याची नेमणूक करण्यात येत आहे.' आपल्या या ऐतिहासिक महत्त्वाच्या घोषणेसबधी वार्ताहरांकडून अधिक पृच्छा होईल अशी निक्सन याची अपेक्षा होती. पण त्याबाबत दोन–चार प्रश्न विचारण्यात आल्यावर तो विषय तेथेच सपला आणि वार्ताहरानी विचारले, 'जॉन डीन सेनेटच्या समितीसमोर हजर होण्याची टाळाटाळ कशासाठी करीत आहेत?'

निक्सनना नको होता तोच प्रश्न विचारण्यात आला. राष्ट्राध्यक्षाच्या खास अधिकारासबधीचे विवेचन करून निक्सननी तो विषय आटोपता घेतला आणि त्याचबरोबर मुलाखतही.

राष्ट्राध्यक्षाचे सल्लागार आपल्याला कितीही आश्वासने देत असले तरी वॉटरगेट–प्रकरणामध्ये आपल्याला माफी मिळणे दिवसेंदिवस अधिक कठीण होत चालले आहे हे ओळखून हॉवर्ड हटने पैसे मागण्याचा सपाटा लावला होता. वीस मार्चला हटकडून डीनला निरोप आला तेव्हा शेजारी बसलेल्या रिचर्ड मूर याला डीन म्हणाला, 'आतापर्यंत हॉवर्ड हटला चार लाख डॉलर्स देण्यात आले आहेत आणि तरीही तो गप्प बसायला तयार नाही. आताच त्याने आणखी बहात्तर हजार डॉलर्स स्वत:साठी आणि पन्नास हजार डॉलर्स वकिलाला देण्यासाठी मागितले आहेत.'

पृष्ठ २२ वर



# एमिली ब्रॉण्टे

● सौ. सुमती देवस्थळे ●

क्षयाच्या दुखण्याने हल्लक झालेले अशक्त शरीर, अनागर भाबडे रूप, अवघे ३० वर्षांचे आयुष्य, फक्त एक कादंबरी व काही कविता एवढीच लेखनसीमा !

एवढ्याशा संचितावर साहित्यिक कलावंतांच्या प्रभावळीत मानाचे पान अन् अढळ स्थान मिळणे शक्य आहे ?

एमिली ब्राण्टने ते अभावितपणे शक्य करून दाखविले आहे. साहित्याशी तिचा सूर जेमतेम जुळला, आत्मविश्वासाची मंदशी झुळूकही आली नाही – तोच पार्थीव जीवनाच्या यातनापर्वात ती भेलकांडून गेली. तिचे लिखाण संख्येने फारच थोडे आहे. तथापी तिने जे लिहिले त्या प्रत्येक शब्दाला तिच्या जगावेगळ्या आत्मकेंद्री, एकाकी व्यक्तिमत्वाचा खास असा रंग आहे. विलक्षण उत्कट आत्मविष्कार करणारी ही विजनवासिनी रसिकमनाला अक्षरशः पिळवटून टाकते, अस्वस्थ करते. एमिली ब्रॉण्टला जाऊन सव्वाशे वर्षे होऊन गेली. अन् तरीही तिची कविता अद्याप सतेज आहे – ताजी आहे. तिच्या ' वुदरिंग हाइटस् 'ची लोकप्रीयता वादातीत आहे.

एमिली ब्रॉण्टचा परिचय तिच्या अगणित चरित्रांपेक्षाही तिच्या कवितेतूनच बरोबर होतो. अत्यंत तरल अशा भाववृत्तींचा आविष्कार करण्याचे विलक्षण सामर्थ्य तिच्या कवितेत आहे. एमिलीच्या अंतःकरणाची अंतस्थ गहनता केवळ असीमच म्हणायला हवी. तिला झपाटणारी दुःखे, वेदना कवितेत सौंदर्यपूर्ण होतात आणि रसिकाला ' ये हृदयीचे ते हृदयी ' असे सरळ गूज सांगून जातात. हृदयाला अशी असाधारण बेचैनी आणणाऱ्या एमिलीची ही जीवनकथा. तिच्या जीवनाविषयी फारच थोडासा तपशील उपलब्ध आहे. पण जो आहे तो अस्सल, निर्भेळ असा आहे. त्याला तिच्या साहित्याच्या अभ्यासाची जोड दिली की एमिलीच्या व्यक्तिमत्वाची नस समजू शकते.

३० जुलै १८१८ हा एमिलीचा जन्मदिवस. तिचे वडील पेट्रिक ब्रॉण्टे हे आयर्लंडचे रहिवासी. त्यांना आणखी नऊ भावंडे – घरात अठरा विश्वे दारिद्र्य – विणकर, सुतारकाम इ. कामे केल्यावर धर्मगुरू होण्याची त्यांनी 'महत्त्वाकांक्षा' बाळगली. त्यासाठी अनेक खटपटी करून केम्ब्रीजला आले आणि चार वर्षे शिक्षण घेऊन 'व्हिकार' बनले. नंतर थॉर्टन या अगदी छोटचाशा गावी त्यांची नेमणूक झाली. मरीया बार्नवेल या साध्याभोळ्या मुलीने त्यांच्याशी प्रेमविवाह करून दारिद्र्यातही सुखी ससार करण्याचे आश्वासन दिले. गरिबीचा संसार सुरू झाला. 'लेकुरे उदड झाली' त्यामुळे लक्ष्मीचा ओझरता वारा लागणेही अशक्य झाले. भराभर मुले होत गेली. ५ मुली अन् एक मुलगा. एमिली हे पाचवे अपत्य. तिचा जन्मही थॉर्टन्लाच झाला. ती झाली तेव्हा सर्वात मोठ्या मुलीचे वय अवघे ४ वर्षे ३ महिने इतकेच होते ! नतर १॥ वर्षाने ॲनीचा जन्म झाला. त्यानतर पेट्रिक् ब्रॉण्टे याची नेमणूक हॅवर्थ या ओसाड, एकाड्या, लहानशा खेडेगावी झाली. घरात दारिद्र्य भरपूर ! सारी लहान लहान वेड्या वयाची मुले ! मरीयाला सतत कष्ट करावे लागत. तिची प्रकृती धड राहीना. रुटुखुटू करून गाडा ओढणेही अशक्य झाले. कारण पेट्रिक हा ससाराचा जोडीदार स्वभावाने तिरसट, खरखरमुंडा अन् चमत्कारिकच होता. बायकोला तो धडपणी वागवीत नसे. 'हम करे सो कायदा' अशी त्याची पद्धत होती. घरातल्या मडळीना सुख देण्यात तो कुचराई करीत असे. मुले आसपास आलेली, पायात घोटाळलेली त्याला खपत नसत. एकटा आपल्या अभ्यासिकेत बसून शांतपणे जेवीत असे. त्याच्या तिरकस वागण्यावर आधारलेल्या कितीतरी दतकथा आहेत. मुले बावरत असत. कष्टात पिचणाऱ्या मरीयाला लवकरच कॅन्सर झाला. हॅवर्थला आल्यावर अवघ्या दीड वर्षाने साऱ्या चिमण्या पाखराना वाऱ्यावर सोडून ती देवाघरी गेली (१८२१ साली.)

एमिलीची आई गेली तेव्हा वडील ४४ वर्षांचे होते. पदरात ६ छोटी छोटी मुले ! अठराविश्वे दारिद्र्य ! साऱ्या कुटुबाची कळाच बदलून गेली. पेट्रिक् ब्रॉण्टेला ब्रह्माण्ड आठवले ! मुलाची जबाबदारी घेण्यासाठी तरी हक्काची बायको मिळविण्याचा त्याने प्रयत्न केला. पण गरिबीतल्या काव्यमयतेवर मरीया बार्नवेल्प्रमाणे इतर कोणत्याही मुलीचा विश्वास नसल्याने सक्तीची विधुरावस्था पेट्रिक्च्या नशिबी आली. सर्वात मोठी मुलगी मरीया वय वर्षे ७. त्यानतर एलिझाबेथ वय वर्षे ६. मग शार्लट, बार्नवेल्, एमिली, अन् अखेर ॲनी. मरीया ही पाठच्या ५ भावंडाची चिमुकली आई बनली. ती आणि एलिझाबेथ् पाठच्या भावडाचे सारे काम करीत – त्यांना खाऊपिऊ घालीत, गाणी म्हणून झोपवीत, गोष्टी सांगत – लिहायलासुद्धा शिकवीत...! विशेष म्हणजे हे सारे अत्यंत प्रेमळपणे करीत. आईचे छत्र हरपल्याने सारी मुले समदुःखी होती – त्यापायी सघटित होऊन एकमेकांना आधार देत होती. परस्पराशी मनःपूर्वक सहकार्य करण्याचा अवघड वस्तुपाठ त्या कोवळ्या वयातच मुलांनी आत्मसात केला होता. पोरवयात खूपशी समज आली होती. चिमुकली ताई पाच भावडाची माळका घेऊन मोकळ्या माळरानावर फिरून येई. तिच्यापाशी गोष्टीचा मोठा साठा होता. गोष्टीचे मुलाना केवढे अप्रूप ! पण... आई नव्हती ! दिवस काट्यावरून ओढून काढल्यासारखे फरफटत होते. पोरांची आबाळ होत होती. अखेर मुलांच्या मावशीला – एलिझाबेथ् बार्नवेलला पेट्रिक्ब्रॉण्टे यानी बोलावून घेतले. तिने कर्तव्य बुद्धीने घराची सूत्रे ताब्यात घेतली खरी...पण आपला पूर्वीचा निर्वेध आयुष्यक्रम सोडून या गांवढ्या गावात येणे अन् मुलाच्या रगाड्यात सापडणे तिला काही मनापासून आवडत नव्हते. तिची नेहेमी कुरकूर चालायची. घरात कार्पेटस् पसरलेल्या नव्हत्या. खिडक्यादाराना पडदे नव्हते. भोवती पसरलेल्या कातळावरून थड वाऱ्याचे झोत येत. सारे वातावरण गोठून जाई. घरात पुरेसे फर्निचर नव्हते. खेरीज पेट्रिकचा चिडका-एकाडा-रागीट स्वभाव ! स्वत:च्या खोलीत एकट्याने जेवण्याइतका तुसडेपणा ! ते स्वतः मांस खात नसत, इतरानाही खाऊ देत नसत. मुलांचा आहार मुख्यत्वे बटाट्याचा ! आपल्या मुलानी बाहेरच्या खेडवळ पोरात मिसळलेले चालायचे नाही. त्यांनी मुलाच्या अभ्यासिकेतच (ती म्हणजे एक लहानशी खोली) बसले पाहिजे. तेथेच काय ते खेळा ! त्यामुळे मुले कल्पना साम्राज्यात रमायला शिकली.

रोज सकाळी पेट्रिक आपल्या मुलांना थोडेफार लेखन वाचन शिकवी. अन दुपारी मावशी मुलीना शिवणकाम, घरकाम इ. शिकवी. कर्तव्यपालन, वक्तशीरपणा व एकदर शिस्त या गुणावर मावशीचा कटाक्ष असे. बार्नवेल हा एकुलता एक मुलगा म्हणून आणि ॲनी ही सर्वात धाकटी म्हणून त्या दोघांकडे विशेष लक्ष दिले जाई. मधली एमिली दुर्लक्षित असे. तिची उपेक्षा होई. आपण नकोशा आहोत. एकाकी आहोत ही भावना त्या चिमुरड्या सवेदनाशील मनात अति कोवळ्या वयातच रुजली. त्यातून नकळत आत्म सरक्षणाची भावना निर्माण झाली. त्याचा आविष्कार वयाला विशोभित अशा विलक्षण अलिप्ततेत झाला. हा सारा जीवनाचा खेळ केवळ साक्षित्वाने पहायचा आहे असे तिला वाटत राही. पोरवयात ही भावना रुजली असली तरी तिचा पूर्ण पगडा बसला नव्हता. क्वचित तिच्या खोड्या चालत. पण त्यात एमिली गुतत नसे. निर्भरमनाने माळरानावर भटकत रहाण्याची तिला विलक्षण आवड होती. घुमणारी राने, भारावलेले मेघमडळ, झिरमिर पाऊस, हिमसेक या सर्व अबोल रहस्यांच्या सहवासात तिचे दबलेले भाव विमुक्त होत असत. एरवी अबोल, सकोची, कुढी, विमनस्क भासणारी एमिली माळरानावर गेली की फुलारून जाई. लाडक्या कुत्र्याला सोबतीला घेऊन, गाणे गुणगुणत, माळरानावर स्वैर भटकणे हा तिच्या आवडीचा छद होता कोणत्याही प्रकारची कृत्रिमता किंवा औपचारिकपणा तिला कधी आवडला नाही. 'देवान घडवलय तसं रहायचं !' हे तिच सूत्र !

हॅवर्थ हे अगदीच कोपऱ्यातले, मामुली, लहानसे खेडे होते. दळणवळणाला सपूर्ण गैरसोयीचे. औद्योगिक क्रातीची चाहूलही तेथवर लागली नव्हती. अशावेळी घरच्या मुलाच्या शिक्षणाची व्यवस्था करायची म्हणजे बोर्डिंग स्कूलमध्ये मुलाना पाठवावे लागे. खेडे गावातल्या व्हिकारला एवढ्या सर्वांची व्यवस्था करणे शक्यच नव्हते. मग पेट्रिक ब्रॉण्टे यांनी क्लर्जी मडळीच्या मुलीच्या शिक्षणासाठी असलेल्या धर्मादाय शाळेत मुलीना पाठवून देण्याचे ठरविले. स्वस्तातली स्वस्त शाळा शोधून काढली. मरीया, एलिझाबेथ व शार्लट या तिन्ही मोठ्या मुलीना तेथे पाठवून दिले. थोडे दिवसानी

एमिलीलाही पाठविण्यात आले. त्यावेळी ती अवघी सहा वर्षांची होती. सबंध शाळेत सर्वात लहान! सर्वांची आवडती. कोवळ्या वयात ती दिसेही छॉन. वयाच्या मानाने फार शहाणी व समजस होती.

एमिलीला मुळातच विमुक्त, निर्भर असा वावर हवा असे. शाळेसारख्या बदिस्त वास्तूत हा मोकळेपणा नव्हता. शाळेत साडपाण्याची चागली व्यवस्था नव्हती. त्यामुळे साथीचे रोग फैलावत. नेहमी कसल्याना कसल्या साथीचा प्रादुर्भाव होई. शाळेत डांग्या खोकल्याची साथ आली अन ती भराभर फैलावली. तशात तापसराई सुरू! मोठी मरीया तापाने फणफणली. तिला घरी धाडण्यात आले. घरी मृत्यू तिची वाटच पहात होता! पाठोपाठ एलिझाबेथ आजारी पडली. तिला घरी धाडले. तीही मोठ्या बहिणीच्या पोठोपाठ देवाकडे निघून गेली. मग मात्र पेट्रिक ब्रॉण्टे घाबरून गेले. त्यानी उरलेल्या दोघीना घरी बोलावून घेतले. अशा रीतीने ६ व्या वर्षी शिक्षणाला केलेली सुरुवात अवघ्या ६ महिन्यातच थाबून राहिली. त्यानतर एमिलीला शाळा बद! शिक्षणात खड. घरात उदासीनता साकळलेली. आईच्या ठायी असलेल्या दोघी मोठ्या बहिणी गेल्या! जीव सैरभैर झाला! घरात तिला मोठमोठ्याने रडण्याचा आवाज ऐकू येई, उसासे ऐकू येत. बार्नवेलला तर मरीयाचा आवाज खिडकीतून ऐकू येई. ती बोलावीत आहेसे वाटे! (हीच घटना वुदरिंग हाइट्स्‌मध्ये आलेली आहे.)

एमिलीकडे वडिलाचे फारसे लक्ष नसे. आणि या वस्तुस्थितीची तिला जाणीव होती. एकदा अगदी अभावितपणे वडिलानी तिला शाबासकी दिली, अन ते म्हणाले 'एमिली, तू नेहमीच अशी गोड का वागत नाहीस?'

'अन पपा, तुम्ही तरी नेहमी काहो चागले वागत नाही?'

केवळ प्रतिबिंबभावाने स्फुरलेले हे उत्तर पपाना सहन झाले नाही. सताप उसळून आला. ते ओरडले, 'छट्, मला नाही तू आवडत! चालती हो!' देवाची प्रार्थना कर. क्षमा माग. खरोखरच तुला इतक्या दिवस वाढवल्याबद्दल मला तीव्र पश्चात्ताप होतोय!'

हा उद्रेक ऐकताच एमिलीचे डोळे भरून आले. वडिलांविषयीच्या आदराला तडा गेला. घरात मावशी होती. ती शिवणकाम शिकवीत असे. एमिलीला ती सारी खटपट अगदी निरानद वाटायची! Lead's Intelligence, Black wood Magazine वगैरे वाचण्यात ती रमत असे. सर्व ब्रॉण्टे भावडाना वाचनाची आवड होती. अक्षर ओळख झाली की मुलाना जणू जादुनगरीची किल्ली मिळाल्याचा आनद होई, ती पुस्तकात रमून जात. वडिलांजवळ जुनी इग्लिश क्लासिकस्, गलिव्हरचे प्रवास, रॉबिन्सनक्रूसो, अशी काही पुस्तके होती. घरापासून दोन मैलावर पॉण्डेन हाऊस हे चर्चच्या विश्वस्ताचे घर होते. त्यात बऱ्यापैकी वाचनालय होते. एमिली वाचनालयात जाण्याच्या निमित्ताने बाहेर पडे. मोकळ्या कातळावरचा भन्नाट वारा अन निसर्गाचे विविध विभ्रम डोळ्यात साठवून घेई. घराच्या भिंतीत साकळलेल्या, दडपलेल्या मनाला मोकळ्या वाऱ्यावर प्रसन्न वाटत असे. बरोबर सोबतीला लाडका कुत्रा असायचा. त्याची साखळी धरून, कलदर मुलासारखी शीळ घालीत मोकळ्या माळावर हिंडणे आणि खडकात लपलेली निसर्गाची गुपिते न्याहाळणे यात तिचा सर्व आनंद सामावलेला होता.

एकाड्या घरात ही पोरकी पोरे रहात होती. दारिद्र्यामुळे अन्नवस्त्राची आबाळ! सुरळीत शिक्षण नाही. अशा सर्वस्वी प्रतिकूल वातावरणात ही मुले शुद्ध आनदाचे कण शोधीत होती. एमिलच्या हृदयात तरलता होती. अत्यत सवेदनाशील भाववृत्तीना घराभोवतालचा निसर्ग खुणावीत होता. औपचारिक शिक्षण नव्हते खरे, पण निसर्गसौदर्याचे केवढे तरी जिवंत पुस्तक घराबाहेर उघडलेले होते. त्यात नित्य नवा, चेतोहर आशय उमलत होता; सारे विभ्रम मनाला मत्रमुग्ध करीत होते. घराभोवतीचे अमर्याद कातळ ही तिची अंगणओसरी! सोबतीला कुत्रे, माजर, ससाणा, आणि इतर प्राणी. कुत्र्याला जीव लावायचा, आपल्या हाताने त्याची निगा राखायची. पक्षाचा पिंजरा धुवायचा, त्याना चिमणचारा घालायचा, त्याच्याशी बोलायचे, खेळायचे यातच एमिलाचे भावजीवन गुतले होते, सस्कारित होत होते.

एमिली दिसायला अगदीच सामान्य होती. आकर्षकता मुळीच नव्हती. बहिणीकडून ती कोणत्याही मदतीची अपेक्षा करीत नसे. स्वाभिमानी असल्याने कोणाची दया तिला आवडत नसे. तिने स्वत चे खास असे भावविश्व घडविले होते. त्या कोशातच ती वावरत होती. मौनात बोलत होती. तिच्या व्यक्तिमत्त्वाभोवतालचे कवच अभेद्य होते. एकाकीपणाची तीव्र जाणीव, नजर सर्वस्वी अतर्मुख, त्यात निसर्गाशी सूर जुळला. अतरगात काव्यगगेचा प्रवाह खळाळत राहिला. काया पाकोळीसारखी नाजुक. पण अतरग निकोप व काव्यजीवी होते. कल्पनेच्या जगात वावरणाऱ्या भावजीवी व्यक्तीला वास्तव जग निरानद, पोकळ, रुखेसुके वाटते. ती पोकळी भरून काढण्यासाठी निर्मितीची ओढ लागून रहाते. त्याच्यातला कलावत जागा होता, अस्वस्थ होतो, निर्मितीचे वेध लागतात. एमिली लहान वयात 'गोण्डल् पोएट्री'मध्ये रमत असे. परपरागत लोककथासारखी असणारी ही लोकगीताची रचना तिला कल्पनारम्य वाटे. तिच्या भावजीवी मनाला फुलविण्याचे, निर्मितीचे साधन हाती देण्याचे अन् रचनेस प्रवृत्त करण्याचे सामर्थ्य गोण्डल् पोएट्रीत होते असेच म्हटले पाहिजे.

एमिली घरात भरपूर काम करी. सर्व अवघड, कटकटीचे, तापदायक काम आपणहून करी. अन् तरीही ती सर्वांतून अलिप्त अबोल, एकाडी अशी राही. स्वत.भोवती तिने एक अभेद्य भिंत तयार केलेली होती. एमिलीच्या अतर्मनात कोणालाही प्रवेश नव्हता. काम झाले की कुत्र्याला घेऊन भरपूर भिरभिर फिरायचे, २ मैलावरच्या वाचनालयातून पुस्तके आणायची अन् त्यात बुडून जायचे असा तिचा जीवनक्रम. काही दिवसानी चर्चच्या निमित्ताने घरात ऑर्गन् आला. बार्नवेलजवळ ती ऑर्गन वाजवायला शिकली. लवकरच ते सूर तिच्याशी सलगी करू लागले. ऑर्गन हाही तिच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनून गेला. काव्याला सुराची साथ मिळाली. एमिलीला चित्रकलाही अवगत होती. ती सुरेख चित्रे काढीत असे. बार्नवेल तर व्यावसायिक चित्रकार बनू पहात होता. त्यामुळे चित्रकलेची सर्व साधने घरात होतीच. चित्रे काढण्यात ती तासन् तास रमत असे. कलेच्या उत्कटतेत भोवतालचे करुणाशून्य काटेरी विश्व तिच्या लेखी वितळून जाई. तिची सवेदना कलेच्या माध्यमातच स्फुरत

राहिली. साहित्य, संगीत अन् चित्रकला यात ती मग्न असे. तथापी आपल्या कलेचे तिला कोडकौतुक नव्हते. भोवतालच्या रुक्ष, गतिशून्य, घटनाहीन, दारिद्र्याने अगतिक झालेल्या जीवनात राहूनही तिच्या अंतरंगात शुद्ध कलानिर्मितीचे कमळ फुलत राहिले ही गोष्ट केवळ असाधारणच मानली पाहिजे.

पपा ब्रॉण्टे यांना मिल्टन्‌ची कविता आवडे. 'पॅरडाइझ लास्ट' हे काव्य त्यांना पाठ होते. बायरन्‌ची कविता आवडत होती. सबंध ब्रॉण्टे कुटुंबाला बायरन्‌च्या कवितेची विशेष आवड होती. एमिलीने अत्यंत संस्कारक्षम वयात बायरन् वाचला होता. मूरने लिहिलेले त्याचे चरित्र वाचले होते. बारा वर्षांनंतर रंगविलेल्या सॅथ्‌क्लिफ्‌च्या व्यक्तिचित्रात बायरन्‌ची एक छटा मिसळून जायची होती. मिल्टन्‌च्या पॅरडाइझ लॉस्टचाही एमिलीच्या मनावर संस्कार होता. सॅटन्‌विषयी सहानुभूती होती. एक शापभ्रष्ट देवदूत अशी त्याची छाप उमटली. हळूहळू कवितेतल्या व्यक्तिरेखा तिला अधिक जिवंत भासू लागल्या. तिच्याशी बोलू लागल्या. रुक्ष, परखड, निरानंद वास्तव मनाच्या नजरेआड झाले. असून नसल्यात जमा झाले. भावविश्व हेच तिच्यापुरते वास्तवविश्व झाले. कलेचा सूर लागला. अधून मधून काव्यरचना करण्यास सुरुवात झाली.

बार्नवेल हा ब्रॉण्टे कुटुंबातला एकुलता एक मुलगा. सर्वांचे आशास्थान. तेव्हा त्याच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यावे हे सहाजिकच होते. त्याची चित्रकलेची आवड लक्षात घेऊन त्याला लंडनच्या रॉयल अकॅदमी ऑफ आर्टस्‌मध्ये पाठवायचे ठरले. तेथे शिक्षण फुकट मिळण्याची व्यवस्था करण्यात आली असती. पण लंडनला रहायचे म्हणजे खर्च फार! त्यावर शार्लट् ब्रॉण्टेने उपाय काढला. तिने Roe-Head येथील मिस् वुलर यांच्या शाळेत शिक्षिकेचे काम मिळविले. पगार अगदीच बेताचा. पगाराचा काही भाग म्हणून आपल्या बहिणीला तेथे शिक्षण मिळावे अशी तिने व्यवस्था केली. त्यामुळे एमिलीला शाळेत शिक्षण मिळण्याची संधी आली. १७ व्या वाढदिवशी एमिलीने शाळेत पदार्पण केले.

एमिलीसारख्या भावजीवी मुलीने रमावे असे त्या शाळेत काहीही नव्हते. बंदिस्त खोलीत वावरताना तिला माळरानावरचा विमुक्त विहार आठवत राही. नेहमीच्या चाकोरीतले ठोकळेबाज शिक्षण तिला तापदायक वाटू लागले. शिक्षणातली भावशून्य हडेलहप्पी तिला खुपत राहिली. 'स्वातंत्र्य' हा तिचा प्राण होता. शाळेत त्या प्राणाची कोंडी होत होती. सकाळी उठावे तर यॉर्कशायरमधील असीम कातळ मनाला साद घालीत राही. तेथला विमुक्त वारा, झिरमिर पाऊस, रानवेली, सारे काही खुणावत राही. सारा रेंगाळणारा दिवस कसा ढकलावा हे तिला कळेना. मनाने तशीच शरिरानेही ती अस्वस्थ झाली. करमेना, अन्न जाईना, घराची ओढ, मोकळया वाऱ्याची ओढ, कुत्र्यामांजरांची सय, पाखरांची सय!



जिथ जिथे जीव जडलेला होता ते सारे काही रुक्ष शिक्षणापायी दृष्टीआड झालेले होते. स्वातंत्र्य नाही, सारा दिवस बांधलेला, मग एमिलीची प्रकृती ढासळली. चेहरा पाढराफटक पडला. असे का व्हावे हे शार्लट्‌ला समजत होते. ही चैतन्याची मूस बिन चेहऱ्याच्या शाळेत रमणे शक्य नाही हे शार्लट्‌ने ओळखले. एमिलीचे मन चाकोरीच्या अस्तित्वालाच मुळी मानत नव्हते. वर्तुळात गरगरण्यास नाकारीत होते, कविता रचीत होते. मनात भराऱ्या घेत होते. दिवास्वप्नात गुग होते. झिरपत, विरत, ढासळत होते. शार्लट्‌ने ओळखले की, शाळेच्या पिंजऱ्यात हा पक्षी काही फसायचा नाही. झुरणीला लागून मरून जाईल. तिनेच त्या पिंजऱ्याचे दार उघडले. अवघ्या तीन महिन्यात एमिली घरी परतली, अन् तिच्या ऐवजी ॲनीने शिक्षण घेण्यास सुरुवात केली. एमिलीने शाळेत असताना बरीच काव्यरचना केली होती. 'No coward Soul is mine' ही सुप्रसिद्ध कविता शाळेतच वयाच्या १७ व्या वर्षी रचलेली होती. १८३५ च्या ऑक्टोबरमध्ये एमिलीने शाळेचे बंधन दूर केले.

घरी गेल्यावर कोणतेही औषधपाणी न घेताच तिची प्रकृती सुधारली. मुक्या प्राण्यानी केलेल्या प्रसन्न स्वागताने ती हरखून गेली. याच सुमारास बार्नवेलही लण्डनहून परत आलेला होता. दुःखाची गोष्ट म्हणजे तो अपयशाची उदासी घेऊन परतला होता. अकॅडमीतल्या विद्यार्थ्यांबरोबर शिकणे त्याला जमत नव्हते. शहरी विद्यार्थी चलाख, पटाईत अन् चटपटीत होते त्या वातावरणात बार्नवेलचा न्यूनगंड वाढत गेला. मनाने खचला अन् नैतिक पातळीही घसरली. घरातला एकुलता एक मुलगा असा कोळपून गेला... वातावरण बदलून गेले. हा कसा मार्गाला लागतो ही सर्वांना चिंता. त्यापायी एमिलीकडे कोणाचे फारसे लक्ष गेले नाही. ही काय वाचते, काय लिहिते याबाबतीत कोणीही विचारपूस केली नाही. तिला फक्त तिचीच सोबत होती... अन् मुके प्राणी तिला रिझवीत होते. एमिली भरपूर काम करी. स्वैपाकाच्या ओटयावर पुस्तक उघडलेले असायचे. पायात लाडका कुत्रा घोटाळत असायचा. नेहमीची मोलकरीण टॅबी आजारी होती. तेव्हा एमिली भराभर कणीक मळून पाकसिद्धी करीत असे. टॅबीची सारी सुश्रूषाही स्वहस्ते करीत असे. टॅबी विषयी केवढी आत्मीयता ! अर्थात हे प्रेम अबोल असले तरी कृतिशील होते. इतकेच नव्हे तर वुदरिंग हाइटस्‌मधील नेली डीनच्या व्यक्तिरेखातून शब्दबद्ध व्हायचे होते, अजरामर ठरायचे होते.

वयाच्या एकोणिसाव्या वर्षी हॅलिफॅक्स जवळच्या Law Hill येथील एका शाळेत एमिलीने governess चे काम स्वीकारले, कारण घरची आर्थिक परिस्थिती फार ओढाताणीची होती. छोटया छोटया मुलींना सांभाळायचे, गाणी शिकवायची असे काम होते. वस्तुतः एमिलीला लहान मुलात रमता येत नव्हते. त्यांची गडबड गोंधळ सहन होत नव्हता. मुले भिरभिरायला लागली, अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडू लागली म्हणजे तिला ताण पडे. असल्या कामाचा तिला सराव नव्हता. आवड नव्हती. बंदिस्त जीवन स्वीकारणे जवळ जवळ अशक्य होते. स्वातंत्र्याचे मूल्य प्राणपणाने जपण्याइतके अमोल वाटत होते... देहाने ती शाळेत अडकली होती पण मन मात्र माळरानावरील पिसाट वाऱ्यावर भिरभिरत होते. शाळेत रमता येईना. दबलेले उमाळे कवितेत शब्दरूप धारण करीत. घराची आठवण बेचैनी उत्पन्न करीत होतीच. अखेर जेमतेम ६ महिने काम करून तिने नोकरीला रामराम ठोकला. घरी आल्यावर भोवतालच्या माळावर तिला आपला हरवलेला सूर सापडला.

येथवर १८४० साल उजाडले होते. तिन्ही बहिणी घरी एकत्र होत्या. William Weightman हा क्यूरेट नव्यानेच हॅवर्थला आलेला होता. तो नेहमी घरी येई. तिन्ही बहिणींना तो हवासा पाहुणा होता. बार्नवेलमात्र घरी नसे. त्याला ब्रॅडफोर्ड येथे स्वतःचा स्टुडिओ थाटून देण्यात आलेला होता. त्याच्यापाशी व्यावहारिक चलाखी आणि हरहुन्नरीपणा याचा संपूर्ण अभाव असल्याने वर्षभरातच त्याला परतावे लागले पुष्कळसा अनुभव गाठी बांधलेला होता, पदरी भरपूर कर्जही होते. तरणाताठा मुलगा कर्जाचा भार शिरावर घेऊन आणि अपयशाचा कालिमा घेऊन परतला होता. हा धक्का केवळ व्यक्तिगत नसून सबंध कुटुंबालाच तो धक्का वाटला. कुटुंब हदरून गेले. आर्थिक परिस्थिती सावरण्यासाठी शार्लट् व ॲनी यांनी निरनिराळ्या कुटुंबात जाऊन, शिक्षिकेचे काम इ. कामे स्वीकारण्यास सुरवात केली. बहिणी दुरावल्या. विशेषत. ॲनीचा दुरावा एमिलीला अस्वस्थ करीत असे. घरात बार्नवेल असला तरी त्याला ॲनीची सर येणे शक्य नव्हते, तोही आत्मकेन्द्री बनला होता, निराशेच्या कोशात घुसमटत होता. एमिलीची दृष्टी स्वतःच्या अंतरंगातील स्पंदनांवर स्थिरावली होती. देहाच्या बंदीतून आत्म्याची मुक्तता... मुक्ती... स्वातंत्र्य... हाच तिचा ध्यास. विदेही बनून विमुक्त होण्याचा ध्यास ! तो ध्यास काव्यरूप घेऊन शब्दांकित होत होता. आपण सतत त्या उत्कट भावावस्थेत रहात नाही, देहाची बंधने पार्थिवाशी खिळवून टाकतात... व्यवहार पुरा झिंझाटून टाकता येत नाही ही तिची व्यथा होती. 'गोण्डेल्' काव्याची कल्पनारम्य गोडी तिला थोडासा दिलासा देत होती. प्रेमाचा अनुभव नव्हता. तरीही कवितेतून प्रेमाची व्यथा ओसंडत होती. त्यात विरहिणीची आर्तता होती. योगिनीचा विराग होता. कधी तो पशुपक्षावर आरोपित होई तर कधी कल्पनेतल्या प्रियकरास उद्देशून व्यक्त होई

बाकी काव्य जीवन आणि रुक्ष व्यवहार याची जोडी बदसूरच असायची. एमिलीलाही काव्याच्या स्पंदनात सतत रहाता येईना. अन् अर्थार्जनासाठी बाहेर जाणे मानवेना. यावर शार्लटने एक उत्तम उपाय शोधून काढला. घरच्या घरीच शाळा काढली तर ?... ही शार्लटची कल्पना सर्वांनी उचलून धरली. शार्लट्‌ने एमिलीची मूकसंमती जमेस धरली. तिचे सहकार्य हवेच होते. शाळा काढण्यात तशी अडचण काहीच नव्हती. पण... शार्लट् व एमिलीकडे शिकायला येणार कोण हा महत्त्वाचा प्रश्न होता. त्यांना अशा काय पदव्या लाभलेल्या होत्या ? की वेगळ्या युरोपीय भाषांचे ज्ञान होते ? शाळा काढायची म्हणजे कमीत कमी फ्रेंच व जर्मन भाषा यायला हव्यात. त्याखेरीज शिक्षण पूर्ण होऊ शकत नाही असा तत्कालीन समज होता. तेव्हा अध्ययन आधी करायचे अन् मग अध्यापन करायचे ठरले.

शार्लटने फ्रेंच भाषा शिकण्यासाठी ब्रुसेलसला जाण्याचा निश्चय केला. बरोबर एमिलिलाही नेले म्हणजे शाळेत २ तज्ज्ञ शिक्षिका तयार होतील हा तिचा व्यावहारिक हिशोब ! पपा ब्रॉण्टे या दोघींना इतके लांब पाठवायला धावरत होते. तिथे नीट आधार मिळाला

नाही तर?... मग ते स्वतःच दोघीना पोहोचवायला निघाले. लंडनमध्ये मुक्काम करून, तेथील प्रेक्षणीय स्थळे पाहून मग पुढे जाण्याचे ठरले. बरोबर मेरी टेलर ही शार्लट्ची मैत्रीणही होती. तिची प्रसन्न सोबत, समुद्रातला प्रवास, भावी महत्त्वाकांक्षेचा उत्साह, पराकोटीची जिज्ञासा, या साऱ्या कारणानी शार्लट् फुलून गेली होती. तिला शिकायची खूप हौस! पण एमिलीला काही असली हौस नव्हती शाळा नामक चाकोरीशी तिचा जो परिचय झालेला होता तो मुळीच उत्साहवर्धक नव्हता. उलट ठामठोक, भावशून्य असे यातनामय जीवन कठावे लागणार ही भीतीच होती. पण पोटा-पाण्याचा प्रश्न होता! इमाने इतबारे मिळेल तेवढे शिक्षण पदरात पाडून घ्यायला हवे होते. मिसेस हेगर याच्या, वसतिगृहयुक्त शाळेत रहाण्याची सोय छान होती. त्याच शाळेच्या मुख्याध्यापिका होत्या. श्री. हेगर हेही काही विषय शिकवीत असत.

एमिलीला येथे भाषेची अडचण भासू लागली. फ्रेंचशी तिचा अगदीच परिचय नव्हता. जवळजवळ पहिल्यापासून सारे शिकावे लागले. श्री. हेगर मन पूर्वक मेहनत घेऊन तिला शिकवीत असत. हात राखून विद्या देण्याची त्याची प्रथाच नव्हती. मुळातच अत्यंत बुद्धिमान असलेल्या एमिलीची योग्यता शिक्षकाच्या लवकरच लक्षात आली. विद्यार्थी दशेत तिने लिहिलेले ७ निबंध अद्याप जपून ठेवलेले आहेत. त्यातील तिच्या प्रतिक्रिया तिच्या स्वतंत्र बाण्याची साक्ष देतात. तिच्या बुद्धीचे अलौकिक पैलू शिक्षकाना विस्मयचकीत करीत असत. एखादी गोष्ट तर्काने जाणून घेणे, नेमके तर्कशुद्ध argument करणे हे तिचे विशेष होते. शिक्षकाना वाटे, उगीच ही मुलीच्या जन्माला आली! मुलगा झाली असती तर...? आजवर केवढी झेप घेतली असती, अन् कुठल्या कोठे पोहोचली असती?

ब्रुसेल्समध्ये दोघी बहिणी एकमेकीची सोय पहात, अडचणी समजावून घेत. सुटीच्या वेळी ब्रुसेल्समधील ऐतिहासिक स्थापत्य पाहून घेत. कारण 'ब्रुसेल्सचा इतिहास दगडाने लिहिलेला आहे' अशी ख्याती होती. सहा महिन्यात भाषा आत्मसात करायची होती. एमिलीला केव्हापासून घराचे वेध लागलेले होते. सहा महिन्यानी हेगर मंडळीनी शार्लट्ला आपल्याच शाळेत इंग्रजीची अध्यापिका नेमले. एमिलीलाही लहान वर्गाला गाणे शिकविण्यासाठी ठेवायचे ठरले या कामाच्या बदल्यात दोघीना आपापले पुढील शिक्षण चालू ठेवता येईल अशी योजना होती ती व्यावहारिक होती—पण एमिलीचा जाण्याचा क्षण लांबणीवर पाडणारी होती! पहिल्या टर्मच्या अखेरीस मेरीटेलरची बहीण मार्था टेलर ही मृत्युमुखी पडली. उमलत्या वयातल्या मुलीचा मृत्यू सर्वांनाच चटका लावून गेला. या धक्क्यातून जेमतेम सावरतात तोच मावशी आजारी असल्याची तार आली. आता तावडतोब ब्रुसेल्स सोडून मायदेशी जायला हवे होते. शार्लट् व एमिली यानी सामानाची बांधाबांध केली. निघेपर्यंत मावशी गेल्याची तार आली. आता घरी जायला हवे होते. जाण्याचा उपयोग नव्हता हे माहीत असूनही जाणे प्राप्त होते. शार्लट्ला हा शिक्षणातला व्यत्यय आवडला नाही. तिचे मन ब्रुसेल्समध्ये, विशेषत श्री. हेगर याच्या व्यक्तिमत्त्वाभोवती घोटाळत राहिले. एमिलीला मात्र ब्रुसेल्सला परतण्याची मुळीच इच्छा नव्हती. बस झाले शिक्षण! मिळाले एवढे फ्रेंच भाषेचे शिक्षण शाळा काढण्यास अगदी पुरेसे आहे हीच तिची भावना. अशारीतीने जेमतेम ६ महिने ब्रुसेल्सला शिक्षण घेऊन १८४२ च्या अखेर एमिली घरी आली.

सर्व भावडात शार्लट् ही जास्त बहिर्मुख (Expovert) आणि महत्त्वाकांक्षी होती. परत शिक्षण चालू करायचे व घरी येऊन स्वत.ची शाळा काढायची हा तिचा निश्चय ढळला नव्हता. दोघी बहिणी घरी आल्या तेव्हा सकटाच्या अकल्पित आघातानी घर मोडून गेले होते. भावाची रेल्वेतली मामुली नोकरी सुटली होती. हाताखालच्या कर्मचाऱ्याच्या चुकीबद्दल त्याला जबाबदार धरून काढून टाकले होते. आधीच अपयशाने पिचलेला बार्नवेल् या नव्या अनपेक्षीत अपमानाने केवळ हताश झाला. अपयशाच्या कोशात तो दुबळा जीव बुडून गेला होता. अॅनीवरही दुर्दैव कोसळले होते. ज्या रेव्हरंड वेटमनवर तिचा जीव जडलेला होता, तो साथीला बळी पडला होता. तिच्या दुःखाचे कढ पहाणेसुद्धा यातनामय होते. नेहमी एमिलीच्या भोवती चिवचिवाट करून तिला बोलके करणारी अॅनी स्वत.च शोकावगुंठीत जिणे जगत होती—मुकी बनली होती. मावशीच्या मृत्यूमुळे सर्वांचा एक भक्कम आधार कोसळला होता. सगळी भावंडे जणू शोकावर्तात सापडली होती. एमिलीचा लाडका 'हिरो' (ससाणा) मरून गेला होता. तिने मायेने वाढविलेले प्राणी तिच्या मायेची ऊब ओसरताच दुर्लक्षित झालेले होते. एकटा कीपर (कुत्रा) अन् फ्लॉसी (मांजर) अद्याप हयात होती—पायात घोटाळत होती, कातळावर फिरताना तिची सोबत करीत होती. पेट्रीक ब्रॉण्टे अलिप्त जीवन जगत होते. सबंध कुटुंबावर, जरी निराशेची छाया दाटत असली तरी आशेची एक हलकीशी झुळूक आली. मावशीने काटकसर करून दीड हजार पौंड जमा करून ठेवले होते. तो वारसा तिघी बहिणीना सारखा वाटून दिलेला होता. बार्नवेलला काहीही पैसे दिले नव्हते. कारण लवकरच तो आपल्या पायावर उभा राहील असे तिने गृहीत धरले होते. मुलींची मात्र काळजी होती! त्याना काही चागले सुस्थिर भवितव्य नाही—कुठेतरी दाईकाम नाहीतर लहान मुलाची शिक्षिका एवढीच उडी जाणार! म्हणून मुलींना पैशाचा आधार दिला होता. एवढी मोठी रक्कम मुलीनी कधी पाहिलेली नव्हती. शाळा काढण्याचा बेत मूर्तस्वरुपात येणार याविषयी आता काही शकाच उरली नाही. तेव्हा आणखी शिक्षण घेऊन जबाबदारी घेण्याची क्षमता मिळविणे ओघाने आले. मग घरातल्या यातनामय वातावरणात अधिक काळ न रेंगाळता शार्लट एकटीच ब्रुसेल्सला निघून गेली. अॅनीने रॉबिन्सन् कुटुंबात शिक्षिकेचे काम पत्करलेलेच होते. त्या कुटुंबातील ११-१२ वर्षाच्या मुलाला ट्यूटर हवा होता. त्यासाठी बार्नवेलला पाठविण्यात आले. दोघेजण थ्रॉप ग्रीन येथील रॉबिन्सन् कुटुंबात शिक्षक म्हणून काम करू लागली.

आता एमिलीला सपूर्ण स्वातंत्र्य होते. स्वतःच्या भाववृत्तीशी सुसगती साधणे सोपे झाले. तिच्यावर घरची सर्व जबाबदारी होती. कारण पपा असले तरी ते अलिप्त रहात—जास्त करून अभ्यासिकेत असत—एमिलीच्या पाळीव पशुपक्षाचा ससार मात्र फळताफुलता होता. त्याच्याशी सूर जुळलेला होता. मदतीला आवडती 'टॅबी' होती. आता वाचनवेड्या एमिलीला कोणतेही बंधन उरले नाही. भरपूर वाचावे, लिहावे, काम करावे, भिरभिर फिरावे, मनातल्या

मुक्तच्छंदात्मक उर्मींना शब्दरूप द्यावे ! पराकाष्ठेच्या आत्मकेंद्री कलावंताला आणखी काय हवे असते ? याच अवधीत तिने फ्लॅसी, कीपर याची प्रत्ययकारी चित्रे काढलेली उपलब्ध आहेत. कित्येकदा ती पपांना पियानो वाजवून दाखवी. पियानोवरून तिची बोटे विलक्षण सहजतेने फिरत. सुराच्या लयीत भावनाचे आवेग, तणाव शात होत–माळरानावरील मुक्त भ्रमंतीत निसर्गाच्या अबोल रहस्याची उकल होत जाई. एकाकीपण ही तिची आपदा नसून वरदानच होते. निसर्गाशी झालेली तन्मयता कवितेतून मुखरित होई. एमिलीची सर्व काव्यरचना अशी अभावितपणे, अत्यत सहज अशा आविष्काराच्या स्वरुपात झालेली आहे. तिच्या मनातल्या भावनांच्या ऊर्मी अबोल स्वभावामुळे मनातल्या मनात उसळत रहात आणि कालांतराने शब्दांकित होत. तिची सर्व कविता शुद्ध–स्वच्छ व उत्कट अशी आहे, सच्ची आहे. एमिली कविता लिहित होती असे म्हणण्यापेक्षा कविता जगत होती असेच म्हणायला हवे. अर्थात तिच्या जीवनातले काव्य चर्मचक्षुना प्रतीत होणे शक्यच नव्हते. कुठल्याशा ओसाड गावातले वास्तव्य ! एकाडे घर ! प्रत्येक सुखसोयीचा संपूर्ण अभाव ! सारी कष्टाची कामे ! जगाशी सपर्क जवळजवळ तुटलेला ! वाचनालय दोन मैलावर... भोवती अमर्याद कातळ... आपल्या गद्यप्राय डोळ्याना सौंदर्यहीन व रुखेसुखे वाटणारे... चर्च आणि स्मशान !... पण अशा पार्थीव पार्श्वभूमीवरही तिच्या मनातली कविता उसळत राहिली. कवितेची सोबत हाच तिचा दिलासा ठरला. मनाला झपाटणारी सारी दु खे, वेदना कवितासखीने सुसह्य केल्या.

या कालावधीत एमिली व तिचे वडील यात एक प्रेमाचा चिवट धागा गुंतत गेला. एरवी रुक्ष, कडक-तिरसट वाटणाऱ्या पपांना आता एमिलीविषयी वत्सलता उत्पन्न झाली. ती त्याना वर्तमानपत्रे वाचून दाखवी. त्यांना बदुकीचा नाद होता. एमिली त्याच्याकडून बदूक चालवायला शिकली. तिचे ते कौशल्य पाहून पपा खूश होत असत. बघता बघता ती पपाचा उजवा हात बनून गेली. तिचे पियानोवादन हा त्याचा खास अभिमानाचा विषय होता. मात्र त्याच्या अपेक्षेनुसार ती रविवारच्या चर्चमध्ये शिकवायला मात्र गेली नाही. आपल्या व्यक्तिगत स्वातत्र्यावर कोणतेही बधन तिला नको होते. लेखन, वाचन, घरकाम आणि दिशाहीन भ्रमती यात तिचा सारा दिवस सपून जाई. स्वर्गाहूनही तिला ते उघडे-वाघडे विमुक्त कातळ जास्त प्रीय होते. पावसाच्या झिरमिरत्या पडद्यावर तिला आपली आतरिक स्पदने व्यक्त झाल्यासारखी भासत. तिच्या तरल भाववृत्तीनी कवितेचे माध्यम नेमके पेलले होते. निसर्गाच्या अकावर तिच्या दु:खाला सौदर्याची सोनसळ लाभली होती. यातना सुरूप बनली होती गेले सबध वर्ष ती पार्थीव बधनाच्या पलीकडे– विदेही मनस्थितीत होती काव्य जगत होती.

१८४४ साल उजाडले. शार्लटने आवश्यक ती क्षमता मिळवून परतीचा प्रवास सुरू केला. सुटीसाठी बार्नवेल व ॲनी हेही परतले. शाळेसाठी आवश्यक ते सर्व फेरफार घरात सुरू झाले. त्या बाबतीत शार्लट्चा उत्साह मोठा ! एमिलीचे सहकार्य तिने गृहीतच धरले होते. एमिली शार्लट्च्या बेताला मूकसमती देऊन टाकी. खरे तर छोटया पोरासोरानी येऊन घरात गडबड केलेली तिला आवडली नसती. तरीही शाळेचे पडेल ते काम कर्तव्यबुद्धीने पार पाडायचे ही तिची भूमिका !

शाळा सुरू केल्याच्या जाहिराती झळकल्या. आपापली मुले लोकानी शिकायला पाठवावी म्हणून प्रचार–तोडी प्रचार झाला. पण...एकही विद्यार्थी ब्रॉण्टे मडळीच्या शाळेत आला नाही ! विद्यार्थीच नाहीत तर शाळा कशी उभी रहाणार ? शार्लट्चे स्वप्न जमीनदोस्त झाले. एमिलीला या अपयशाचा स्पर्शही झाला नाही. कारण ती आता या बाह्यजगाची उरलेलीच नव्हती. अतरंगातल्या समृद्ध विश्वाच्या कथा आपोआप विस्तारत होत्या – त्या कल्पना-विश्वातच ती जगत होती. ‘Hopeless is the world without The world within I doubly prize !’ इतके समृद्ध विश्व जाणवल्यावर पार्थीव व्यथाची काय तमा ? तिची कल्पनाशक्ती म्हणजे ‘Sure solacer of human cares – and brighter hope when hopes dispair !’ गोण्डल् पोएट्रीची तिच्या सवेदना-शील मनावर पकड होती. विदेही काव्य जीवनास पार्थीव आशा-निराशाच्या लाटा स्पर्श करीत नव्हत्या. पार्थीवाच्या बेडया झिड-कारून फेकून देता येत नव्हत्या, हीच तिच्या दृष्टीने शोकातिका होती. अकाली मरण, किंवा जिवतपणी साहित्यक्षेत्रात न लाभलेले स्थान ही काही तिच्या दृष्टीने खरी शोकातिका नव्हती ! तर ज्या अमूर्त काव्यजीवनात ती गेले वर्षभर रमून गेली होती, ते सर्व विश्व पार्थीव ताण्याबाण्यांनी विस्कटून जावे, तिची कविता कुठेतरी मध्येच हरवून जावी या जाणीवेने तिच्या काळजाचा घड उलून जात होता.

शार्लटला आपल्या अबोल बहिणीच्या आर्तविश्वाची पुरेशी जाणीव नव्हती. शाळेच्या उभारणीस न लाभलेला प्रतिसाद तिला खुपत होता. एवढया मोठ्या वेळाचा आपण काही विधायक सदु-पयोग करीत नाही हा सल तिला खुपत होता. इथे सारे जीवन साचलेल्या डबक्यासारखे घटनाहीन-बेचव वाटत होते. तीही कविता करीत असे. पण त्यात एमिलीची तीव्रता नव्हती. आविष्कार किंचित सपक होता ॲनीलाही काव्यरचनेचे वरदान मिळालेले होते एवढेच काय पण बार्नवेलही रचना करीत असे १८४५ च्या जूनमध्ये ॲनीने रॉबिन्सन् कुटुबातली नोकरी सोडली. ॲनी घरी आल्याबरोबर एमिली खूश झाली. ॲनी, कीपर, अन् आपण स्वतः भन्नाट वाऱ्यावर फिरत रहाणे यात एमिलीचा असीम आनद साठविलेला होता. एमिलीला खऱ्या अर्थाने बाह्य जगाचा वारा लाभला नव्हता. तो लाभणे अशक्य होते. पराकाष्ठेची कुचबणा होती. अतरगांतच रगलेल्या एमिलीने फक्त इमानी निसर्गाशी एकतानता साधली. १६ व्या वर्षापासून काव्य रचणारी – नव्हे जगणारी एमिली उत्तरोत्तर अधिक उत्कट, प्रगल्भ, आशयघन अशी रचना करू लागली.

१८४५ साल. एमिली २७ वर्षांची झाली. कौटुबिक विश्वात सकटाचे वादळवारे रोरावत राहिले. उगवणारा प्रत्येक दिवस नवे सकट घेऊन येऊ लागला. ॲनीने नोकरी सोडली अन् लगेच महिना-भरात बार्नवेलला रॉबिन्सन् कुटुबातून काढून टाकण्यात आले. कारणही तसेच गहन होते. हा नवथर वयाचा भाववेडा तरुण गृह-स्वामिनीवर जीव जडवून बसला होता त्या अपराधाला क्षमा नव्हती. बार्नवेलचे वेड ‘प्रेम आणि मरण’ या जातीचे होते. बार्न-वेल नाइलाजाने घरी आला. पार मोडून गेलेला. हताश तरुण. तीन

बहिणीचा एकुलता एक भाऊ. कुटुंबाचे आशास्थान. प्रेमभगामुळे उरी फुटून गेलेला! त्याच्या औदासीन्याला अपेशाची काळी पार्श्वभूमी होती. आता तो सिनीक् बनला. त्याची झोप उडाली. रात्र रात्र जागल्याने डोळे तळावले. प्रकृती ढासळली. मद्याच्या प्याल्यात आपली प्रेमभगाची व्यथा बुडविण्यास त्याने सुरुवात केली. क्षणोक्षणी तो कोसळत होता. उच आशाच्या कड्यावरून खोल खोल कोसळत होता. त्याला थोपवणे शक्य नव्हते. त्याचा विनाश स्पष्ट दिसत होता. शार्लट्ला त्याच्याविषयी फारशी सहानुभूती वाटली नाही. पण एमिलीला मात्र तो सावरेल असे वाटत असे त्याला साभाळून घेण्याची तिची धडपड सुरू असे. लाडक्या भावाचा अधःपात सरळ पहात असता तिच्या जिवाची घालमेल सुरू होती...

शार्लट्चाही मनोभग झाला होता. ब्रुसेल्समधील श्री हेगर यानी तिच्या मैत्रीस प्रतिसाद दिलेला नव्हता. ती व्यथा मनाची उभारी करपून टाकणारी होती अॅनीनेही प्रेमभगाचे दु.ख साहिले होते. या साऱ्याच्या जोडीला वडिलाची दिवसेदिवस अधिकाधिक अधू होणारी दृष्टी! अॅनीने याच सुमारास 'अॅग्निस् ग्रे' ही कादबरी लिहायला घेतली. त्यात तिच्या दु खाचे अभावितपणे उदात्तीकरण होत होते. ब्रॉण्टे कुटुबाचे घराचे वासे फिरले होते. नियतीने सुखाच्या सर्व झडपा बद केल्या होत्या. यातनाघरात सर्वजण घुसमटत होती. सर्वांच्या तरल, तीव्र भाववृत्ती अभिव्यक्तीसाठी उसळत होत्या प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या ललितस्वरुपातून अभिव्यक्ती करीत होता. अभावितपणे वेदना शब्दरूप धारण करीत होती.

एमिलीचा स्वभाव कमालीचा मुग्ध–अबोल! सारा विचार-विनिमय चालायचा तो स्वत शी–स्वत च्या कवितेमधून! तिची कविता ही तिची निश्वसिते होती. दुसऱ्या कोणी आपली काव्यरचना वाचावी असे तिला कधीही वाटले नाही. एकदा सहज योगायोगाने तिची कविताची वही शार्लट्च्या नजरेस आली. तिने अगदी असोशीने ते हस्तलिखित वाचून काढले. एमिलीच्या कविताचा सच्चेपणा, उत्कटता, दिव्यत्वाचा स्पर्श, अत्यत वेधक अशी शब्दकळा शार्लट्ला केवळ अप्रतीम वाटली–अस्सल वाटली. शुद्ध कवितेचा तो अप्रतीम आविष्कार असा मिटून अधारात रहावा हे तिला बरे वाटेना. आपली बहीण ही श्रेष्ठ प्रतिभावत आहे हे तिने ओळखले. मग अॅनीने आपल्या कविता शार्लट्ला दाखविल्या. तिच्या कविताही लक्षणीय होत्या. स्वत शार्लट् काव्यरचना करीत होतीच. मग तिने तिघीच्या कविता घेऊन एक सयुक्त काव्यसग्रह प्रकाशित करण्याचे ठरविले. लेखक होण्याचे स्वप्न ब्रॉण्टे कुटुबातील प्रत्येक व्यक्ती जपतच होती. एमिलीची चैतन्यमय कविता वाचून हे स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचे शार्लट्ने ठरविले–अगदी निर्धारच केला!

आडनिड्या गावी रहाणाऱ्या अन् सर्वस्वी अप्रसिद्ध अशा कवयित्रीची कविता प्रसिद्ध करणार कोण? खेरीज तिघी बहिणीना खरी नावे प्रसिद्ध करण्याचा सकोच वाटत होता. मग टोपण नावामागे दडण्याचे ठरले. 'प्रत्येकीने स्वत च्या आद्याक्षरावरून सुरू होणारे नाव स्वीकारले. शार्लट्ने क्यूरर बेल, एमिलीने एलिस् बेल व अॅनीने अॅक्शन् बेल अशी नावे स्वीकारली. एमिलीच्या २१कविता व इतर दोघीच्या २०, २० कविता निवडून ६१ कविताचा सुदर सग्रह करण्यात आला. प्रकाशक मिळविण्यासाठी भलताच पत्रव्यवहार करावा लागला. अखेर १८४६ च्या मेमध्ये Aylott & Jones या प्रकाशन सस्थेने हे काम पत्करले. अटी घातल्या त्या अशा– (१) पुस्तकाच्या कागदाची व छपाईची सर्व किंमत ब्रॉण्टे मडळीनी द्यायची. (२) जाहिरात, विक्री इ. कारभार प्रकाशकांनी करायचा! छपाईचा खर्च त्या काळी अवघा ३१ पौंड १० शिलिंग इतकाच आला. तिघीना मावशीकडून ५–५ शे पौड मिळाले असल्याने प्रकाशकाची पहिली अट त्याना डोईजड वाटली नाही. त्यानी पैसे दिले आणि १८४६ च्या मेअखेर पुस्तक प्रसिद्ध झाले! या सयुक्त काव्यसग्रहाचे नाव होते, Poems by Currer Ellis & Action Bell. या प्रकाशनाने तिमिरावगुठित ब्रॉण्टे कुटुबात प्रसन्नतेची सोनसळ लहरत गेली. आनदाची ती हलकीशी झुळूक सर्वांना सुखवून गेली.

पण...

हा आनद घड दिवसभरही टिकायचा नव्हता! ब्रॉण्टे कुटुंब शापित होते की काय नकळे! आनदाचे आणि ब्रॉण्टे मंडळीचे कुठेतरी कायमचे बिनसले होते. २६ मे १८४६ रोजी बार्नवेलच्या जीवनाचे भीषण पर्व सुरू झाले. ज्या मिसेस् रॉबिन्सन्साठी तो खुळावला होता, तिचा जीवनसाथी निवर्तल्याची वार्ता आली. बार्नवेलच्या दृष्टीने ही सुवार्ता! तो अक्षरश नाचत सुटला घरामागच्या स्मशानभूमीवर त्याने नाचून आपला आनद व्यक्त केला. आता तिला भेटायला निघायचेच काय ते उरले...तेवढ्यात प्रेयसीकडून निरोप आला की, काय वाटेल ते झाले तरी बार्नवेलने इकडे येता कामा नये! तो आल्यास मृत्युपत्रानुसार इस्टेटीवरचा तिचा हक्क नष्ट होईल. (वस्तुतः अशी अट नव्हती. पण नातेवाईकानी ती invent केली होती!) बार्नवेलच्या उत्साहाचा फुलोरा जळून खाक झाला. साऱ्या उमेदीची राखरागोळी झाली मग सतत पिणे, बेहोशीत बुडून जाणे अन् अगतिकपणे मरणाची वाट पहात रहाणे या व्यतिरिक्त त्याच्या आयुष्यात दुसरे काहीही उरलेच नाही! स्वतःची सवेदना त्याने मद्यात बुडवून ठेवली! अगदी कायमची! बार्नवेल माणसात येईल ही आशा सपली. त्याच्या निराशेची स्पदने एमिलीला जाणवत होती. त्याच्या जीवनाची ती कोसळती कहाणी नुसती साक्षित्वाने पहाणे हाही एक विलक्षण यातनामय अनुभव होता. इतके दिवस एमिलीचा आत्म्यात बुडालेला स्वर काव्यरूपाने व्यक्त होत असे. बार्नवेलची दग्ध मनस्थिती पहाताना मात्र तिची दृष्टी परखड वास्तवावरच खिळून राहिली. तिच्या अस्तित्वाचा एक भाग असणारी कविता मुकी झाली. त्याऐवजी गद्य लिहिणे तिला श्रेयस्कर वाटले. 'वुदरिंग हाइटस्' लिहिण्यास सुरुवात झाली. दुर्दैवी बार्नवेलविषयी वाटणाऱ्या सहानुभूतीतून हॅथ्क्लिफ् निर्माण झाला. हॅथ्क्लिफ्ची व्यक्तिरेखा हा वुदरिंग हाइटस्चा मर्मबिंदू आहे. तो कमालीचा हिंस्र, स्वार्थी, सूडबुद्धीने पेटलेला, मत्सरी, निर्दय, रोमरोमात जिवत असा भयकर क्रूरकर्मा आहे. तथापी तो तसा आहे याविषयी तक्रार करणे किंवा नाराज होणे म्हणजे वाघ हा माजरीसारखा घरेलू का नाही असे म्हणण्यासारखे अर्थहीन आहे. मानवी जीविताचे जे पाशवी अतस्रोत आहेत त्याचा अत्यत बेदरकार असा आविष्कार हॅथ्क्लिफ्मध्ये आहे. त्याच्याइतकी जिवत आणि प्रत्ययकारी व्यक्तिरेखा शोधायचीच म्हटले तर जुनी महाकाव्ये (epics) किंवा शेक्सपिअरच्या शोकातिकाच पहायला हव्यात!

१८४६ च्या जुलैमध्ये कादबरी पूर्ण झाली. पण छापणार कोण हा प्रश्न होताच. इतक्या सुदर कविताचे पुस्तक काही खपले नव्हते. वर्षभरात फक्त २ प्रती खपल्या होत्या! तरीही त्या तिघी बहिणी नाराज न होता लिहित राहिल्या. तिघीनी एकेक कादबरी पुरी केली. प्रकाशक शोधायची कामगिरी शार्लट्ची! आपली कविता तरी निदान प्रसिद्ध साहित्यिकांनी नजरेखालून घालावी म्हणून तिने एकेक प्रत साहित्यिकाना भेट म्हणून धाडली होती. त्याचाही काही म्हणण्यासारखा प्रतिसाद आला नाही. कादबऱ्याची हस्तलिखिते

बऱ्याच प्रकाशकांकडून परत आली. उमेद संपुष्टात आली. अखेर Thomas Cautey Newby या फर्मकडून वुदरिंग हाइटस्चे हस्तलिखित पसत झाले. बरोबर शार्लट व ॲनीची एकेक कादबरी होती. त्यातली ॲनीची कादबरीही स्वीकारण्यात आली. लेखक सर्वस्वी नवखा असल्याने प्रकाशकांनी अटी घातल्या. १) ३०० प्रती काढणार २) छपाई खर्च म्हणून ५० पौंड लेखकांनी द्यावेत. ३) २५० प्रती खपल्यावर ते ५० पौड परत करू. आज १२५ वर्षानंतरही हजारो प्रती खपत असलेल्या वुदरिंग हाइटस्च्या या अटी आहेत ! प्रकाशकानी पहिल्या २ अटी काटेकोरपणे पाळल्या, पण ५० पौड परत करण्याचे मात्र टाळले ! प्रूफे नीट तपासली नाहीत. अत्यत कुरूप, व ईट अशा स्वरुपात १८४७ च्या ऑक्टोबरमध्ये एमिलीचे वुदरिंग हाइटस् व ॲनीचे ॲग्निस् ग्रे प्रसिद्ध झाले. लेखिकानी टोपण नावाचा आसरा घेतलेला होता.

या कादबरीवरील सुरवातीच्या प्रतिक्रिया प्रतिकूल होत्या. (त्या प्रतिक्रियाचे आता एक चक्क पुस्तकच काढले आहे. १००–१२५ वर्षात आस्वादकांचा सूर कसा कसा बदलत गेला त्याचा तो अप्रतीम आलेख आहे !) लेखकाने अत्यत खालच्या दर्जाच्या व्यक्तिरेखा रगविल्या आहेत, त्याबद्दल नाराजी ! सुसस्कृत माणसाला आवडावे असे यात काहीही नाही ! हा दुसरा वार ! यात फक्त अमानुष क्रौर्य, सूड आणि दुष्टपणा यांचा भडक आविष्कार आहे ! इ. इ. पडसाद उमटत राहिले. एमिलीला फार दिवस टोपण नावामागे दडून रहाता आले नाही. कारण 'आम्ही तिघी बहिणी आहोत' हे वाक्य अगदी नकळत शार्लट्च्या तोडून निसटले. तरीही लेखिका म्हणून एमिली कोठेही घराबाहेर गेली नाही. तिची प्रकृती उतरणीस लागली होती. तारुण्यातल्या आशा उमलण्यापूर्वीच कोळपल्या होत्या. निसर्गाचे पिसे लागले होते खरे, पण त्याच्या विशाल मिठीत हळुवारपणे सामावून जाणे आता अवघड झाले होते. घरातल्या अडचणीची गुतागूत वाढत होती. वडिलांची दृष्टी अगदीच अंधुक उरली होती. बार्नवेल आला दिवस मद्यपान करीत होता. तो आत्महत्येच्या मोहास बळी पडण्याची चिन्हे होती, म्हणून त्याला फार जपावे लागे. मद्यापायी त्याच्या मज्जाततूची दोरी पिंजून गेली. विकल शरिराचा नुसता सापळा उरला. सारे कपडे ढगाळे होत. बुजगावण्यासारखा दिसायचा तो ! अखेर दोन दिवसाच्या किरकोळ आजाराचे निमित्त होऊन २४ सप्टेंबर १८४८ रोजी बार्नवेलची जीवनज्योत विझून गेली.

बार्नवेल्ची ही अखेर कोणालाही अनपेक्षित नव्हती. तरीसुद्धा घरादाराला चैतन्यहीन अवकळा आली. एमिली विलक्षण अस्वस्थ झाली. तिची जीवनेच्छाच दुबळी झाली. बार्नवेलचे वागणे जरी धड नव्हते, तरी तिने त्याचा कधी तिरस्कार केला नव्हता. त्याच्या प्रेमभगाची व्यथा सहानुभूतीने समजावून घेतली होती. आज ना उद्या हा मार्गाला लागेल या आशेचा नदादीप तिने जपला होता. पण नियतीला ही साधी अपेक्षा मान्य नव्हती. ब्रॉन्टे कुटुबाच्या प्राक्तनात फक्त दु खाचीच आवर्तने होती. रविवारी बार्नवेल गेला, अन् गुरूवारी त्याच्या देहावर अत्यसस्कार करण्यात आले. दफनविधिच्या वेळी एमिली स्मशानात आली होती. वशाचा जळालेला अकूर पहात होती. प्रार्थना वगैरे उरकण्यास वेळ लागला असावा. निमित्ताला टेकलेल्या तिच्या पाकोळीसारख्या देहाला तो वारा, थडी, काही सहन झाले नाही. घरी आली तीच सर्दीखोकल्याने बेजार झालेली ! एक ऑक्टोबरला मृतासाठी प्रार्थना करायची होती. एमिलीला काही पाऊल उचलत नव्हते. तरीही ती भावाच्या फ्यनरल प्रेअरसाठी लगतच्या चर्चमध्ये गेली. तेच तिचे अखेरचे घराबाहेर जाणे ! अत.पर बाहेर निघायचा होता तो तिचा निष्प्राण देह !

भावाच्या मृत्यूच्या धक्क्यातून एमिली कधीच सावरली नाही. तिचे ते चिमणीसारखे जेवण दिवसेंदिवस तुटत गेले. एरवी देखील अबोल रहाणारी एमिली आता जवळ जवळ मुकी बनली. कोणत्याही प्रश्नाचे ती उत्तर देत नसे. म्हणजे उत्तर देण्याची इच्छाच मालवून गेली होती ! औषध तर तिने कधी घेतलेच नाही. त्यासाठी शार्लट्ने परोपरीने प्रयत्न केला. पण यश आले नाही. एकेक पाश तोडीत तोडीत आता सर्व जगाचाच कायमचाच निरोप घेण्याची वेळ आली होती. कीपर, मूरलॅण्ड तो भन्नाट वारा, घर, आगण, झाडे, पाऊस, सारे काही सोडून जायचे होते. नित्यनवे गूज सांगणाऱ्या भूमातेच्या कुशीत विसावा घ्यायचा होता.

शार्लट्ला एमिलीचा हा हठयोग बघवत नव्हता. साऱ्या दिशा अंधारून आल्यासारखे वाटत होते. ॲनीही क्षयाने आजारी होती. दोन्ही बहिणीच्या पलगाच्या मध्ये शार्लट् बसत असे. पण एमिलीने काडिमात्र सेवा घेतली नाही. स्वतःचे सर्व काम स्वतः करायचे हा तिचा अट्टहास अगदी अखेरच्या दिवशीही कायम होता.

१९ डिसेंबर १८४८ रोजी वयाच्या अवघ्या तिसाव्या वर्षी या प्रतिभासपन्न मुग्धेचा देहान्त झाला. त्या दिवशी ती नेहमीप्रमाणे उठली. आपल्या लाडक्या कीपरला स्वतः खाऊ पीऊ घातले. स्वत ची वेणीफणी केली. नित्याप्रमाणे थोडेफार शिवणही केले. अखेर हात थकला. बसवेना. श्वास लागला... मृत्यू अवघ्या दोन तासावर येऊन ठेपला. मग मात्र आपण होऊनच तिने डॉक्टरांना बोलाविण्यास सागितले. खिडकीपाशी कातळाकडे टक लावून एमिली पडलेली होती. इतक्या उशीरा उपाय करण्यात काहीच अर्थ नव्हता. तिचा देह म्हणजे नुसता हाडाचा सापळा उरला होता. साऱ्या मासपेशी क्षयाच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या होत्या. शव पेटिका बनविणारा सुतार जेव्हा मापे घेण्यास आला तेव्हा तो सुद्धा आश्चर्यचकित झाला. कारण शवपेटिकेची रुदी फक्त १६ इच ठेवायची होती, मोठ्या माणसाची इतकी चिंचोळी, निरुद पेटी त्याने अद्याप कधीही बनविलेली नव्हती !

एमिलीच्या मागे दोन महिन्यानी ॲनीही मरण पावली. शार्लट्ला तरी कुठे पुरेसे आयुष्य मिळाले ? अवघ्या ३८ व्या वर्षी तीही गेली. पपा ब्रॉन्टेमात्र एकटे उरले. ६ मुले, बायको, मेहुणी या सर्वांच्या चिरवियोगाचे दु.ख भोगायलाच जणू परमेश्वराने त्यांना एवढ्या प्रदीर्घ आयुष्याचा शाप दिलेला होता ! दृष्टीही गेलेली होती. पपा ब्रॉन्टे ८४ वर्षे जगून १८६१ मध्ये गेले.

आपले साहित्य पुढील पिढ्याना श्रेष्ठ दर्जाचे वाटेल अशी निसटती शकासुद्धा एमिलीला कधी आली नाही. आत्म्यात बुडालेला तिच्या प्रतिभेचा शुद्ध स्वर केवळ अविस्मरणीय आहे. वुदरिंग हाइट्स्मधील साऱ्या विकट भीषण छटाचा अस्सल आविष्कार वाचकाला आजही मत्रमुग्ध करू शकतो तिचे साहित्य स्थलकालातीत आहे, चिरजीव आहे. जगातल्या सर्वश्रेष्ठ दहा कादबऱ्यात सॉमरसेट मॉमसारख्या रसिकलेखकाने वुदरिंग हाइटस्चा अतर्भाव केलेला आहे. एमिली ब्रॉन्टेवर आजवर शेकड्यानी ग्रथरचना झालेली आहे. अशा त्या काव्यात्म विरागिनीस कोणताही निर्मळ मनाचा रसिक विसरणे शक्य नाही. □ □

**विवेकभ्रष्ट** पृष्ठ १२ वरून

निक्सन याचे सल्लागार आपल्याला केव्हाही दगा देतील हे हंट ओळखून होता. त्यामुळे पैशाच्या मागणीसोबत त्याने डीनला पुन्हा निरोप धाडला होता, 'ही रक्कम मला एका आठवड्याच्या आत मिळाली पाहिजे. आणि तशी ती मिळाली नाही तर एर्लिचमानच्या सांगण्यावरून मी श्वेतभवनामध्ये कोणकोणते प्रकार केले याची जाहीर वाच्यता करीन.'

हंटची धमकी डीनने निक्सन याच्या कानावर घातली. निक्सन यांनी त्रासिक चेहरा करून एवढेच म्हटले, 'ठीक आहे. मी पहातो.'

### जॉन सिरिका म्हणाले

तेवीस मार्चचा दिवस उजाडला तेव्हा सगळ्याचे लक्ष न्यायाधीश जॉन सिरिका वॉटरगेट–प्रकरणामध्ये गुतलेल्या सात आरोपींना कोणती सजा फर्मावितात इकडे लागलेले होते. सिरिका यांनी सहा आरोपीच्या शिक्षा वाचून दाखविल्या. फक्त मॅककॉर्डची शिक्षा जाहीर करण्यात आली नाही. उलट त्याला एक लाख डॉलर्सच्या जामिनावर तात्पुरते सोडून देण्यात आले कारण मॅककॉर्डने पत्र लिहून एक मोठीच कामगिरी बजावली होती. वॉटरगेट प्रकरण ही साधी घरफोडी नसून राजकीय हेरगिरीच्या प्रचड कटातील तो एक भाग आहे हे या पत्रामुळे स्पष्ट झाले होते. मॅककॉर्डला जामिनावर सोडताना सिरिका त्याला म्हणाले, 'मी तुला आता कोणतेही आश्वासन देत नाही. पण इतके सागतो की, तुझ्याकडून जर या बाबतीत आम्हाला आणखी तपशील कळला तर तुला शिक्षा देताना ती गोष्ट मी विचारात घेईन.'

वॉटरगेट प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सेनेटने नेमलेल्या समितीचा मुख्य वकील सॅम डॅश यानेही मॅककॉर्डचा जबाब नोदवून घेतला. त्यावेळीही मॅककॉर्डने डीन आणि मॅग्रुडर याची नावे सांगितली.

मॅककॉर्डच्या निवेदनाने श्वेतभवनामध्ये एक विलक्षण परिणाम घडवून आणला. आतापर्यंत वॉटरगेट प्रकरण दडपून टाकण्यासाठी परस्पर-विचाराने काम करणारी माणसे आता आपापल्या बचावाचा विचार करू लागली. प्रत्येकजण आपण तेवढे निर्दोषी आहोत हे दाखवून देण्यासाठी धडपड करू लागला. या धडपडीमध्ये इतरावर दोषारोप करणे आवश्यकच होते. आतापर्यंत वृत्तपत्राना वॉटरगेट–प्रकरणाच्या रहस्यमय घडामोडीचा मागोवा घेण्यासाठी धावपळ करावी लागत होती. आता एकेक जण आपण होऊन वृत्तपत्रांना निवेदने देऊ लागला. 'वॉशिंग्टन पोस्ट' आणि 'न्यूयॉर्क टाईम्स' या वृत्तपत्रातून दररोज खुलासे प्रसिद्ध होऊ लागले. या खुलाशामध्ये परस्परविरोधी विधानांचा गुता असल्यामुळे कोणाचे म्हणणे कितपत खरे मानावे असा सशय निर्माण होत होता हे खरे असले तरी त्यामुळे काही गोष्टी आपोआप स्पष्ट होत होत्या.

मॅककॉर्डच्या पत्राचे वाचन ज्या दिवशी सिरिका यानी न्याया-लयात केले त्यादिवशी सहाजिकच डीनच्या निवासस्थानी वार्ताहर जमणार हे निक्सननी ओळखले आणि म्हणून काही दिवसासाठी त्याची कॅंप डेव्हिड येथे रवानगी केली.

मॅककॉर्डच्या जबाबात मॅग्रुडरचे नाव आलेले असल्यामुळे सॅम डॅश याने त्याला साक्षीसाठी बोलावून घेतले. आपण या प्रकरणातून सुटणे शक्य नाही याची खात्री पटल्यामुळे मॅग्रुडरने स्वत बरोबर एर्लिचमान, हाल्डेमान, मार्डिसन आणि डीन यानी वॉटरगेट प्रकरण दडपून टाकण्यासाठी कोणकोणत्या कारवाया केल्या हे सागून टाकले. त्यामुळे या सर्वांवर फौजदारी खटला भरणे सहज शक्य आहे हे स्पष्ट झाले. मॅग्रुडरचा जबाब हाती पडताच ॲसिस्टट ॲटर्नी जनरल हेन्री पीटरसन, हॅरॉल्ड टिटस आणि अर्ल सिल्बर्ट यांच्यासमवेत ॲटर्नी जनरल रिचर्ड क्लेण्डिन्स्टला भेटला. मॅग्रुडरने सांगितलेल्या हकिकतीचा समग्र वृत्तान्त ऐकल्यानतर क्लेण्डिन्स्ट एवढा हादरून गेला की त्याला रडें आवरेना. आपली कारकीर्द आता संपुष्टात आली असे त्याच्या मनाने घेतले. ती सारी रात्र त्याने जागून काढली. आपल्या भावी जीवनाच्या भेसूर दर्शनाने त्याच्या मनाची शांतता पार विसकटून गेली होती.

दुसऱ्या दिवशी क्लेण्डिन्स्ट निक्सनना भेटण्यासाठी श्वेतभवना-मध्ये नेला. क्लेण्डिन्स्टच्या भेदरलेल्या चेहेऱ्यावरून तो काय सांग-णार आहे हे निक्सननी आधीच ताडले. क्लेण्डिन्स्ट सागू लागला, 'हाल्डेमान आणि एर्लिचमान या दोघांना श्वेतभवनामध्ये यापुढे ठेवणे म्हणजे आपण होऊन सकटाला निमत्रण देण्यासारखे ठरणार आहे. म्हणून तुम्ही त्याना तावडतोब बडतर्फ करा.'

क्लेण्डिन्स्टच्या सूचनेमागील गांभीर्य निक्सनना जाणवले. त्यांनी दुसऱ्या दिवशी प्रथम जॉन डीनला बोलावून घेऊन त्याला 'तू राजीनामा दे' किंवा बेमुदत रजेवर जा असे सांगितले. राजीनामा द्यायला डीन खळखळ करू लागला. तो म्हणाला, 'त्याऐवजी मी रजेवर जातो.'

'नतर कळवितो,' असे सागून निक्सननी डीनची बोळवण केली.

तीस एप्रिलचा दिवस. रात्री नऊची वेळ. श्वेत भवनातील मुख्य सभागृहात निक्सन बसले होते. निक्सननी आपल्याला यावेळी का बोलाविले आहे याचा वृत्तपत्र–प्रतिनिधीना उलगडा झाला नाही. परतु त्याच्या त्रासिक चेहऱ्यावरून ते बरेच वैतागलेले असले पाहिजेत हे जाणवले. निक्सन बोलू लागले. नेहमीचा त्याचा आवेश कोठल्या कोठे नाहीसा झाला होता. निक्सन अडखळत बोलत होते. बोलावे की बोलू नये अशा पेचात सापडलेला मनुष्य जसा बोलतो तसे ते बोलत होते. ते म्हणाले, 'हाल्डेमान आणि एर्लिचमान या माझ्या सहकाऱ्यानी राजीनामे सादर केले आहेत. त्याचप्रमाणे जॉन डीनलाही मी श्वेतभवनातील नोकरीतून मुक्त केले आहे. ॲटर्नी जनरल रिचर्ड क्लेण्डिन्स्ट याचाही राजीनामा माझ्याकडे आलेला आहे. तो स्वीकारण्याचे मी ठरविले आहे. यामागची माझी भूमिका स्पष्ट करतो. लोकांचा लोकशाही यत्रणेवरचा विश्वास कायम राहिला पाहिजे असे मी मानतो. त्याच भावनेने माझ्या सहकाऱ्यांनी राजी-नामे दिले आणि मी ते स्वीकारले.'

निक्सन थोडा वेळ थावले आणि सागू लागले. 'माझ्या निवड-णुकीच्या वेळी माझ्या काही सहकाऱ्याकडून थोडेसे जादा प्रकार

घडले हे खरे आहे. राष्ट्राध्यक्ष म्हणून त्याची जबाबदारी मी घेतो. परंतु हे प्रकार माझ्या संमतीने घडले वा त्यात माझा हात आहे हे मात्र खरे नाही. चीन आणि रशिया यांच्या बरोबरचे संबंध सुधारून जागतिक शांतता चिरस्थायी करण्यासाठी मी सतत धडपडत आहे. त्यामुळे निवडणूक–मोहिमेतील प्रचारकार्य मी आपल्या सहकाऱ्यांकडे सोपविले. त्यांच्यापैकी ज्यांच्या हातून अनुचित प्रकार घडल्याचे सिद्ध होईल त्यांना शिक्षा करण्यात मी कसूर करणार नाही. त्याच प्रमाणे हे प्रकरण दडपून ठेवण्याचा प्रयत्न कोणी केला तर तोही मी खपवून घेणार नाही. '

निवेदन संपले तेव्हा निक्सन यांच्या डोळ्यांत आसवे तरारून आली होती. स्वतःशी ते पुटपुटले, ' हे सारे कर्म महाकठीण आहे. '

तो सारा देखावा पाहून एखाद्याची अशी कल्पना झाली असती की निक्सन यांना खरोखरच पश्चात्ताप झालेला आहे. पण लोकांच्या आपल्यावरील विश्वासाला तडा जाऊ नये यासाठीच त्यांनी आपल्या काही बदनाम सहकाऱ्यांना बडतर्फ केले आहे ही गोष्ट काही लपून राहिली नाही. जर हाल्डेमान आणि एर्लिचमान यांनी निवडणूक कार्यात चांगली कामगिरी पार पाडली होती तर त्यांचे राजीनामे निक्सननी का स्वीकारले ? जॉन डीनला बडतर्फ का केले ? हे आणि असे अनेक प्रश्न वृत्तपत्रांतून विचारण्यात येऊ लागले.

' पेण्टॅगॉन पेपर्स ' प्रसिद्ध करणाऱ्या एल्सबर्गच्या घरात चोरटा प्रवेश केल्याबद्दलचा खटलाही यावेळी सुरू होता. हा खटला ज्यांच्यापुढे चालला होता त्या न्यायाधीश मॅट बायर्न याने याच सुमारास जाहीर केले– ' पॅट्रिक ग्रे याच्या राजीनाम्यामुळे रिकामे झालेले एफ. बी. आय. चे संचालकपद मला देऊ करण्यात आलेले आहे. '

वॉटरगेट प्रकरणाप्रमाणे एल्सबर्ग प्रकरणही दडपले जावे यासाठीच बायर्नला ही बढती देण्यात येत आहे हे स्पष्ट झाल्यामुळे निक्सन यांच्यावरचा अविश्वास अधिकच वाढला.

एकीकडे निक्सन आपल्या अपराधांचा पुरावा आणि या पुराव्याचे पत्ते आपला खास अधिकार वापरून अंधारात ठेवू पहात होते तर सॅम एर्विन याच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली सेनेट वॉटरगेट समिती आणि जॉन सिरिका यांच्या आदेशानुसार नेमण्यात आलेले ग्रॅण्डज्यूरी चौकशीचा एकेक धागा जोडीत होते.

त्या आधारे दोन मे रोजी ' न्यूयॉर्क टाईम्स 'ने लिहिले, ' वॉटरगेट प्रकरणामध्ये हाल्डेमान, एर्लिचमान, मॅग्रुडर, मिचेल, डीन आणि लारुए यांचे हात गुंतले असल्याचा सबळ पुरावा ग्रॅण्डज्यूरीला मिळाला आहे. '

क्लेण्डिन्स्ट यांच्या राजीनाम्यामुळे अॅटर्नी जनरल म्हणून एलिएट रिचर्डसन यांची नेमणूक करावी असा प्रस्ताव निक्सन यांच्यामार्फत सेनेटकडे आला. वॉटरगेट प्रकरणाचे शोधकार्य पुढे चालू ठेवायला ही चांगली संधी आहे हे ओळखून सेनेटने ठरविले की जर रिचर्डसन स्पेशल वॉटरगेट प्रॉसिक्यूटर म्हणून कोणाची नेमणूक करीत असतील तर त्यांना अॅटर्नी जनरल नेमायला आपण विरोध करायचा नाही.

सेनेटने आपल्याला ही अट घालावी ही गोष्ट निक्सन यांना रुचली नाही. पण ही अट नामंजूर करण्याने त्यांचीच पंचाईत होणार होती. म्हणून त्यांनी आर्चिबाल्ड कॉक्सची ' स्पेशल वॉटरगेट प्रॉसिक्यूटर ' म्हणून नेमणूक केली.

सेनेटच्या जाळ्यातून निसटण्याचा निक्सन यांचा प्रयत्न चालू असला तरी हळूहळू त्यांचा एकेक मार्ग बंद होत होता.

विशेषतः आर्चिबाल्ड कॉक्सची नेमणूक त्यांना बरीच त्रासदायक ठरणार होती. कारण कॉक्स निक्सन यांच्या दडपणाला बळी पडणारा नव्हता. हाती आलेल्या साक्षीपुराव्यांच्या बळावर त्यांचे निर्णय अवलंबून राहाणार होते. म्हणून निक्सन यांनी बावीस मे रोजी आणखी एक निवेदन प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी म्हटले होते– ' निवडणुकीच्या वेळी प्रतिपक्षाच्या हालचालींवर आणि प्रचारावर पाळत ठेवण्यासाठी श्वेतभवनामध्ये जी यंत्रणा उभी करण्यात आली तिला माझी संमती होती हे मी नाकारू इच्छित नाही. मात्र ' वॉटरगेट प्रकरण ' घडल्यानंतर ' क्रीप 'च्या कार्याबाबत सखोल चौकशी करण्याचा आदेशही मी दिला होता. '

हे निवेदन करताना, लेन गार्मेण्ट आणि फ्रेड बुझार्ट या दोन नामांकित वकिलांची निक्सननी मदत घेतली होती. हे वकील आपल्या अशिलाला वाचविण्यासाठी वृत्तपत्रप्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांना संदिग्ध आणि उडवाउडवीची उत्तरे देत होते. त्यामुळे ती वेळ निभावून नेणे निक्सनना शक्य झाले.

तरीही एक प्रश्न निक्सनना जाहीर रीतीने विचारण्यात आला, ' आपले तीस एप्रिलचे निवेदन आणि हे बावीस मेचे निवेदन यांत एवढे अंतर का आहे ?'

निक्सन यांच्यापाशी या प्रश्नाचे उत्तर नव्हते.

आणि म्हणूनच सेनेट वॉटरगेट समितीला यापुढे स्वस्थ बसून चालण्यासारखे नव्हते. या समितीने आपल्या कामकाजाला विनाविलंब प्रारंभ केला पाहिजे या मागणीचा जोर वाढत होता.

तसे पाहिले तर या समितीचे काम रेंगाळले होते अशातला काही भाग नव्हता. पण लोकांना त्या कामकाजाला गती प्राप्त व्हावी असे तीव्रतेने वाटू लागले होते.

सतरा मे रोजी सकाळी दहा वाजता सेनेटच्या वॉटरगेट चौकशी समितीची पहिली बैठक भरली. या चौकशीबाबत लोकांना एवढी उत्सुकता होती की आपल्याला कामकाज नीट ऐकता यावे म्हणून आदल्या रात्रीपासूनच अनेकजण तेथे येऊन बसले होते. वार्ताहरही बरेच आधी आले होते. ' न्यूयॉर्क टाईम्स 'ने तर आपले पाच प्रतिनिधी धाडले होते. समितीचे सदस्य आत यायच्या अगोदर ते सारे सभागृह पूर्णपणे भरले होते.

सेनेटने वॉटरगेट समितीवर आपल्या ज्या सात सदस्यांची नियुक्ती केली होती ते लोकांना फारसे परिचित नव्हते. त्यामुळे त्यांना पाहाण्याची उत्सुकताही शिगेला पोहोचली होती. सॅम एर्विन, डॅनिएल इनो, जोसेफ मोण्टोया आणि हर्मन टालमज हे डेमोक्रॅटिक पक्षाचे आणि हॉवर्ड बेकर, एडवर्ड गर्नी आणि लोवेल वेकर हे रिपब्लिकन पक्षाचे सदस्य या समितीमध्ये होते.

पहिल्या अकरा दिवसांमध्ये अठरा साक्षीदारांची तपासणी पूर्ण झाली. परंतु या प्रकरणाचे गंभीर स्वरूप ध्यानात घेता, या साक्षी फारशा खळबळजनक नव्हत्या. लोकांचे लक्ष लागलेले होते जेव

मॅग्रुडरच्या साक्षीकडे. कारण श्वेतभवनामध्ये वावरणाऱ्या लोकांची ज्याला अधिक माहिती आहे असा तो पहिलाच साक्षीदार ठरणार होता. आपण निरपराध असल्याबद्दलचे लेखी निवेदन मॅग्रुडरने वाचून दाखविल्यावर त्याची पाच तास तपासणी करण्यात आली. प्रथम त्याने हाल्डेमान, एर्लिचमान, मिचेल, डीन, कोल्सन, स्ट्रँचन, स्टान्स, स्लोन, कामबाच, माडिआन, लारुए, पार्किन्सन आणि पोर्टर या 'क्रीप'च्या सूत्रधारांचा वॉटरगेट प्रकरण दडपून टाकण्यामागे कसा हात आहे हे विशद करून सांगितले. शेवटी तर त्याने स्वत ही जबाबदार असल्याची कबुली दिली. त्याने फक्त एकाच व्यक्तीचे नाव जाहीर केले नव्हते–राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांचे.

ते काम जॉन डीन करणार होता.

## १८ जूनची साक्ष

मूळच्या कार्यक्रमानुसार जॉन डीनची साक्ष अठरा जूनला सुरू होणार होती. परंतु त्याच दिवशी वॉशिंग्टन येथें निक्सन सोव्हिएट कम्युनिस्ट पक्षप्रमुख लिओनिद् ब्रेझ्नेव्ह यांना भेटणार होते. रूसो-अमेरिकन संबधांना नवे वळण देणाऱ्या या महत्त्वपूर्ण वाटाघाटी चालू असताना, निक्सन यांना गैरसोयीची ठरणारी माहिती प्रसिद्ध करणे अनुचित ठरेल असा समितीने विचार करून डीनची साक्ष सात दिवस पुढ ढकलली.

बडतर्फ करण्यात आलेला डीन काय सांगणार याचा श्वेतभवनातील अधिकारीवर्गाला अदाज आला होता. त्यामुळे या सात दिवसामध्ये श्वेतभवनाच्या वतीने जॉन डीनच्या बदनामीची मोहीम सुरू करण्यात आली. त्यामुळे तर डीनच्या साक्षीला अधिकच महत्त्व प्राप्त झाले.

वॉटरगेट चौकशी समितीपुढे पचवीस जूनला जॉन डीन साक्षीदार म्हणून उभा राहिला. त्याने आपले दोनशे पचेचाळीस पानांचे निवेदन वाचून दाखविले. या प्रदीर्घ निवेदनामध्ये, निक्सन यांच्याबरोबर आपले काय बोलणे झाले, त्यांनी कोणकोणत्या सूचना केल्या याचे टिपण होते. त्या आधाराने समितीने डीन याला अनेक खोचक प्रश्न विचारले. त्याच्या उत्तरामुळे वॉटरगेट प्रकरण दडपून टाकण्यामध्ये निक्सन यांच्या आदेशानुसार, श्वेतभवनातील अधिकाऱ्यांनी वेळोवेळी कोणते पवित्रे घेतले हे अधिकच स्पष्ट झाले. सहाजिकच डीनच्या साक्षीमुळे श्वेतभवनात बरीच खळबळ निर्माण झाली.

या साक्षीपर्वातील पुढचा मानकरी होता मिचेल. त्याने सुरुवातीलाच सांगितले की, 'मी आणि अध्यक्ष निक्सन निर्दोषी असून इतर साक्षीदारांनी सादर केलेल्या कैफियती वस्तुस्थितीचा विपर्यास करणाऱ्या आहेत.' श्वेतभवनातील अधिकाऱ्यावर करण्यात आलेले सर्व आरोप धादांत खोटे आहेत हे त्याच्या निवेदनाचे मुख्य सूत्र होते. ही चौकशी म्हणजे फार्स आहे अशा थाटात तो बोलत होता.

सेनेट वॉटरगेट समितीचे नियोजित कार्य आतापर्यंत व्यवस्थित चालले असले तरी वॉटरगेट प्रकरणाच्या केंद्रस्थानी निक्सनच आहेत हे अद्याप निर्विवाद रीतीने सिद्ध होण्याजोगा पुरावा हाती आलेला नव्हता.

परंतु कोणाच्याही ध्यानीमनी नसताना तेरा जुलै रोजी दुपारी दोन वाजता एक अतिशय महत्त्वाची बातमी चौकशी समितीला समजली.

हाल्डेमानचा एक मदतनीस अॅलेक्झांडर बटरफील्ड याला चौकशी समितीचा वकील डोनाल्ड सॅण्डर्स काही मामुली प्रश्न विचारीत होता. बटरफील्डकडून गभीर स्वरुपाची माहिती मिळेल अशी सॅण्डर्सची मुळीच अपेक्षा नव्हती. परंतु या प्रकरणाशी संबधित असलेली श्वेतभवनातील एकटी व्यक्ती चौकशीविना राहू नये म्हणून तो बटरफील्डची जबानी घेत होता इतकेच.

सॅण्डर्सने त्याला विचारले, 'निक्सन आणि डीन याच्यात पंधरा एप्रिल रोजी श्वेतभवनामध्ये जे बोलणे झाले ते ध्वनिमुद्रित करण्यात आले आहे काय?'

बटरफील्ड चटकन बोलून गेला–' ही काही नवीन गोष्ट नाही. निक्सन यांनी दोन वर्षांपूर्वीच ध्वनिमुद्रणाची गुप्त यंत्रे बसवून घेतली आहेत.'

सोळा जुलैला बटरफिल्डचे हे निवेदन सेनेट वॉटरगेट समितीने नोंदवून घेतले. काही क्षण असे गेले की या निवेदनाचे महत्त्व चौकशी समितीच्या ध्यानातच आले नाही. पण जेव्हा बटरफील्डने केवढा मोठा गौप्यस्फोट केलेला आहे याचा अर्थबोध झाला तेव्हा ते समितीचे सदस्य कमालीचे खुश झाले. वॉटरगेट प्रकरणासबधीचे सर्व कागदपत्र निक्सन यांनी चौकशी समितीपुढे सादर करावेत अशी सॅम एर्विन आणि बेकर यांची पहिल्यापासून मागणी होती. परंतु बटरफील्डने तर त्यासबधीच्या बोलण्याच्या ध्वनिपट्टिका उपलब्ध आहेत हे सांगून चौकशी समितीचे काम खूपच सोपे केले होते.

निक्सन यांच्याकडून संबधित ध्वनिपट्टिका मागवून घेण्याचे ठरले त्यावेळी न्युमोनिया झालेला असल्यामुळे निक्सन रुग्णालयात होते. सॅम एर्विनने त्यांना पत्र लिहिले–' आपल्या प्रकृतीला लवकर आराम लाभावा अशी माझी प्रार्थना आहे. आपण रुग्णालयातून श्वेतभवनामध्ये परतताच, ध्वनिपट्टिका चौकशी समितीकडे सुपूर्त कराव्यात अशी विनती आहे.'

या ध्वनिपट्टिका मिळाल्यावर कोण खरे बोलत आहे आणि कोण खोटे सांगत आहे याचा साक्षात पुरावा उपलब्ध होणार असल्यामुळे स्पेशल वॉटरगेट प्रॉसिक्युटर आर्चिबाल्ड कॉक्स, यानेही ध्वनिपट्टिकांची मागणी करणारे पत्र निक्सन यांच्याकडे रवाना केले.

एर्विन आणि कॉक्स यांची पत्रे पाहताच निक्सन चपापले. चार-दिवस ते गप्प बसून राहिले आणि नतर यांनी एर्विनला कळविले– 'राष्ट्राध्यक्ष या नात्याने मी अनेकांशी वेळोवेळी अनेक विषयांवर बोलतो. त्यातील बरेचसे बोलणे गप्पांच्या किंवा अनौपचारिक चर्चेच्या स्वरुपाचे असते. त्यामुळे ध्वनिपट्टिकांवरून अर्थबोध होणे कठीण आहे.'

आपला हा खुलासा एर्विनला पटेल आणि तो ध्वनिपट्टिकांची मागणी सोडून देईल असा निक्सन यांचा कयास होता. त्याऐवजी या उत्तरातून आणखी एक गोष्ट उघडकीला आली. एर्विन म्हणाला, 'याचा अर्थ निक्सन यांनी त्या ध्वनिपट्टिका वेळोवेळी वाजवून पाहिल्या आहेत. इतरांनी मात्र त्या ऐकता कामा नयेत असा त्यांचा आग्रह दिसतो. त्यावरून, या ध्वनिपट्टिका चौकशी समितीने ऐकल्या तर आपल्यासबधी प्रतिकूल निर्णय होईल अशी निक्सन यांना भीती वाटत असली पाहिजे.'

निक्सन जर साधे पत्र पाठवून ध्वनिपट्टिका द्यायला राजी होत

नसतील तर त्यांच्याकडून तशी कायदेशीर मागणी केली पाहिजे असे चौकशी समितीने ठरविले आणि तेवीस जुलैला रूफस एडमिस्टेन आणि हेन्री लेन्झेट या वकिलानी श्वेतभवनामध्ये जाऊन तशी नोटीस बजाविली.

ससदेने राष्ट्राध्यक्षावर अशा स्वरुपाची नोटीस बजावण्याचा अमेरिकेच्या इतिहासातील हा पहिलाच प्रसंग होता.

या नोटिशीबाबतचा निर्णय प्रथम वॉशिंग्टनच्या जिल्हा न्यायालयाने द्यावयाचा होता आणि त्या न्यायालयाचा निर्णय अध्यक्षानी मानला नाही तर सर्वोच्च न्यायालयाने अंतिम निर्णय करावयाचा असतो. तो होईपर्यंत समितीला ध्वनिपट्टिकांबाबत पुढची हालचाल करता येणे शक्य नव्हते. म्हणून तिने आपले जाबजबाबाचे काम चालू ठेवले. यापुढच्या साक्षीपैकी एलिचमान आणि हाल्डेमान यांच्याच साक्षी अतिशय महत्वाच्या होत्या. कारण निक्सन याच्या साऱ्या कारवायांमध्ये त्याना मुख्यत: साथ होती ती या दोघांचीच.

एलिचमानने मिचेलचे तंत्र अनुसरले. कोणत्याही प्रश्नाला तो नीट उत्तर देत नव्हता. आपल्या उत्तरामधून चौकशी समितीच्या हाती काही लागू नये याची तो सारखी दक्षता घेत होता.

सॅम डॅश याने एलिचमानला विचारले, 'बाहेरच्या घडामोडीचा संपूर्ण वृत्तांत निक्सनना कळावा यासाठी श्वेतभवनामध्ये एक वेगळी गुप्तचर यंत्रणा उभारण्याची कामगिरी तुमच्याकडे सोपविण्यात आली होती काय ?'

एलिचमान उत्तरला, 'तुम्हाला काय जाणून घ्यायचे आहे हेच मला कळत नाही.'

तरीही डॅशने या प्रश्नाचा पाठलाग चालूच ठेवला. तो म्हणाला, 'मला कोणती माहिती हवी आहे हे तुम्हाला कळू नये याचे मला आश्चर्य वाटते. मी विचारलेल्या प्रश्नाचे नेमके उत्तर दिले जावे अशी माझी अपेक्षा आहे.'

तरीही एलिचमान दबला नाही. तो म्हणाला, 'तुमचा प्रश्न संदिग्ध आहे.' डॅश उत्तरला, 'माझा प्रश्न अगदी साधा आहे. हो किंवा नाही एवढे साधे उत्तर अपेक्षित आहे.'

तरीही एलिचमान आपल्याला अर्थबोध झाल्या नसल्याचेच सांगत राहिला.

आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या खासगी जीवनाची माहिती गोळा करून ती प्रसिद्ध करण्याचा उद्योग कितपत उचित आहे असे लोवेल बेकरने विचारले तेव्हाही एलिचमानने याच धर्तीचे उत्तर दिले.

एलिचमानची उत्तरे द्यायची ही तऱ्हा पाहून डॅनिएल इनो


# PHOENIX CHEMICAL WORKS PRIVATE LIMITED

4, Rajan House, Opp. Century Bazar, Prabhadevi,
BOMBAY - 25

*Manufacturers of :*

**ELECTROPLATING CHEMICALS and SILICATES**

उद्गारला, 'काय खोटारडा माणूस आहे हा !'

हे साक्षीचे काम चालू असताना, एके दिवशी एर्लिचमानने 'वॉशिंग्टन पोस्ट'चा वार्ताहर निकोलस फॉन हॉफमन याला विचारले, 'सध्या तू काय लिहितो आहेस ?'

'तुमच्यासबधीच.'

'मी तुझे लिखाण कधीच वाचीत नाही.'

एर्लिचमानची बोलण्याची तऱ्हा ही अशी होती.

एर्लिचमाननतर हाल्डेमानची साक्ष झाली. या चौकशीकडे पहायचा त्याचा दृष्टिकोन एर्लिचमानसारखाच होता. वॉटरगेट प्रकरणासंबंधी आपल्याला काहीही माहीत नाही हे तर त्याने सांगितलेच, पण चौकशी समिती नेमून सेनेट या प्रकरणाला अवास्तव महत्त्व देत आहे हे आपले मतही त्याने नोदविले.

हाल्डेमानच्या साक्षीनंतर सेनेटची उन्हाळ्याची सुट्टी सुरू झाली. आतापर्यंत चौकशी समितीने सदतीस दिवसामध्ये पस्तीस जणाचे जाबजबाब दाखल करून घेतले होते. हे शोधकार्य दूरदर्शनावरून प्रक्षेपित होत असल्यामुळे लोकांना कोण कसे बोलतो, कशी उत्तरे देतो हे चांगल्या रीतीने समजावून घेता आले.

वॉटरगेट प्रकरणाची निक्सनना किती माहिती आहे हा चौकशी समिती नेमताना सेनेटचा मुख्य उद्देश होता. परतु हाती आलेल्या साक्षी-पुराव्यावरून हा प्रश्न आता महत्त्वाचा राहिलेला नाही हे समितीला कळून आले. निक्सन याचा हात या प्रकरणामध्ये किती खोलवर गुतलेला आहे याचा शोध घेणे हीच यापुढची महत्त्वाची कामगिरी आपल्याला पार पाडायची आहे याबद्दल समितीची खात्री पटली होती.

१९७३ च्या जानेवारीमध्ये जॉर्ज मॅकगव्हर्न ब्रिटनच्या दौऱ्यावर गेला होता. ऑक्स्फर्ड विद्यापीठामध्ये अमेरिकेतील प्रचलित परिस्थितीविषयी बोलताना तो म्हणाला होता– 'अमेरिकेत सध्या एका माणसाच्या हातात सारी सत्ता केंद्रित झालेली आहे. ज्या लोकशाहीबद्दल अमेरिकेचा गौरव होत होता ती लोकशाही आता दुबळी होऊ लागली आहे. सगळे निर्णय राष्ट्राध्यक्ष करतात आणि त्याच्या भोवतालची मडळी त्या आदेशांची कार्यवाही करून गप्प बसतात. ससदेचा प्रभाव ओसरला आहे. रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते राष्ट्राध्यक्षांचे होयबा झालेले आहेत आणि डेमोक्रॅटिक पक्षाची तर वाताहात झालेली आहे. वृत्तपत्रांच्या टीकेचाही धाक उरलेला नाही.'

वॉटरगेट प्रकरण सेनेटपुढे आल्यापासून ही परिस्थिती निश्चितपणे बदलू लागली होती.

निक्सन यानी ध्वनिपट्टिका सेनेट वॉटरगेट समितीपुढे सादर केल्या पाहिजेत असा जिल्हा न्यायालयाने निर्णय दिल्यानतरही निक्सन यानी तो आदेश मानला नाही. हा निर्णय राष्ट्राध्यक्षांवर बंधनकारक आहे असे स्पेशल प्रॉसिक्युटर आर्चिबाल्ड कॉक्स याने म्हटल्यामुळे त्याला निक्सननी तडकाफडकी बडतर्फ केले. राष्ट्राध्यक्ष अशा रीतीने न्यायालयीन निर्णयात हस्तक्षेप करू पहात आहेत हे पाहून एलियट रिचर्डसनने ॲटर्नी जनरलपदाचा राजीनामा दिला.

आर्चिबाल्ड कॉक्स याची बडतर्फी हा निक्सन प्रशासनाच्या दंडेलीशाहीचा ढळढळीत पुरावा होता. या घटनेने निक्सन यांच्यावरचा उरलासुरला विश्वासही नाहीसा झाला. 'निक्सन यानी आता राजीनामा देऊन मोकळे व्हावे, नाही तर महाभियोगाला सिद्ध रहावे' अशी मागणी करणाऱ्या पावणेतीन लाख तारा श्वेतभवनामध्ये येऊन पोहोचल्या.

लोक आपल्या राजीनाम्याची मागणी करू लागल्याचे पाहून निक्सन आपल्या मूळच्या हटवादी भूमिकेवरून थोडे खाली आले. त्यानी आपण ध्वनिपट्टिकावरील सभाषणाचा सारांश सादर करू अशी तडजोडीची भाषा करून पाहिली. फक्त न्यायाधीशांनाच आपण ध्वनिपट्टिका ऐकवू असेही त्यांनी सुचवून पाहिले. पण सर्वोच्च न्यायालयानेही आठ विरुद्ध शून्य मतानी निक्सननी सेनेट वॉटरगेट समितीला ध्वनिपट्टिका सादर केल्या पाहिजेत असा निर्णय दिल्यानतर ध्वनिपट्टिका देण्यावाचून निक्सनना गत्यतर उरले नाही. तरीही त्यानी अशी मखलाशी केली की, दोन ध्वनिपट्टिका गहाळ झाल्या आहेत. निक्सन याच्या या सबबीवर कोणीही विश्वास ठेवायला तयार नव्हते. विशेषतः कॉक्सच्या जागी आलेला लिऑन जावोर्स्की हा स्पेशल प्रॉसिक्युटर तर निक्सननी ध्वनिपट्टिका दिल्या नाहीत तर ससदेने त्यांच्यावर महाभियोग भरावा असे सागू लागला.

त्याप्रमाणे प्रतिनिधीगृहाने अडतीस सदस्यांची न्यायसमिती नेमली. तरीही, वॉटरगेट–प्रकरण ही एक सामान्य घरफोडी असून तीत आपला हात मुळीच अडकलेला नाही हा आपला बचाव सोडायला निक्सन तयार झाले नाहीत. शेवटी या न्यायसमितीने सत्तावीस विरुद्ध अकरा मतानी, 'प्रतिनिधीगृहामध्ये निक्सन यांच्यावर महाभियोग भरण्यात यावा' अशी शिफारस केली. तरीही 'मी बदनाम नाही' असेच निक्सन सांगत होते.

सत्तेचा गैरवापर आणि न्यायालयीन कामकाजात हस्तक्षेप या दोन अपराधाबद्दल निक्सन याच्यावर महाभियोग दाखल करण्याची सारी सिद्धता झाली तेव्हा, दोन वर्षे सतत नकार देत असलेल्या निक्सनना वॉटरगेट प्रकरणातील पुरावा मी दडवून ठेवला अशी कबुली द्यावी लागली. निक्सन यांची ही कबुली प्रसिद्ध होताच, आतापर्यंत त्यांची पाठराखण करीत असलेले स्नेहीदेखील, महाभियोग टाळावयाचा असेल तर निक्सननी ताबडतोब राजीनामा दिला पाहिजे असे म्हणू लागले.

निक्सन अगदी एकाकी अवस्थेत उभे होते.

अखेर त्यानी आपला राजीनामा सादर केला आणि अत्यत खिन्न मन:स्थितीत श्वेतभवनाचा निरोप घेतला.

रिचर्ड मिलहौस निक्सन या व्यक्तीची २० जानेवारी, १९६९ पासून सुरू झालेली अध्यक्षीय कारकीर्द अपमानित अवस्थेमध्ये ९ ऑगस्ट, १९७४ या दिवशी समाप्त झाली.

सत्तेच्या हव्यासामुळे विवेकभ्रष्ट झालेला माणूस, वैभवाच्या शिखरावरून नामुश्कीच्या खोल गर्तेत फेकला गेला.

या कर्तृत्वाचे श्रेय आहे अमेरिकेतील निस्पृह न्यायसस्थेला, परखड पत्रकारितेला आणि जागरूक जनमानसाला.

## समाप्त

## साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**२१-९-७४ ते २७-९-७४**

### भारत : सत्ता व राजकारण यात खळबळ

सत्तेचा कारक ग्रह व राजकारणाचा कारक ग्रह कन्या राशीसारख्या चचल राशीत एकत्र आले आहेत ते भारतीय जीवनात स्थैर्य वा स्वास्थ्य निर्माण करायला मुळीच नव्हे. पतप्रधान इदिरा गाधीनी जरी मत्रीमडळात बदल करायचा आक्रमक पावित्रा घेतला तरी त्याना वरिष्ट मन्याच्या बाबतीत बरीच तडजोड करावी लागेल. ललित नारायण मिश्रा, उमाशकर दीक्षित, चटोपाध्याय याच्याबाबतीत त्याना प्रतिकूल निर्णय घ्यावे लागतील. महाराष्ट्र, प. बगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा अशी राज्ये असतोषाच्याच्या खाईत ढकलली जातील. इदिराजीना भ्रष्टाचारी प्रकरणे सतावून सोडतील. चीन सबधात खळबळजनक वार्ता येऊ लागतील. नैसर्गिक आपत्तीचीही शक्यता.

### मेष : आता भीती नको

आठव्या चद्राने सप्ताहाची सुरुवात होत आहे. स्थावराचे तटे सपत्तीची वाटणी वा वारसाहक्काचा वाटाघाटी पहिल्या दोन चार दिवसात अवश्य करा. यश मिळेल. या सप्ताहात रवी-मगळासारखे समर्थ ग्रह तुमच्या विरोधकांना चागलेच वठणीवर आणणार आहेत. त्यांची कारस्थाने मोडून काढणार आहेत. तुमच्या उद्योगव्यवसायातील तुमच्या प्रगतीच्या आड येणारे शारीतील शुक्राचार्य निष्प्रभ होतील. नोकरीतील तुमचे हक्क तुम्हाला मिळतील, महिलानी मोकळ्या मनाने अगीकृत कार्य करावे.

### वृषभ : बढती बदलीचा योग

आठवड्याचे पहिले चार दिवस कौटुबिक दृष्ट्या अनुकूल आहेत. तरुण मंडळी प्रेमात पडतील. नवीन दापत्याचे एखादे स्वप्न साकार होईल. ससारातील अडचणी निवारण होतील. या आठवड्यात प्रामुख्याने रवी-मगळ पाचवे आहेत ही एकच गोष्ट तुमच्याबाबतीत उल्लेखनीय ठरावी. डॉक्टर, इजिनियर, वकिली याच्या व्यवसायाला प्रगतीची नवी दिशा मिळेल. इजिनियरिंग कारखानदार नवे भांडवल मिळवून उत्पादनाचा उच्चाक गाठू शकतील. नोकरीत मोठी बढती व बदली होईल. महिलानी आपले हेतु उत्साहाने पुरे करावे.

### मिथून : निवासस्थान मिळेल

हा आठवडा काहीसा सघर्षातून यश मिळवून देणारा आहे, मगळवार ते शुक्रवार याच काळात कोणतेही नवे संकल्प करा. नवे करारमदार, आर्थिक–सांपत्तिक उलाढाल याच काळात फायद्याची ठरेल. नोकरीत वावरणाऱ्यानी आपले काम मतापासून करावे. त्यात चुका करू नये. चालढकलही करू नये. वरिष्ठाच्या मनात सशय निर्माण होईल असे वागू नये. रवी-मगळ चौथे आहेत. राहायला जागा मिळेल. वणवण सपेल. परिस्थितीनुरूप बगल्याची इच्छा पुरी होईल. स्वतःची मालकी प्रस्थापित होईल. महिलांची अनेक स्वप्ने साकार होतील. नोकरीत प्रमोशन.

### कर्क : काही शुभ घटना घडतील

या आठवड्याची सुरुवात आगामी काळाची प्रगतीकारक सुचिन्हे दाखविणारा ठरावा. तुम्ही जर लहान वा मोठे उद्योगपती असाल तर तुम्हाला परदेशात स्वतःचा उद्योग प्रस्थापित करायला उत्तम सधी मिळणार आहे. सशोधन, इजिनियरिंग व रासायनीक उद्योगात नवीन प्रवेश करायची इच्छा असणाऱ्या पदवीधराना मोठे यश मिळेल. एखादा प्लॉट घेण्याची सुप्त इच्छा अचानक पुरी होईल. सोमवार ते गुरुवार या दरम्यान 'श्रमाविना सपत्ती' मिळेल. नोकरीत अनपेक्षित वरची जागा व पगारवाढ मिळेल. महिलांस लॉटरीचा लाभ होईल. विवाहेच्छूचे विवाह ठरतील.

### सिंह : उद्योगाला सहाय्य मिळेल

तुमचा राशिस्वामी दुसरा झाला आहे. रवी-मगळाचे हे धनस्थानातील भ्रमण तुमच्या एकत्र कुटुबात विरोधकाकडून व हितचितकाकडून विषार पेरला जाणार नाही याची काळजी डोळयात तेल घालून घ्या. पतिपत्नीत भाडण होऊ देऊ नका. एवढी जर काळजी घेतली तर हा आठवडा अनेक बाबतीत महत्त्वाचा ठरावा. तुमचा एखादा कारखाना वा उद्योग असेल तर त्यातील अडचणी दूर होऊ शकतील. तुमच्या मनातील योजनसांठी पैशाचे व तांत्रिक सहाय्य मोठ्या प्रमाणात मिळेल. महिलाना नोकरी मिळेल. जुन्या नोकरीत वरिष्ठांची सहानुभूती लाभेल.

### कन्या : प्रगतीची चिन्हे

रवी-मगळासारखे समर्थ ग्रह राशीत असताना आता भिता कशाला? आजार सपला, निराशा विरघळली, निरुत्साह ढगाआड गेला, अडचणी सपल्या. आता सारे अनुकूल वातावरण निर्माण होऊ लागणार आहे. जिथे पाऊल ठेवाल तिथे प्रगतीची चाहूलच लागेल. नोकरीत कामाचा ताण कमी होईल. फारसे श्रम करावे लागणार नाहीत प्रतिष्ठा वाढवणाऱ्या नव्या कामाची जबाबदारी तुमच्याकडे दिली जाईल. पैशाच्या मागण्या पुऱ्या होतील. व्यवसाय सुधारेल. इच्छा-आकांक्षा पूर्ण होतील. महिलांनी समजुतीने सारे फायदे मिळवावे.

### तूळ : जरा जपून

या आठवड्यातील पहिले चार दिवस तुम्हाला चद्रबळ उत्तम आहे. त्यानतर चद्र तेवढासा अनुकूल नाही. सध्या तुम्हाला अनुकूल आहे तो एकमेव गुरु. तो तुमची अप्रतिष्ठा अगर अवमान होऊ देणार नाही.

कोणत्याही प्रकारचे संकट आले तरी ते परतविणे गुरुकृपेने तुम्हाला शक्य होईल. रवी व मगळ बारावे झाले आहेत. ते एका अर्थाने क्रूर ग्रह आहेत. त्यामुळे त्यांना दुर्लक्षून चालणार नाही. पैशाच्या बाबतीत डोळ्यात तेल घालून जपायला हवे. महिलांनी अंगिकारलेले व्रत पुरे होईल. नोकरीत हा आठवडा अनुकूल आहे.

**वृश्चिक : सांपत्तिक सुधारणा**

हर्शलाने बाराव्या स्थानी ठाण मांडल्यापासून तुमची मिळकत व खर्च याचा मेळ अजिबात बसत नाही हे खरेच. कर्ज-कर्ज आणि कर्ज हीच आजकाल तुमची किल्ली झाली आहे. पण, मित्र हो, मला सांगायला आनद वाटतो की निदान या आठवड्यात तरी तुम्हाला कर्ज काढावे लागणार नाही. कारण रवी-मगळ ही जोडी तुमच्या खजिन्यातील तूट भरून काढून तुमच्या खजिन्यात भर घालायला उत्सुक झाली आहे. आता तुम्ही रेस व लॉटरीत अवश्य भाग घ्या. व्यापारदेखील तेजीत येईल. महिलांनी दागिन्याचा हट्ट धरल्यास तो पुरा होईल.

**धनू : नोकरीत उत्तम**

आता तुम्हाला खरे म्हणजे कुरकुर करायला काही वाव नाही. राहू बारावा आहे व तो नवे नवे अनपेक्षित खर्च निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असला तरी त्यामुळे घाबरून जाण्याचे काहीच कारण नाही. तिसरा गुरू तुमचे कर्तबगारीला वाव देऊन तुमचे क्षेत्र व्यापक बनवणार आहे. नव्या क्षेत्रात पदार्पण करायला हा सप्ताह अनुकूल आहे. नवा धदा अवश्य सुरू करा. आर्थिक स्थितीदेखील डोळ्यात भरण्यासारखी सुधारणार आहे. नोकरीत महत्त्वाकांक्षा अचानक पुरी होईल. प्रमोशन, वरची जागा मिळेल. महिलांनी नोकरीत थोडेफार कसब दाखवले तर त्यांना बढती मिळेल.

**मकर : व्यवसायाला कलाटणी**

पहिले दोन दिवस चद्र पैशाची अनेक कामे यशस्वी करील. करार वा कर्जाला उत्तम आहे. धद्यात भागीदारी मिळवायला हरकत नाही. पण दुसरा गुरू त्यापेक्षा कुटुंबात अनुकूल असे वातावरण बनवील. मुलांचे कौतुक होऊन तुम्हाला अभिमान वाटेल. मुले चमकतील. रवी व मगळ तुम्हाला इतके छान आले आहेत की नोकरी, व्यवसाय, व्यापार, जमीनदारी, शेती इत्यादी बाबतीत नवे विक्रम करायला अनुकूल सधी येईल. प्रतिष्ठा आणि पैसा याची अभिवृद्धी होईल. महिलांनी आक्रमक पवित्रा घेऊन उद्योगात धाडस करावे. पैसा मिळेल.

**कुंभ : अचानक धनलाभ**

आठवड्याची सुरुवात चद्राच्या अनुकूलतेने होत आहे. त्यामुळे अनेक दिवस तुमच्या मनाची होत असलेली घालमेल आता थाबेल व तुमचा हेतू साध्य होणारा निश्चित विचार ठरेल. नोकरीत पक्के स्थान मिळेल. डळमळ थाबेल. वरिष्ठांकडून आश्वासन मिळेल. राजकारणातील अगतिक, अनिश्चित अवस्था सपून तुमचे स्थान उचावेल व प्रतिष्ठा वाढवणारे काही तरी पदरात पडेल. आठवे ग्रह तब्येतीला थोडा फार त्रास देतील, पण पैशाची बाजू भक्कम करतील. लॉटरी, रेसमध्ये पैसा मिळेल. महिलांनी प्रयत्न केला तर त्यांना माहेरकडून स्थावर प्रॉपर्टी मिळेल.

**मीन : मतभेद वाढवू नका**

या आठवड्यातील ग्रहमान फारसे अनुकूल नाही. त्याचप्रमाणे फारसे काही वाईटही घडणार नाही. चालू नोकरीत निष्ठा ठेवून काम करा. बोलायची सधी वरिष्ठाना देऊ नका. जास्त काम पडले तरी चिडू नका. उद्योगधदा प्रगतीपथावर राहिला तरी त्यात थोड्या फार अडचणी येतील पण नुकसान होणार नाही. रवी-मंगळ व गुरू हे ग्रह अनुकूल नाहीत. घरीदारी मतभेद वाढवू नका. पती-पत्नीने भाडू नये. लग्नाचा विचार या आठवड्यात करू नका. प्रेमात सावधगिरी बाळगा. महिलांनी उपवर कन्यकाच्याविषयी सावध राहावे. नोकरीत अनुकूलता राहील.

□ □

टॉलस्टाय
एक माणूस

सुमती देवस्थळे

प्रसिद्ध झाले.

मूल्य २५ रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## अरुणा

### एक गरम मसालावाली जबरदस्त चीज

अरुणा इराणी; सिनेमावाल्या दुनियेतले हे भलतंच रुक्ष नाव आहे. या नावाची एक भोळी लडकी सिनेमे पाहून यायची आणि आरशात बघून नर्गीस, मधुबाला, मीनाकुमारी बनायची. नृत्यही करायची. कोणीही धिकदातिरकटधा तिला शिकवले नाही. आपल्या आपणच नाचायची. पण पाय हलके. त्यामुळे पावले नेमकी तालावर पडायची.

अशी घरगुती तयारी करून अरुणा चक्क सिनेमात शिरली. तिथे तिचा पाला पडला महंमुदबरोबर. महंमुद म्हणजे एक यशस्वी कलाकार. असल्या फालतू दिसणाऱ्या पोरीबरोबर काम करायचे म्हणजे तो सहाजिकच आखडायचा. असे म्हणतात ज्या पोरीला नंतर लोक महंमुदची पाचवी बायको म्हणून ओळखू लागले त्या या पोरीवर पहिल्या काही टेक्सवेळी महंमुदमुळे रडण्याचा प्रसंग आला होता.

महंमुद-शुभा खोटे, महंमुद-मुमताझ या दोन जोड्यानंतर महंमुदची जोडी कुणाबरोबर करावी, यासाठी त्याकाळी निर्माते डोके खाजवीत होते. चांदउस्मानीसारख्या जसबाती अदाकाराबरोबरही महंमुदला टाकण्याइतकी त्यांची अक्कल चालली. आणि त्यानंतर त्यांनी त्याची जोडी अरुणा इराणी या अगदी सामान्य दिसणाऱ्या कोऱ्या चेहऱ्याबरोबर केली. खुद्द निर्मात्यालाही आपले पिक्चर चालेल म्हणून खात्री नसतानाही त्याचे पिक्चर हिट जाते ना (दो रास्ते, जुग्नु, बॉबी वगैरे) त्याचप्रमाणे महंमुद-अरुणा इराणी ही जोडी चालली, गाजली. अक्षरशः या जोडीने अनेक सिनेमातून धमाल उडवली.

अरुणा इतकी त्यावेळी सामान्य वाटायची की ही बाई पडद्यावर काही काम करून दाखवील किंवा व्हिलनच्या अड्डयावरील त्याचे चमचे अड्डयावर बांधलेल्या हिरॉइनकडे पाहून जिभल्या चाटतात, त्याप्रमाणे आपणही अरुणाच्या सेक्सकडे पहाताना जिभल्या चाटाव्यासे वाटावे, इतका आपल्याला साक्षात्कार होईल असे वाटले नव्हते. त्यावेळी प्रत्येक सिनेमा पहाताना विचारावे ' महंमुदबरोबर लडकी कोण होती !' 'अरुणा इराणी !' ' हल्ली प्रत्येक पिक्चरमध्येच ती महंमुदबरोबर असते. ठीक वाटते. ' एवढंच तिच्याविषयी बोलले जात असे.

' बुढ्ढा मिल गया 'मध्ये अर्चना, अरुणा, बुढ्ढ्या जादुगारापुढे गाणे गाऊन आशीर्वाद मागताना ' ऐसा जादू मार की चंगी हो जाऊ मैं बाला. ' तसा अरुणाने कुणा बाबाकडे आशीर्वाद मागितला असावा की काय कुणास ठाऊक ? पण एक दिवस ती अचानक आपल्याला खुबसुरत वाटू लागली. ' दि ट्रेन 'मध्ये छोटेसे नृत्य घ्या किंवा ' अंदाज 'मधली ती गावकी गोरी घ्या. पोरगी चंगी वाटू लागली होती.

अरुणा आता साईड हिरॉइनच्या कामाला अगदी फिट्ट बसू लागली होती. आता महंमुदबरोबर पाकीट उडवणाऱ्या वडारणीचं काम असो (' समाजको बदल डालो ') किंवा सफर, नया जमानासारख्या पिक्चरमध्ये अंडरप्ले करणाऱ्या साध्या घरेलू बाईची भूमिका असो, तिने आपली भूमिका नीट निभावली होती. खरं म्हणजे ' सफर 'मधल्या मस्तकावर ब्रह्मांड कोसळलेल्या शर्मिलाची समजूतदार भाभी म्हणून आणि नया जमानामध्ये प्राणच्या रईस फॅमिली चोरीचा इल्जाम लागलेली गरीब धर्मेंद्रची बहीण म्हणून तिने ज्या भूमिका केल्या, त्याबद्दल तिला ' दि बेस्ट सपोर्टिंग ॲक्ट्रेस 'चे पारितोषिकच मिळायला हवे होते ! आपली साईड हिरॉइनची भूमिका निभावताना तिने कधीच हिरॉइनला खाऊन टाकायची आयडिया केली नाही. मग ती हिरॉइन कशी होणार ?

त्यानंतर ' अरुणा'ची ' कारवाँ 'मधली गरम मसालेवाली अदाकारी. साईड हिरॉइनची आता अरुणा अदाकारा बनली. तिचे लुकलुकणारे लहानसे डोळे, सडपातळ ओठ, चिंचोळी हनुवटी आणि चौकोनी कपाळ यामुळे अरुणा एखाद्या मांजरीप्रमाणे एक



**माझ्या गरम मसालेवाल्या अदाकारीची लज्जत चाखायची आहे काय ? तर चट्टानसिंग बघा, असे अरुणा म्हणत नाही ना ?**

'खुबसुरत तोबा' वाटू लागली. गरम मसाल्याप्रमाणे क्षणक्षणीत पण लज्जतदार वाटली. कारवांमधून वडारणीचा पेहेराव घालून, उघडे मांसल पोट, बेंबीचा खळगा, स्तनांची उभारी आणि सोपेदार पोटऱ्या, अशी ही गरम मसाला 'गोरी कहाँ देश रे ऽऽ' या गाण्यामध्ये 'ल् ल् ल् ल्' गात (आशाचा आवाज) खटाऱ्याला धरून अंग सेक्सी लयीमध्ये हेलकावीत ओढली जाते, त्यावेळी तिला नुसते पहात रहाणे कठीण ! कारवांत आशा पारेखला तर अरुणाने खाऊनच टाकले आहे. पण, हिरो जितेंद्रची हिरोगिरीही तिने छुट्टी करून टाकली होती. नसीर हुसेनने आपल्या फिल्मी–जिंदगीत कुणा अदाकाराला इतके मोकाट सोडले नसेल. 'दिलवर दिलके प्यारे' या गाण्यात अरुणा अशी काही नाचली आहे की ही बाई किती जबरदस्त आहे, असे वाटू लागते.

'कारवाँ'ने अरुणाकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. महंमुद तिला आता हिरॉईन बनवण्याची आयडिया करू लागला होता. उलट, अदाकारीला वाव मिळण्याच्या आड महंमुदने येऊ नये म्हणून जितेंद्र महंमुदकडे रदबदली करू लागला होता.

मुमताझ साइड हिरॉइनचं काम करत करत एक दिवस हिरॉइन बनली. हिरॉइनसाठी जे काही हवं होतं, ते सारं काही तिच्याकडे होतं. खुबसुरती, अदाकारी, खेरीज आणखीही तिच्याकडे एक गोष्ट होती. ती म्हणजे सेक्स.

मुमताझ सारखीच अरुणाही साईड हिरॉइन. मुमताझने 'आदमी और इन्सान' मध्ये साईड रोल करताना हिरॉइन सायराला खाऊन टाकलं होतं. त्याप्रमाणे 'कारवाँ'मध्ये अरुणा इराणीनेही आशा पारेखला खाऊन टाकलं होतं. हिरॉइनसाठी जे जे हवं असतं ते ते अरुणाकडे होतं. खुबसुरती, अदाकारी. मुमताझप्रमाणेही तिच्या जवळही सेक्स होतं पण, अरुणा साईड हिरॉइन ती साईड हिरॉइनच राहिली. ती हिरॉइन म्हणून चार दोनच पिक्चर्समध्ये आली. दोन्ही महंमुदच्या. 'गरम मसाला' हे पिक्चर पडलेच. त्यात अरुणाने नाव 'गरम मसाला' घेतले पण 'गरम मसाला'वाली धमाल काहीच केली नाही. आणि 'बॉम्बे टु गोवा'मध्ये ती अभिताभची हिरॉइन होती. त्यावेळी अमिताभदेखील साईड हिरोचा हिरो बनण्याच्या खटपटीत होता. पण 'बॉम्बे टु गोवा' या पिक्चरमध्ये, त्यांच्या या खटपटीला यश मिळणे कठीणच होते. कारण या पिक्चरमधले साईड रोल्सच हिरो हिरॉइन्सपेक्षा जोरदार होते.

अर्थातच अरुणाला आता साईड रोल मिळाल्याबद्दल वाईट वाटण्याचे कारण नाही. सध्या साईड रोलमध्ये

असलेल्या अदाकारांची आपल्या पिक्चर्समध्ये जितकी चलती आहे तितकी हिरो हिरॉइन्सची नाही. बिंदू किंवा अरुणा इराणी दहा पिक्चर्समध्ये कामं करतील त्यावेळी हेमा मालिनी किंवा रेखाच एकच पिक्चर झालेलं असतं. आणि दहा ठिकाणी घेतलेले पैसे हेमा मालिनीच्या पैशापेक्षाही अधिक भरण्याचा संभव असतो.

हिंदी चित्रपटामध्ये साईड रोल्स करणाऱ्या नटघा मोठया तकदीरच्या. त्यांना फिल्मी गॉसिप मॉंगसंची, इमेज टिकवण्याची, आपल्याला अक्कल आहे हे दाखवण्याची काही गरज भासत नाही. त्यामुळे त्या पडद्यावर वर्षानुवर्षे राहू शकतात. हेलनचं पहा. व्हॅम्पिश इमेजमुळे त्याना फॉलोईंग निर्माण होत पण, त्यांच्या लग्नाची उठाठेव कोणीही करीत नाही. म्हणूनच आजच्या फिल्मी दुनियेत अरुणा इराणीसारखी सुखी बाई नसेल. महंमुदच्या साम्राज्यातून ती मोकळी झाली होती आणि बॉबी, प्रेमनगर या हिंदी पिक्चर्समध्ये तिने चटकदार भूमिका केल्या. आता तिला फिल्मी जगात साईड हिरॉइन म्हणून बिंदूच्या खालोखाल डिमाड आहे.

पण अरुणाचं तकदीर मोठ विचित्र आहे. ज्यावेळी तिच्यासाठी हिरॉइन होण्याचे मार्ग खुले झाले त्यावेळी ती हिरॉइनच्या भूमिकेला ' अयोग्य ' आहे हे दिसून आले. ' बॉबी 'मध्ये तिने सेक्सी मादीचा साईड रोल कामयाब करून दाखवला, त्यावेळी तिच्याकडे येणाऱ्या तसल्याच नव्या भूमिकांनाही अयोग्य आहे असे दिसून आले. ' इन्साफ 'मध्ये तिने ' बिंदू ' स्टाईलचा व्हॅम्पिश रोल केला. पण, त्या भूमिकेत मुळीच जान नव्हती. प्राणच्या मुकाबल्यात ती मुळीच उभी राहू शकली नाही. ' हम शकल 'मध्ये कॅब्रे-डान्सर म्हणून तिला काहीच काम नव्हते ती ज्याप्रमाणे ' मुमताझ ' बनू शकली नाही, त्याचप्रमाणे ती ' बिंदू 'ही होऊ शकली नाही. तिच्या जवळ सेक्स आहे, परंतु, आशिकी नाही. बिंदूप्रमाणे हातात व्हिस्की घेऊन आधुनिक सेक्सी पेहराव करून, हिरोना फशी पाडण्यासाठी जी एक नशेली तबियत असायला पाहिज ती अरुणाला नाही. ती वडारणीच्या आणि मराठमोळ्या गरम मसालेवाल्या झणझणीत तबिएतीची बाई आहे, हे सिद्ध झाले. दादा कोडक्याच्या, ' आंधळा मारतो डोळा 'मध्ये ती कासोटयाचे पातळ नेसून मराठी तमासगिरीण म्हणून पहाताना आपल्याला जरासुद्धा शका आली नाही की ' बॉबी ' मधली सोफिस्टिकेट लोकांमध्ये नाचणारी हीच ती अरुणा इराणी हीच आहे. पक्की तमासगिरीण वाटली ती.

' दो चट्टाने 'मध्ये पुन्हा अरुणा इराणीने आपल्या गरम मसालेवाल्या भूमिकेत आपली जबरदस्त अदाकारी दाखवली. ' दो चट्टाने 'मध्ये पुन्हा अस्सल ' गरम मसाला ' आपल्याला दिसला. मराठमोळ्या कासोटयाचं पातळ नेसलेली तिची लवलवीत वेतासारखी तबिएत, हिजडयांच्या गाण्यावर धूम नाचणारी, चारसोवीस गुडाना मर्दानी झाशीवालीच्या स्टाईलमध्ये दोन हात करून पाणी पाजणारी आणि ' ओ धनवालो, पड गये भुके ' म्हणून श्रीमती मृणाल गोऱ्यांच्या महिला सघटनेत सामील झाल्याप्रमाणे मोर्चाच्या आघाडीवर राहून ऊर पिटणारी *आणि सर्वांत म्हणजे पडद्यावर* ' रेडया 'प्रमाणे गुरकणाऱ्या जोगिंदरची छुट्टी करून टाकणारी पॉवरबाज अरुणा ' गरम मसालेवाल्या ' अदाकारीनतर पुन्हा आपल्या मनास आली. पण या सर्वांबरोबर एक गोष्ट सिद्ध झाली की, अरुणा ही एक नेक लडकी आहे. बिंदूसारखा आशिकाला धोका देणे आणि आपल्या शिकारीमध्ये मस्त मग्न होऊन तृप्तीने हसणे तिला शक्य नाही.

' चट्टानसिंग ' तर आपण अरुणाच्या कामासाठीच पहावा. ' चट्टानसिंग ' हे एरव्ही डाकूंच्या जिंदगीवरचे पिक्चर. प्रेमनाथ या पिक्चरमध्ये ' धर्मा 'तील ' प्राण 'चीच भूमिका निभावतो. पण, अरुणाच्या दिलचस्प अदाकारीमुळे प्रेमनाथही फिका पडतो ' चट्टानसिंग 'मुळे पुन्हा अरुणाचे कॅरेक्टर निश्चित झाले आहे. हिंदी चित्रपटात ' गरम मसाले 'वाल्या भूमिकाना खर म्हणजे तोटा नाही. जोपर्यंत हिंदी पिक्चर्स निघताहेत तोपर्यंत आपल्यासमोर अरुणा नेहेमीच पेश होईल आणि आपले दिल बहलवील.

एक गोष्ट, ' आंधळा मारतो डोळा 'मध्ये दादा कोडकेने अरुणाला मराठी तमासगिरीण म्हणून पेश केली. आम्हाला सर्वांना ती मनास आली पण कोल्हापूर, सागलीमध्ये मात्र ती कुणाच्याच मनास आली नाही. ' छे : ही कोण बाईल नाचते आहे. हिला कुठे नाचता येत. नाचणारीण म्हणजे उषा चव्हाण ' ही मडळी म्हणू लागली. एकूण अरुणाला गेस्ट आर्टिस्ट म्हणून पेश करण्याची दादाची आयडिया वाया गेली. ' कमाल आहे, ' दादा मला म्हणाले, ' हीच बाई ' बॉबी 'मध्ये ' फसा ऽऽ ' म्हणून नाचते त्यावेळी सगळी पब्लिक खूश होते. पण मराठी पिक्चरमध्ये चालत नाही ! ' ◻

## पार्टी रद्द झाली – कारण

सिनेमाव्यवसायातील एक कुशल तत्रज्ञ आम्हा काही निवडक पत्रकाराना दरवर्षी पार्टी देत असतात. पार्टी घरगुती असते. *त्यांची सुगरण पत्नी आमच्यासाठी नाना* चमचमीत पदार्थ तयार करते. पोट फुटेपर्यंत त्याचा आस्वाद घेऊन आम्ही आमच्या त्या तत्रज्ञ मित्राच्या पत्नीच्या सुगरणपणाची वाहवा करीत असतो.

असाच मोका वारंवार यावा असे आम्हाला वाटत असते आणि पर्वा असा मोका आलाही होता. आमचे मित्र नदू राजे यानी आम्हाला धडाधड फोन करून कळवले की, ' सालाबादप्रमाणे आपल्या मित्राकडे गुरुवारी जमायचे रे. '

गुरुवार उजाडला. अचानक दुपारी फोन खणखणला. फोनवर आमचे मित्र आम्हाला कळवते झाले, ' पार्टी रद्द झाली.'

काय असेल पार्टी रद्द होण्याचे कारण ? जरा डोके खाजवून पहा.

नाही ना सुचत !

त्यांच्याकडचा वर्षेन गॅस अचानक सपला होता ! ◻ ◻



सोनेरी मुकुट,
लाल गंधाचा टिळा,
शेंदरी सोंड, डावी,
सोंडेत हिरव्या दुर्वा,
गळयात लाल फुलांची माळ,
हातात पांढरा शुभ्र मोदक,
जरीकाठी पिवळा पितांबर,
आणि पाटाशेजारी श्यामवर्णी वाहन
रंगच रंग,



नेरोलॅक

रंग–आपल्या जीवनातील एक अविभाज्य अंग

U-GNM-2


राजसंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग माजगावकर